# माणूस

## दिल्ली केव्हाच गेली

१ ऑक्टोबर १९७७ ❋ १। रुपया

## आता महाराष्ट्रही चालला...



# असतील ह्याला चेहरे चार

असतील ह्याला
चेहरे चार
तरी हा रावण नाही !
घेतल्या असतील
शपथा हजार
पण हा रामही नाही !

कालच्या धुळवडीत
हा
रॉयवादी रयतेत होता
मार्क्सवादी मेळ्यात होता
समाजवादी टाळ्यात होता
आणि कधी
भागवताची भगवी ध्वजा
खांद्यावर नाचवतही होता
( आजच्या घोषयात्रेत मात्र
त्यान हाच खादा
लोकशाहीलाही
विनतक्रार
दिला होता. )

तो नेहमीच
उगवत्याला
सामोरा गेला
मावळत्याला
पाठमोरा झाला
सत्तेच्या सावलीला
सुखानं नांदताना
सत्याचा सल मात्र
हरवून गेला !

कधी कधी
ह्याला
देशापेक्षा
माणूस मोठा होता
कधी कधी
ह्याला
माणसापेक्षा
देशही मोठा होता.
शब्दांची
खादेपालट करताना
( तो ) माणूस
आणि
तो देश
ह्यांच्याहून
हा मात्र
नेहमीच
लहान होता !

ह्यानं बिनचूक
बेरजा केल्या
चुकून वाकून
वजाबाक्याही केल्या
माणसांना
मोडत-जोडत
लौकिकाचा इमलाही
उंच उंच नेला !

तसे
कधी कधी
ह्यानं
शहरकरी शापले
आणखी कधी
( ! ) धर्मासाठी
धनिकही धाकले
बुद्धिजीवी बुजगावण्याचे
बाह्यात्कार
बोचकारले
कधी तर
( बेताबेतानं )
गावकरीही चापले !

न्यूयॉर्क असो
नारायणगाव
सिडने असो
सासवड
समाजवादाचा
प्रत्येक गड
ह्यानं
इमानानं
लढविला !

हाकेला तर
तो
नेहमीच
धावून गेला
हाकेला तसाच
तो
धावूनही आला
आपल्या घरचा
प्रत्येक सण
त्यानं
हसून पुसून
साजरा केला !

काहीही असो
ह्याच्यासाठीही एक
कान आहे
ह्याच्याजवळही एक
तान आहे
समजून-उमजून गायचं
ह्यालाही एक
भान आहे !

असतील ह्याला
चेहरे चार
तरीही हा रावण नाही !
घेतल्या असतील
शपथा हजार
पण हा रामही नाही !

– अशोक प्रभाकर

## साप्ताहिक माणूस

**वर्ष सतरावे–अंक अठरावा**

**१ ऑक्टोबर १९७७**

**मूल्य १·२५ पैसे**

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी, साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९

मुखपृष्ठ : बाबू उडुपी


# बेसूर आणि बदसूर

यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेस वाचविण्यासाठी व महाराष्ट्रातील आपली सत्ता टिकवून धरण्यासाठी प्रच्छन्न जातीयवादाचे भूत उठविले नसते तर हा अंक कदाचित निघालाही नसता ! यशवंतराव मोहिते किंवा अन्य कुणी जातीयवाद उकरून काढणे वेगळे आणि चव्हाणांनी ही पातळी गाठणे वेगळे. चव्हाणाचे नेतृत्व सर्व महाराष्ट्राने मानले ते एका अटीवर त्यानीच संयुक्त महाराष्ट्र झाल्यावर, ' हे राज्य मराठी राहील, मराठा नाही ' या दिलेल्या आश्वासनाप्रमाणे ते वागतील, ही ती अट आहे. ही अट आजवर तरी ते बऱ्याच अंशी पूर्ण करीत आले. निदान उघडपणे तरी त्यांनी हे विष पुन्हा उफाळू दिले नाही. त्यांनी जुन्या सत्यशोधक चळवळीतला हा वारसा विचारपूर्वक टाकून दिला आणि बहुसंख्य मराठा समाज व इतर अल्पसंख्य जाती–जमाती यांच्यात सुसंवाद निर्माण करण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला. यामुळे त्यांचे नेतृत्व समाजाच्या सर्व थरात रुजले, मानले गेले व दिल्लीतही ते महाराष्ट्राचे एकमेव नेते म्हणून वावरू शकले. त्यांचे स्थान पक्षातीत व जातिधर्मातीत राहत आले व ही त्यांची विशिष्ट राजकीय उंची गृहीत धरूनच ' माणूस ' ने गेल्या लोकसभा-निवडणुकीत त्यांना जनतेने बिनविरोध निवडून द्यावे, अशा पक्ष, प्रांत, जात–पात, धर्म यांच्या पलीकडे जाणाऱ्या सर्वमान्य नेत्याला मताचा जोगवा मागत हिंडायला लावणे बरोबर नाही, देशातील सर्वच पक्षातील अशा उंचीच्या व्यक्तीबाबत हे धोरण स्वीकारून लोकशाहीचा एक नवा आदर्श निर्माण करावा, असे प्रतिपादन केले होते. पक्षीय दृष्टिकोनातूनच विचार करणाऱ्या अनेकाना हे प्रतिपादन त्या वेळी मुळीच रुचले नव्हते; पण अजूनही ' माणूस ' ला आपले हे प्रतिपादन बदलावेसे वाटत नाही. असा पायंडा पडणे हे अधिक प्रगल्भ लोकशाहीचे लक्षण आहे यात काही शंका नाही. मग पक्षाध मंडळीना ते रुचो वा न रुचो.

पण या उंचीवरून खाली येण्याचे यशवंतरावानीच ठरविले असेल तर त्यांना त्यांच्या एकूण कारकीर्दीची बेरीज-वजाबाकी वेळीच मांडून दाखविणे आवश्यक ठरते. ते शिवाजी किंवा टिळक या क्रांतिकारक कोटीचे नेते कधीच नव्हते. त्यामुळे आज ते क्रांतिकारक नाहीत याबद्दल वास्तविक कुणाचीही तक्रार असण्याचे कारण नाही; पण म्हणून त्यानी आजवरची मध्यममार्गी वाटचाल सोडून एकदम जातीपातीच्या, द्वेषाच्या विषारी राजकारणाची पातळी गाठावी का ? त्यानी महाराष्ट्राला शब्द दिला आहे–' हे राज्य मराठीच राहील !' या शब्दावर विसंबून महाराष्ट्राने त्यांच्यावर मनापासून आजवर प्रेम केले. महाराष्ट्र त्यांच्याशी एकनिष्ठ राहिला ! या निष्ठेची किंमत शून्य असेल तर यशवंतरावानी खुशाल पुन्हा जातीवादाची भुते नाचवून सत्ता टिकवून धरण्याचा प्रयत्न करावा. तरुण महाराष्ट्र त्यांचे हे आव्हान नक्कीच स्वीकारील व इतिहासाची मागील पाने चिवडण्याचा त्यांचा हा प्रयत्न हाणून पाडील. संकटात सापडल्यावर माणसाच्या ठिकाणचे सर्वोत्तम गुण उफाळून येतात, असे म्हटले जाते. यशवंतरावाचा सर्वोत्तम गुण कोणता ? ' राखावी बहुताची अंतरे '– यात त्यांचे सर्व यश सामावलेले आहे. या गुणाचा उत्कर्ष साधून त्यांनी आलेल्या काँग्रेसबुडीच्या संकटावर मात करणे हे अधिक सुसंगत व शोभादायक ठरले असते. ते नेहरूभक्त आहेत– संकटकाळी त्यानी नेहरूंच्या अधिक जवळ जायचे की यशवंतराव मोहित्यांच्या सुरात सूर मिसळवायचा ? आजवर यशवंतरावांचा सूर महाराष्ट्राशी चांगला जमलेला होता. आता ते बेसूर आणि बदसूर होत आहेत. म्हणून हा अंक वाचकांच्या हाती द्यावासा वाटला.

–संपादक

# 'यशवंत' राजकारण आणि मराठवाडा

शिरीष सहस्रबुद्धे / संजीव मंगरूळकर

हा यशवंतरावजी चव्हाण याच्या गुणविशेष प्रकरणाचा मराठवाडा येथील अध्याय आम्ही वाचकांच्या समोर ठेवीत आहोत या प्रकरणामागची मूळ कल्पना अगदीच साधी व सरळ आहे. त्याचं असं झाल, की एक दिवस आपल्या एका सभेत यशवंतराव गरजले,

" आता इथून पुढे मी आक्रमक पवित्रा घेणार ! ' यशवंतरावांच्या भाषणातलं हे एकच वाक्य वृत्तपत्रानी अगदी ठळक मथळ्यात छापलं. वाचकांना, राजकारणी मुत्सद्द्यांना, रसिकाग्रणींना हे वाक्य आणि ते अशा आवेशाने गरजणारे यशवंतराव ही सांगड बरीच विचित्र आणि गंमतशीर वाटली. हे असलं काही तरी भलतंच आम्ही यशवंतरावजीकडून प्रथमच ऐकत होतो. आम्हालाही अगदी उत्सुक-उत्सुक वाटलं आणि अशा रीतीनं या गुणविशेष-आख्यानाच्या कल्पनेचा जन्म झाला !

ना. यशवंतरावजी चव्हाण हे आपल्या महाराष्ट्रात ' महाराष्ट्राचे प्रतिशिवाजी ' म्हणून ओळखले जातात. इतिहासकालीन राजा शिवाजी भोसले आणि वर्तमानकालीन यशवतरावजी चव्हाण यांची ही तुलना अगदी लोकप्रिय झाली याचं आम्हाला दिसणारं एकमेव कारण म्हणजे ' छत्रपतिपद ! ' ते दोघेही महाराष्ट्रीय होते. मराठी होते आणि तरीही छत्रपती होते. हा एकच दोघांमधला समान दुवा. बाकी शिवाजीराजांच्या शौर्य, लढाऊवृत्ती वगैरे गुणांचा प्रतिशिवाजीमध्ये एकूण अभावच ! " सत्तेवर सारखं राहाण्यासाठी बचाव आणि तसं राहूनही सतत बचाव ' असं प्रतिशिवाजीचं एकूण धोरण. तर एक दिवस अचानक या प्रतिशिवाजींनी पुकार केला—' आता मी आक्रमक होणार ! ' तेव्हा ही आक्रमकतेची नवीन भूमिका म्हणजे काय प्रकरण आहे अशी उत्सुकता साहजिकच आम्हाला वाटू लागली. गेल्या लोकसभा–निवडणुकीत कांग्रेस पक्ष पराभूत झाला. तो प्रथमच ' विरोधी पक्ष ' बनला आणि या विरोधी पक्षाचे यशवतरावजी ससदीय नेते बनले ! हा एक मोठा बदल या सुमारास घडला आणि त्यानंतर आता महाराष्ट्रातल्या विधानसभा–निवडणुका जवळ आल्या आहेत तेव्हा या संदर्भात यशवंतरावांची आक्रमक भूमिका कशी असेल, ती त्यांना कितपत शोभेल आणि या भूमिकेचे परिणामही काय होतील अशा अनेक शका आमच्या मनात येऊ लागल्या.

ही आक्रमकता भावी विधानसभा व निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून जन्माला घातली गेली असावी असा आमचा उघड अंदाज होता. म्हणजे असं की, यशवंतराव म्हणजे महाराष्ट्राचे एकमेव नेते आणि या एकमेव महाराष्ट्रीयत्वामुळे आजपर्यंत राष्ट्रीय पातळीवर त्याना मान लाभलेला होता. तेव्हा आगामी विधानसभा–निवडणुकीत जर कांग्रेस महाराष्ट्रात पडेल तर यशवंतरावांच्या राष्ट्रीय नेतृत्वाचे काय होणार ? अशी एक भीती आणि निवडणुकीचा हा धक्काही मराठवाड्याकडून बसण्याची एक उघड शक्यता. या दोन्ही बाबीचा साकल्याने विचार करूनच आम्ही मराठवाडा–अध्यायाचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला आणि या कामगिरीवर औरंगाबाद मुक्कामी दाखल झालो.

### मुक्काम औरंगाबाद

औरंगाबादला तर पोहोचलो. आम्हा दोघांनाही औरंगाबादविषयी काहीच माहिती नव्हती. तेव्हा तिथल्याच पत्रकारबंधूची भेट घेतली आणि त्याच्यापासूनच चर्चेची सुरुवात केली. दैनिक अजिंठाचे श्री. मगर हे त्यांपैकीच एक. एक अनुभवी पत्रकार म्हणून त्यांची ख्याती ऐकली होती. तेव्हा त्यांच्याकडूनच मराठवाड्याच्या राजकारणाविषयी ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेतली. ती थोडक्यात अशी–

स्वातंत्र्यापूर्वी मराठवाडा निज़ामाच्या राज्यात होता आणि तेव्हा मराठवाड्यात सत्तर टक्के रहिवासी शेतकरी वा शेतीशी संबंधित होते. असे असूनही या शेतकऱ्याना मात्र राजकारणात कुठल्याच प्रकारचा वाव नव्हता. १९४८ साली हैदराबाद स्वतंत्र झाले तरीही या परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. त्यानंतर १९५६ साली विशाल द्विभाषिक राज्य स्थापन झाले. या वेळी यशवतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले. त्याच्या रूपाने एका शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री झाला आणि ही घटना सगळ्याच शेतकरी-बाधवाना उत्तेजक वाटली ! शेतकऱ्याचा मुलगा म्हणून यशवतरावाची प्रतिमा प्रथम उजळली ती अशी ! यशवतरावाचा हा विजय हा सर्वच महाराष्ट्रीय शेतकऱ्याना त्याचाच विजय वाटला. मराठवाड्यातील शेतकऱ्यांची याबाबतची प्रतिक्रियादेखील सर्वसामान्यत: अशीच होती.

हा यशवतरावांच्या पहिल्या लोकप्रियतेचा इतिहास झाला. त्यानतर अर्थातच आमचे प्रश्न —

**मराठवाड्यातील नेतृत्व यशवंतरावांनी मारले हे खरे का ?**

ही कल्पनाच मुळी श्री. मगरांना चुकीची वाटते. शंकरराव चव्हाणांना मराठवाड्यातून पुढे आणले ते यशवंतरावांनीच ! खरं तर शंकरराव १९५२ साली हादगा मतदारसंघातून प्रथम निवडणुकीत पडले ! ५३ साली ते नादेडचे नगराध्यक्ष झाले. त्यानतर ५६ मध्ये यशवतरावानी त्याना एकदम राज्याच्या मत्रिमंडळात उपमंत्री म्हणून घेतले तेव्हा शकरराव आमदारदेखील नव्हते ! पुढे ६० साली तर त्याच्यासाठी खास पाटबधारेखाते निर्माण करून त्यांना पाटबधारे-मंत्री करण्यात आले. तेव्हा शंकररावाचा उदय सर्वस्वी यशवंतरावांच्याच कृपेने झाला असताना, यशवंतरावावर असा आरोप करणे चूक आहे.

तरीसुद्धा एकदरीत पाहू जाता, यशवंतरावांनी मराठवाड्याचे नेतृत्व मारले. मराठवाड्यातील बहुमताचा लाभ त्यानी उठवला; पण इथला एकही नेता राष्ट्रीय पातळीपर्यंत काय पण राज्यपातळीवरसुद्धा चमकू दिला नाही असा मराठवाड्यातील बऱ्याच व्यक्तीचा आरोप आहे; पण हा आरोप काँग्रेसप्रेमी पत्रकारांना चुकीचा वाटतो. यावर शकररावांचे हेच उदाहरण पुन्हा पुन्हा दिले जाते; पण असे असूनही हेच शंकरराव मुख्यमंत्री बनण्याला यशवतरावाचा विरोध का असावा या प्रश्नाचे मात्र उत्तर कोणी देऊ शकत नाहीत. एका पत्रकाराने तर 'इथे यशवंतरावांनी तर कार्यकर्त्यांचे जाळेच विणले आहे' असाच दावा केला. ही वस्तुस्थिती असेल, असे मानले तर एवढया या जाळ्यातून शंकररावांचा एक अर्धवट अपवाद वगळता, एकही नेता पुढे येऊ नये हा दैवदुर्विलासच नव्हे काय ?

याउलट दुसऱ्या काही मंडळींचा उलट दावा आहे. मराठवाडा काँग्रेस ज्या वेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीमध्ये विलीन झाली तेव्हाची एक कानगोष्ट एका ठिकाणी ऐकायला मिळाली. या वेळी म्हणे तेव्हाचे मराठवाडा काँग्रेसचे अध्यक्ष विनायकराव पाटील याना महाराष्ट्र काँग्रेसच्या पहिल्या अध्यक्षपदाची ग्वाही देण्यात आली होती. इतकेच नव्हे तर अशी स्वतः विनायकरावांचीसुद्धा इच्छा होती व तसे त्यानी यशवतरावाना कळविलेही होते; पण विनायकराव अखेर पहिले अध्यक्ष बनू शकले नाहीत आणि यामागे यशवंतरावांचा हात होता. अर्थात हा झाला भुतानी सांगितलेल्या कानगोष्टीसारखा प्रकार. खरे-खोटे विचारू नये; पण विनायकराव पाटील महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे पहिले अध्यक्ष होऊं शकले नाहीत ही वस्तुस्थिती आहे आणि हा मराठवाड्यावर अन्याय आहे असा काहींचा आरोप आहे. याखेरीज शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री होण्याला यशवंतरावांचा विरोध होता आणि सप्टेंबर ७१ मध्ये त्यानी 'वसंतराव नाईकच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहातील !' अशी घोषणा औरंगाबादलाच करून हा विरोध उघडही केला होता. हा मराठवाड्यातील नेतृत्व दाबण्याचाच प्रकार आहे हा या मडळीचा दावा !

या सर्व खटाटोपाचे तात्पर्य इतकेच, की आज मराठवाड्याजवळ राज्यपातळीवरदेखील समर्थ नेतृत्व नाही, याबाबत सर्वच मंडळींचे एकमत आहे. याचे कारण काहीही असो ही गोष्ट दुर्दैवाचीच होय !

**मराठवाड्याविषयी आकस**

'यशवंतरावांना मराठवाड्याबद्दल अगदी पहिल्यापासूनच आकस आहे. ते अगदी प्रथमपासूनच मराठवाड्याला सावत्रभावाने दूर राखतात. त्यांच्यावर अन्याय करतात !' हा इथला बहुचर्चित विषय आहे. अगदी परवादेखील शंकरराव चव्हाणानी असा जाहीर आरोपही त्याच्यावर केला. यशवंतरावामुळेच मराठवाड्याचा पुरेसा विकास होऊ शकला नाही हाही असाच एक दावा. या दाव्याबद्दल दोन मते आहेतच.

काँग्रेसनिष्ठ मंडळींच्या मते मराठवाड्याचा अगदी पुरेपूर विकास झाला आहे. त्याच्या मते गेल्या वीस वर्षांत मराठवाडाच सर्वाधिक गतीने विकास पावला. दर डोई उत्पन्न दहा टक्क्यांनी वाढले. मराठवाड्यात विद्यापीठ आले; महाविद्यालये आली वगैरे वगैरे; पण औरंगाबादचा सर्वसामान्य माणूस मात्र या विकासवादाशी सहमत दिसत नाही. विद्यापीठ-महाविद्यालये यासारख्या अगदी प्राथमिक गरजा पुरविल्याने मराठवाड्याचा विकास पुरेपूर झाला ही कल्पनाच त्याना हास्यास्पद वाटते. अजूनही मराठवाड्यात एकही राष्ट्रीय हमरस्ता नाही. ब्रॉड गेज रेल्वे नाही. इतकेच काय, महाराष्ट्र शासनाने मराठवाड्यासाठी पाठविलेली ब्रॉड गेज रेल्वेची योजना केंद्रशासनाने पूर्ण फेटाळून लावली आणि त्यात यशवंतरावांनी जरासुद्धा रस घेतलेला नाही ! याउलट पुणे-मिरज मार्ग मात्र यशवंतरावामुळे ब्रॉड गेज झाला. अगदी कऱ्हाड-साताऱ्यावरून हा मार्ग गेला. हे सावत्रपणाचेच लक्षण नाही काय ? ही या मंडळींची मळमळ ! ही मळमळ कुठे कुठे इतकी पराकोटीची आहे की, 'यशवंतरावांनीच मराठवाड्याचा सत्यानाश केला !' असेही काही मडळी म्हणतात. आता सत्यानाश म्हणजे काय, तो कसा झाला, कुणी केला यासारख्या गोष्टीना कुठलाच तसा पुरावा उपलब्ध नाही; पण एक गोष्ट नाकारण्यात अर्थ नाही. मराठवाड्याचा विकास पुरेसा झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे ! याला जबाबदार कोण ? हे सिद्ध करणे हे तुम्हा-आम्हा सामान्यांच्या बुद्धीपलीकडचे काम आहे. काही मडळी ही जबाबदारी शंकररावाच्या खांद्यावर टाकून मोकळी होतात.

यशवंतरावाची 'मराठेशाही' हेही एक गाजणारे प्रकरण आहे. या विषयावर बारीक जरी चिमटा काढला तरी इथली मडळी भडाभडा पोटातून बोलू लागतात ! यशवंतरावांनी राजकारणात फक्त मराठ्यांनाच पुढे आणले. मराठेमंडळींनाच निवडणुकांची तिकिटे जास्त देण्यात आली. जिल्हा परिषद, सहकारी बँका यासारख्या ठिकाणीदेखील मराठा पित्ते पेरण्यात आले. यामुळे मराठेतर मंडळी आज इथे अनाथ झाली आहेत. हे झाले या मराठेशाहीच्या संदर्भातील एकूण आरोपांचे सूत्र ! गंमतीची गोष्ट अशी की अगदी काँग्रेस-पुरस्कर्ते पत्रकारदेखील या आरोपांचा आडून किंवा अगदी सरळसरळ पाठपुरावा करतात. यशवंतरावानी महाराष्ट्रात मराठेतरांचा कसा 'राडा' केला, याबाबतचे अनेक किस्से ऐकवतो अशी ऑफरही आम्हाला देण्यात आली ! 'अरे, सुनतेही रहो यार !' म्हणून कित्येकांनी लालूचही दाखविली. आम्हीही या किश्श्यांसाठी ठिकठिकाणी खोदून पाहिले; पण एकही किस्सा कुठूनच ऐकू आला नाही ! राग, मळमळ सगळ्यांच्याच मनात आहे; पण सांगण्यासारखा वस्तुनिष्ठ पुरावा एक तर नसावा किंवा हा पुरावा उघड करण्याची धडाडी तरी नसावी. नुसती आणीबाणी उठली म्हणजे मडळी धीट, स्वतंत्र बाण्याची होतातच असे नव्हे.

पृष्ठ ३० वर

# यशवंतराव एक मांडलिक




मो. ग. तपस्वी, नवी दिल्ली

यशवंतराव चव्हाण यांच्यापुढे सध्या एक फारच जबर आव्हान उभे आहे. सातारा जिल्ह्यातील एका सामान्य शेतकऱ्याचा हा मुलगा राजकीय वातावरणातील अनेक चढउतार पहात पहात सध्या चौसष्टीत वावरतो आहे. वयाच्या चौसष्ट वर्षांची ही वाटचाल तशी खूपच घटनापूर्ण आहे. अनेक वाटा आणि वळणं घेत घेत ती कराडहून निघाली; सातारा जिल्ह्याबाहेर पडली. मुंबईत स्वराज्यातला पहिला पार्लमेंटरी सेक्रेटरी बनण्याचा योग आल्यानंतर मुंबईत माहीत झाली; द्विभाषिक मुंबई प्रांताचे मुख्यमंत्रीपद लाभल्यानंतर ही वाटचाल महाराष्ट्र आणि गुजराथभर पसरली; नंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळीत लोकक्षोभाला तोंड देत लोकप्रिय झाली; विरोधकातील वजाबाकी आणि स्वपक्षातील बेरीज असा गुणाकार–भागाकार करीत महाराष्ट्राचा अत्यंत लोकप्रिय मुख्यमंत्री म्हणून दहा वर्षांची कारकीर्द हा यशवंतरावांच्या वाटचालीतील अत्यंत मोलाचा, सोन्याचा टप्पा बनला !

त्यानंतर पंतप्रधान नेहरूंच्या निमंत्रणावरून यशवंतराव चव्हाण दिल्लीला आले. संरक्षणमंत्री झाले. तेव्हा महाराष्ट्रात म्हटले गेले की ' हिमालयाच्या रक्षणाला हा सह्याद्री धावून आला !' यशवंतरावांना राजकीय जीवनात कधी स्वस्थता म्हणून लाभलीच नाही ! संरक्षणमंत्री झाल्यापासून त्यांना सतत धावपळ करावी लागली; पण घटनाचक्राचा वेगच असा जबर की एक मंत्रीपद चार वर्षांपेक्षा जास्त कधी लाभलंच नाही ! आपल्यातील कसब पाच वर्षं तरी पणाला लावून त्या मंत्रालयावर आपली छाप पाडता यावी इतका वेळच राजकीय घटनावेगाने त्यांना कधी लाभू दिला नाही. किंबहुना दिल्लीतील राजसत्ता हाती असलेल्या मंडळींनी यशवंतरावांचं कर्तृत्व कधी कळसाला पोचूच दिलं नाही आणि एकामागून एक अनेक आव्हाने येत असताना यशवंतराव राजकीय क्षितिजावरून नेहमी मागेच रेटले गेले आहेत असेच दृश्य दिसत गेले.

## पंतप्रधानपदाच्या हुलकावण्या

यशवंतराव दिल्लीला आले १९६२ सरता सरता. नियतीने त्यांना महाराष्ट्राच्या प्रांतिक पातळीवरून उचलून दिल्लीच्या केंद्रीय पातळीवर आणून ठेवलं होतं. अर्थातच दिल्लीत केंद्रीय मंत्रिमंडळात आलेला प्रत्येक माणूस हा पंतप्रधान होण्याच्या लायकीचा असतो अशातला भाग मुळीच नाही; परंतु महाराष्ट्रासारख्या राज्याचा अत्यंत सफल मुख्यमंत्री म्हणून नावाजले असल्यामुळेच दिल्लीत यशवंतरावांसारखा नेता आज ना उद्या, केव्हा ना केव्हा पंतप्रधानपदाचा दावेदार होणार यातही काय नाही. यशवंतरावांशी प्रसंगोपप्रसंगी अनेकदा चर्चा करण्याची संधी मला लाभलेली आहे. आज यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय कर्तृत्वाचे मूल्यमापन करायला बसलो असता त्या सर्व चर्चा, त्यातील टांचणा–टिपणांसकट मला आठवत आहेत. मागे वळून पहाता आणि यशवंतरावांच्या काँग्रेस-विचारसरणीच्या गुणावगुणात न शिरता असे म्हणावे लागते आहे की पंतप्रधानपद किमान तीनदा यशवंतरावांसमोर दत्त म्हणून उभं राहिलं होतं आणि प्रत्येक वेळी ते त्यांना हुलकावणी देऊन निघून गेलं !

आटघापाटघांच्या खेळात हुलकावण्या आधीच हेरून गडी बाद करावे लागतात. दिल्लीच्या राजकारणातील आट्यापाट्यांच्या खेळात यशवंतरावांना ' सूर ' होण्याचा योग आला असतानाही त्यांनी बांधलेल्या अनेक कोंड्या फुटून प्रतिस्पर्धी सीमापार होऊन 'लोण' करून गेला आहे. या बाबतीत दिल्लीहून संपूर्ण देशाच्या राजकारणाचा जो सारीपट क्षणाक्षणाला बदलत जातो त्याचा यशवंतरावांचा अभ्यास कच्चा तरी पडला असावा किंवा आपल्या अवती–भवती काय घडत आहे याचा अचूक अंदाज उशीर होण्यापूर्वी त्यांना बांधता तरी आला नसावा. यशवंतरावांना नेहरूंनी दिल्लीत आणले तेच

मुळी बचाव–मंत्री म्हणून ! तेव्हापासून बचावात्मक राजकारणच खेळत आलेल्या यशवंतरावांना चढाई हाच बचावाचा सर्वोत्तम भाग असतो याचा जणु विसरच पडला. इतका विसर पडला की, यशवंतरावांना कधी तरी चढाई करता आली होती काय, 'असा प्रश्न पडावा !

१९६४ साली नेहरू निवर्तले. उत्तराधिकाराचा प्रश्न निर्माण झाला. अर्थातच तोपर्यंत यशवंतरावांना आपल्या नेहमीच्या धोरणानुसार कामराज, स. का. पाटील, अतुल्य घोष, मोरारजी प्रभृती केंद्रीय नेत्यांवर आपली छाप पाडता आलेली नव्हती. यशवंतराव चव्हाण ही काय चीज आहे ते स्वानुभवावरून जाणणारे मोरारजी केंद्रीय नेत्यात होते. नेहरूनंतर येणारा पंतप्रधान हा फार चांगला नेता असायला हवा वगैरे गोष्टी नुसत्या वरवर सांगण्याच्या होत्या. मुळात यशवंतराव हा तळातून शक्तिसंचय करीत करीत वर आलेला आणि म्हणूनच अतिशय बलशाली नेता आहे याची जाणीव केंद्रीय नेत्यांना होती. तात्पर्य, तो आपल्या ओंजळीनं पाणी पिणार नाही अशीच भावना कामराज वगैरे नेत्यांत होती. आपले नाव विचारात घेतले जावे असे काही तरी दिल्लीतील केंद्रीय काँग्रेस नेत्यांना वाटावे असे वातावरण त्या दीड–पावणेदोन वर्षांत यशवंतरावांना निर्माण करता आलेले नव्हते. याचे मुख्य कारण हे होते की, तोवर यशवंतरावाभोवती पडत असलेला महाराष्ट्राचा, मराठी माणसाचा आणि महाराष्ट्रीय राजकारणाचा गराडा उठलेलाच नव्हता !

योगायोग असा की त्यानंतर अठराच महिन्यांनी पुन्हा पंतप्रधानपदाचा प्रश्न उपस्थित झाला. लालबहादुरशास्त्री वारले होते. चव्हाण त्यांच्याबरोबर ताश्कंदला गेले होते; परंतु शास्त्रींच्या विश्वासातील म्हणून नव्हे, तर ते त्यावेळी संरक्षण मंत्री होते आणि १९६५ च्या युद्धानंतरच्या संरक्षणविषयक प्रश्नावरच ताश्कंदला वाटाघाटी व्हायच्या होत्या म्हणून त्यांना नेण्यात आले होते. वास्तविक एव्हाना चव्हाणांना दिल्लीत येऊन त्यांच्या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रित्वाच्या कारकीर्दीचा निम्मा काळ लोटलेला होता ! काँग्रेसच्या केंद्रीय राजकारणातील धाग्या-दोऱ्याच्या गुंतागुंतीची कल्पना आणि त्याची उकल कशी करावी याचा बोध त्यांना झालेला असायला हवा होता. तदनुसार पंतप्रधानपदासाठी संसदीय काँग्रेस पक्षात जास्तीत जास्त खासदारांचा पाठिंबा त्यांना आपल्या पाठीशी उभा करता यायला हवा होता; पण त्यासाठी लागणारी धडाडी, कल्पकता आणि चढाईचे पवित्रे घेण्याची जिद्द तरीही त्यांच्यात आलीच नव्हती ! महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना आणि दिल्लीत केंद्रीय मंत्री म्हणून आल्यानंतरही प्रांताप्रांतांच्या मुख्यमंत्र्यांशी आणि काँग्रेस पक्षातील इतर शक्तिकेंद्रांशी चव्हाणांचे सख्यत्व झालेलेच नव्हते. ' राजकारणात बिनीवर जाण्याची संधी साधण्यासाठीच प्रत्येकजण आपापले पाय रोवून उभा असतो ' हे त्यांनीच प्राजळपणे एकदा म्हटलेले होते आणि तरीही तशी संधी आल्यानंतर प्रत्यक्षात मात्र यशवंतरावांचे पाय लटपटले ! तसेच इंदिरा गांधींना पंतप्रधान बनू न देण्यासाठी करावयाच्या चातुर्याच्या बाबतीतही घडून आले आणि ती दुसरी संधीही हुकली !

काँग्रेसची फाळणी झाली त्या वेळीही यशवंतरावांनी असाच अवसानघातकीपणा दाखविला. इंदिरा गांधींचे राष्ट्रपति उमेदवार जगजीवनराम ठरत असताना त्यांनी जगजीवनरामांच्या विरुद्ध मत दिले ! परिणामी इंदिरा गांधी आणि जगजीवनराम या दोघांनाही त्यांनी दुखविले आणि इतिहासाच्या साक्षीने म्हणता येईल की या दोघांनीही त्यांना आजतागायत क्षमा केलेली नाही ! इंदिरा गांधींनी संजीव रेड्डी यांच्या नावाचा अर्ज भरून त्यांना विरोध केला. काँग्रेस फुटली तेव्हाही यशवंतराव चव्हाण यांनी सिंडिकेटच्या बाजूला उडी घेतली आणि संजीव रेड्डींनाच मत दिले आणि महाराष्ट्रातील आपल्या अनुयायांकरवी देवविलेही ! परंतु त्यानंतर लगेच बाजू बदलली आणि ते पुन्हा इंदिरा गांधींच्या बाजूला झाले. त्या वेळचा प्रसंग आहे. जगजीवनराम आणि फक्रुद्दीन यांनी निजलिंगप्पांना ऐतिहासिक पत्र पाठविले. अण्णासाहेब शिंदे, आता आपल्याला मंत्रिमंडळातून काढणाऱ्या समजुतीने सारी आवराआवर करून उद्या नगरला परत जाण्याची तयारी करून नुकतेच झोपले होते तोच फोन खणाणला ! अण्णासाहेबांना वाड्यावरचे बोलावणे आले. यशवंतराव त्यांना म्हणाले–' अण्णासाहेब, आजपासून राजकारण बदलले बरे का ! आवराआवर करू नका. मीही त्या पत्रावर सही केली आहे ! ' अण्णासाहेब पहातच राहिले.

निजलिंगप्पांकडे सिंडिकेटची बैठक झाली. यशवंतरावांनाही बोलावणे होते. रामसुभगसिंह यांनी राजीनामा दिला होता. चव्हाणही राजीनामा देणार अशी वदता होती. बैठक संपवून चव्हाण बाहेर आले. लगबगीने ते मोटारीत बसणार तोच मी त्यांना विचारले– ' यशवंतराव, तुम्हीही राजीनामा देणार काय ? ' ' मुळीच नाही ! ' असे म्हणत ते मोटारीत बसून निघून गेले. ती मोटार गेली आणि पंतप्रधानपदाची चालून आलेली तिसरी संधीही यशवंतरावांच्या हातून गेली !

## अतिसावधपणा, अतिहिशेबीपणा

या बैठकीबाबत नंतर असे समजले की, कामराज वगैरे नेत्यांनी चव्हाणांना म्हटले होते की १९६९ आहे हे. आणखी अडीच वर्षांनीच निवडणुका व्हायच्या आहेत. तुम्हीच पंतप्रधान व्हावे असे आमच्या सर्वांच्या मनात आहे; परंतु मोरारजी फार सीनियर आहेत. आपण अशी तडजोड करू या की या अडीच वर्षांकरिता मोरारजींनी पंतप्रधान रहावे आणि निवडणुकीनंतर तुम्हाला त्या पदावर निवडून द्यावे. मोरारजींना हे मान्य आहे... परंतु यशवंतरावांचा अतिसावधपणा, अतिहिशेबीपणा आडवा आला.' त्यांना वाटले असावे की, मोरारजी–मंत्रिमंडळात मला महत्त्वाचे स्थान मिळणार नाही. इंदिराबाईंच पंतप्रधान राहिल्या तर त्यांच्यावर आपल्याला केव्हाही प्रभाव पाडता येईल. कारण तोपर्यंत जगजीवनराम, फक्रुद्दीन यांनी कोणती कड घेणार ते जाहीर केलेले नव्हते. परिणाम जो झाला तो आता सर्वश्रुत आहेच !

१९६७ च्या निवडणुकांपूर्वीचा प्रसंग आठवतो. यशवंतराव गृहमंत्री झालेले होते. सरदार पटेलांच्या जागी आपली नियुक्ती झाल्याची एक सुखावलेली आभा त्यांच्या मुखावर झळकू लागलेली होती. जबाबदारीची जाणीवही फार होती. सावधपणा होताच. हिशेबीपणाही वाढलेला होता. गृहमंत्री या नात्याने साऱ्या देशातील चित्र नकाशासारखे समोर होते. अनेक माणसांचा परिचय झालेला

होता. बारकावे आणि गुंतागुंत उमगलेली होती; परंतु इंदिराबाईंच्या वागण्या-बोलण्यात काहीसा तऱ्हेवाईकपणा येऊ लागलेला होता. घटना घटना धाडानं जाहीर होत होत्या. निवडणुकीनंतरचा भारत कसा दिसेल याची चर्चा आम्ही करीत होतो. रुपयाचे अवमूलन झालेले होते पक्ष उमेदवारांच्या याद्या ठरविताना कोण आपला, कोण परका याचा हिशेब सुरू झालेला होता. प्रश्न निघाला– 'हे असं कुठवर चालू देणार आपण? अखेरीस पक्ष म्हणून जगायचं असेल तर पक्ष-अस्तित्व कमी लेखणाऱ्या या इंदिराबाईंच्या कृतीचे समर्थन कसे करणार आपण? का करणार?' उत्तर मिळालं– 'पक्षापेक्षा देश मोठा आहे आणि ज्या वेळी देशाला अपायकारक ठरेल असं काही, पक्षाला कमी लेखून, स्वतःच करायचं कुणी ठरवील तर आम्हाला त्यांना सांगावं लागेल, हे आम्ही खपवून घेणार नाही!'

यशवतरावाच्या दिल्लीतील राजकीय कर्तृत्वाचा एक सहानुभूती राखणारा निरीक्षक या नात्याने मला राहून राहून वाटतं की यशवंतरावानी आपला हा शब्द नंतरच्या वर्षात खरा करून दाखविण्याची धमक दाखवली असती तर सारा इतिहास किती वेगळा झाला असता! देशापेक्षा पक्ष मोठा आणि पक्षापेक्षाही मी मोठी अस नुसतं सांगायलाच नव्हे तर वागायलाही इंदिरा गांधीनी सुरुवात केली, तरीही यशवंतरावाच्या तोंडून चकार शब्दही निघाला नाही. आता यशवंतरावानी विरोधकात बसायची पाळी आल्यानंतर 'आक्रमक पवित्रा' घेण्याची कितीही भाषा काढली तरी गेल्या ६४ वर्षांत जे कधी घडलें नाही, घडू शकल नाही, ते आताच घडेल याचा विश्वास धरू म्हटलं तरी कुणी कसा धरावा?

इंदिरा गांधीचा पक्षान्तर्गत 'हम करेसो' कायदा १९७० पासूनच दिसू लागला होता. आणीबाणीची घोषणा त्याचा परिणाम होय! एकदा १९६६ साली त्याना गृहमत्री करण्यात आले. त्याचा सर्वात जास्त आनंद दिल्लीतील मराठी माणसानी व्यक्त केला. अण्णासाहेब शिंदे याच्या १ मोतिलाल प्लेस या सरकारी बंगल्याच्या हिरवळीवर दर वर्षी यशवंतरावांचा वाढदिवस फार मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येत असे. इंदिरा गांधीही त्याला हजर राहात असत, सुमारे साताठशे निमंत्रित येऊन जात असत; पण हा कार्यक्रम का कुणास ठाऊक, १९७० मध्येच बंद झाला! त्यानंतर आजतागायत तो कधी झालाच नाही! निमित्त दुष्काळाचं सांगण्यात आलं; परंतु अशा प्रकारे इतर कोणत्याही मंत्र्याचा वाढदिवस होत नसताना (जगजीवनरामांचा मात्र तेव्हाही होत होता आणि आताही होतच असतो!) एकट्या चव्हाणांचाच तसा करावा हे अप्रशस्त आहे असा सल्ला देण्यात आला होता.

चव्हाणाकडून गृहखाते काढून त्यांना अर्थखाते देण्याची कुणकुण लागताच मी त्यांना प्रश्न केला होता– 'यशवतराव, मन्त्रिपदाच्या गादीला चिकटून बसण्यातच तुमचा स्वार्थ निर्माण झाला आहे असा समज पसरू देण्यापेक्षा तुम्ही राजीनामा देऊन मोकळे का होत नाही? साधे खासदार म्हणून तुम्हाला देशाची सेवा करताच येणार नाही असं का मानता?' आम्ही त्याच्या हिरवळीवर पाय मोकळे करीत फिरत होतो. अतिसावधपणाचे कवच न फोडता यशवंतराव म्हणाले– 'समाजवादाचा बेलभडारा उचलून तो अमलात आणण्यासाठी मी इंदिरा गांधीच्या बाजूला आलो. आता गृहमत्रीपद काढून घेतले तर मी त्या विशिष्ट मन्त्रिपदासाठीच इंदिरा गांधीच्या बाजूला आलो असा अर्थ काढण्यात येईल. किमानपक्षी संपूर्ण सरकारी प्रचारयत्रणा तसाच प्रचार करील–करवील! त्या अपप्रचाराचं निराकरण मला करता येणार नाही!' 'परंतु यशवतराव, तुम्ही आणि तुमचं कर्तृत्व पूर्णपणे सरकारजमा झालं आहे आणि मंत्रिपदावाचून आपल्याला देशसेवा करताच येणार नाही असाच तुमचा एकंदर कल बनला आहे अशी तुमच्याबद्दल संपूर्ण महाराष्ट्रात भावना पसरेल, तिचं काय?' मी प्रतिप्रश्न केला आणि त्यावर यशवंतराव फक्त नेहमीप्रमाणे मुत्सद्देगिरीनं हसत इतकंच म्हणाले होते– 'दोन्हीपैकी कोणतीही पाळी येऊ न देता यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न मी करणार आहे!' मला त्यांचं ते उत्तर पटलं नव्हतं, हे यशवंतरावांनी ओळखलं होतं हे मात्र मला मान्य करायलाच पाहिजे; पण तोच तो अतिसावध हिशेबीपणा त्यांना जास्त बोलू देत नव्हता!

परंतु प्रत्यक्षात झाले ते मात्र असे की चव्हाण काढू म्हणत होते तसा मार्ग त्यांना काढता आला नाही. गृहमंत्रीपद सांभाळतानाही त्याना सतत विलक्षण कोंडमारा सहन करावा लागला. यशवतराव गृहमंत्री असताना (आणि तत्पूर्वी संरक्षणमंत्री असताना किंवा नंतर अर्थमंत्री असतानाही) रा. स्व. संघाचे सरसंघचालक श्री. गोळवलकर गुरुजी दिल्लीत आले की यशवंतरावांना नेहमी भेटत असत. त्यांची काय काय बोलणी होत असत हे यशवंतरावांनी कधीच सांगितले नाही; परंतु गोळवलकरगुरुजींच्या लोकसंग्राहक वृत्तीमुळे ते त्यांच्याशी नेहमी संघाबद्दलच बोलत असावेत असे सहज मानता येईल. त्यातून असलाच तर हेतू एवढाच, की किमानपक्षी यशवंतरावासारख्या नेत्याचा तरी संघाबाबत कोणताही गैरसमज होऊ नये, झालेला असलाच तर कायम राहू नये; परंतु ही गोष्ट आज मारे निष्ठेचा आव आणून यशवंतरावांना पाठिंबा द्यायला सरसावलेल्या कम्युनिस्टांना आणि त्याच्या काँग्रेसमधल्या सहप्रवाशांना डाचत होती. जून १९७० च्या दुसऱ्या आठवड्यात झालेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत द्वारकाप्रसाद मिश्र आणि हेमवतीनंदन बहुगुणा या काँग्रेसच्या अनुक्रमे कोषाध्यक्ष आणि सरचिटणीस असलेल्या दुकलीने यशवंतरावाना सघावरून चागलेच धारेवर धरले होते. सघनेते गोळवलकर गुरुजी आणि सरदार वल्लभभाई पटेल याच्यात झालेल्या पत्रव्यवहाराची फाइलच गृहमंत्रालयातून गायब झाली आहे असा आरोपही या दुकलीने यशवतरावावर केला होता! मौज अशी की एकही फाइल गायब झालेली नाही आणि संघाने कोणतेही आश्वासन दिलेले नाही असे गृहखात्याने चव्हाणाना कळविले होते आणि चव्हाणांना स्वतःच्या माहितीनुसार ते माहीतही होते; परंतु पंतप्रधान इंदिरा गांधी याच्या समोर हा आरोप करण्यात आला आणि त्यांनी 'आरोप करू नका!' असे काही मिश्रा–बहुगुणांना बजावले नाही; परंतु चव्हाणांचा कोंडमारा आणि अतिसावध वृत्तीच त्यांना नडली! गोळवलकर-पटेल–नेहरू यांच्यातील पत्रव्यवहाराबाबतचे सत्य सांगितले तर आपल्यावरच संघाचा कैवार घेतल्याचा,

त्याला संरक्षण दिल्याचा आरोप येऊन, आपल्यासाठी पसरलेल्या जाळ्यात आपण नेमके चालत जाऊ असे वाटल्याने, चव्हाण या आरोपावाबत काहीही बोललेच नाहीत. गाईसाठी झालेल्या चळवळीवरून गुलझारीलाल नंदांचे गृहमंत्रीपद गेले तसेच संघबंदी आणि महाराष्ट्रातील जातीय दंगे यांच्या प्रश्नावरून चव्हाणांचेही व्हावे. ते करण्यासाठी इंदिरा आणि चव्हाण यांच्यात जास्तीत जास्त दुरावा निर्माण व्हावा, असा प्रयत्न चाणक्य मिश्रा त्या वेळी करीत होते. संघावर बंदी घालावी अशी दुरुस्ती ठरावाला मांडण्यासाठी त्यांनी चंग बांधला होता. आधीच झालेल्या ए. आय्. सी. सी.त संघावर बंदी घालावी काय याचा अभ्यास करायला गृहखात्याला सांगितल्यानंतर, त्याचा तो अभ्यास पूर्ण व्हायच्या आत बंदी घालावी अशी दुरुस्ती मांडता तरी कशी, असे भांडून चव्हाणांनी वेळ मारून नेली; पण त्यातून चव्हाणांवर यांचं ते सावट आल्यावाचून काही राहिल नाही!

आणि आता तेच चव्हाण रा. स्व. संघाविरुद्ध दंड थोपटून उभे राहिले आहेत असे पाहिल्यानंतर दिल्लीहून महाराष्ट्रात गेल्यानंतर चालतात–बोलतात ते यशवंतराव वेगळे आणि मुंबईहून दिल्लीत परतल्यानंतर वागतात–सांगतात ते यशवंतराव वेगळेच, असे विभक्त व्यक्तिमत्त्व यशवंतरावांना लाभले आहे असे वाटते. गृहखात्यातून काढून अर्थखात्यात टाकताना इंदिरा गांधींनी केलेला युक्तिवाद यशवंतरावांना समजलाच नाही असे आता म्हणणे भाग आहे. यशवंतरावांना गृहखाते सोडायला सांगण्यापूर्वीच त्यांनी गृह, परराष्ट्र, व्यापार आणि अर्थ या खात्यांचे गुप्तचर विभाग तिथून काढून पंतप्रधान मंत्रालयाच्या अखत्यारीत आणले होते. अमलदार विभागही गृहखात्यातून काढून घेतला होता. गृहखाते फक्त फुकट फौजदारी खाते करून सोडले होते आणि मग चव्हाणांना नाही तरी आता या खात्यात उरले आहे तरी काय, असा साळसूद युक्तिवाद करून गृहखाते सोडायला लावले होते. अर्थखात्यातील ते विभागही काढले आहेत हे चव्हाणांच्या लक्षात आले नाही. आर्थिक कार्यक्रमाचा बेलभंडारा उचलून काँग्रेसची फाळणी घडवून आणल्यानंतरच्या अकरा महिन्यांच्या कारकीर्दीत अर्थमंत्री या नात्याने इंदिरा गांधी कोणतेही नेत्रदीपक कार्य करून दाखवू शकलेल्या नव्हत्या, ते आपल्याला करून दाखवता येईल की नाही, याचाही विचार चव्हाणांनी केला नाही. त्यांनी अर्थमंत्रीपद स्वीकारले आणि तीच त्यांच्या इंदिरादरबारातील अवमूल्यनाची सुरुवात ठरली! प्रत्येक वेळी इंदिरा गांधी या वरचढ व्यूहरचना करीत गेल्या आणि यशवंतराव अभिमन्यूसारखे मोठ्या आवेशाने त्या व्यूहरचनेत शिरत गेले, बाहेर पडण्याचा रस्ता माहीत नसताना शिरत गेले, आपण जणू मोठमोठी आव्हाने स्वीकारीत निघालो आहोत असाच त्यांचा प्रामाणिक समज होत गेला. काळाने दाखवून दिले आहे की, दिल्लीच्या राजकारणात यशवंतराव एका मागून एक अशी मातच खात गेले आणि आणीबाणी लागण्यापूर्वी तर यशवंतराव काय, परिवार नियोजन मंत्री केले तरीही दिल्लीत राहतील अशी कुत्सित व हेटाळणीवजा टीका जाहीरपणे ऐकू येऊ लागली होती.

## आग्रही भूमिका घेणे हा पिंडच नाही

राजकारणात आग्रही भूमिका घ्याव्याच लागतात. केव्हा तरी, कुठं तरी आपल्या सहकाऱ्यांना, नेत्यांना बस्स, पुरे झाले म्हणावेच लागते! ते म्हणण्याची वेळ, काळ ज्याचा त्याने निवडायचा असतो. ज्याला अशा प्रकारे 'थांबा, हे चालणार नाही, चालू देणार नाही!' असे सांगण्याची ताकद नसते, त्याने राजकीय पुढारी बनण्याचे दिवास्वप्न न बाळगलेले बरे. त्याच्या भाळी नेहमी मांडलिकत्वच लिहिलेले आहे आणि कोणताही मांडलिक आपले भाग्य आपल्या हातांनी घडवू शकत नसतोच.

यशवंतरावांनी आपल्या आयुष्यात कधीही अशी आग्रही भूमिका घेतली नाही. संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशी आग्रही भूमिका घेण्याऐवजी महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. हे राज्य मराठा की मराठी? असा सणसणीत अग्रलेख भाऊसाहेब माडखोलकरांनी तरुणभारतात लिहिल्यावर 'हे राज्य मराठीच राहील आणि मराठा राज्य होईल त्या वेळी मी त्यात नसेन' असे आवर्जून जाहीरपणे सांगणारे यशवंतराव आणि त्यांचे सहकारी, शहाण्णवकुळी मराठ्यांच्या, बहुजनसमाजाच्या कैवाराखातर महाराष्ट्रातून ब्राह्मणांच्या आणि बिगरमराठा मंडळींच्या घरादारांवरून नांगर फिरविण्याची भाषा बोलणाऱ्यांना एका शब्दानेही कधी हटकताना दिसले नाहीत. इतकेच कशाला अगदी आता, शेटजी-भटजींचा पक्ष, जानवे धरून कुठे चाललात, यासारखा जातीय विखार जाणूनबुजून पसरवीत सुटलेल्या मोहित्यांना 'असे बोलू नकोस!' असे यशवंतरावांनी खडसावल्याचेही ऐकिवात नाही.

तत्त्वाचा आग्रह म्हणावा तर तोही यशवंतरावांच्या कारकीर्दीत कुठे दिसत नाही. भांडवलदारी, बड्या उद्योगसमूहांना वाव, कारखानदारांचे वर्चस्व, सधन शेतकऱ्यांची शेतीभातीवरच नव्हे तर अर्थव्यवस्थेवरही कुरघोडी, परकी कंपन्यांचा महाराष्ट्रातील सुळसुळाट हे सर्व यशवंतराव समाजवादाची दिंडी मावळत्या सूर्याच्या साक्षीने घेऊन निघाले असतानाही झालेच आहे. बिर्लाशेठांची संपत्ती ४०० पटींनी वाढली तेव्हा केंद्रात यशवंतरावच अर्थमंत्री होते. ज्या चक्री योजनेला आता यशवंतराव विरोध करीत आहेत, ती 'चक्री योजना' यशवंतराव संरक्षणमंत्री असताना संरक्षणखात्यासाठी त्यांनीच सुरू केलेली होती. पंजाबी सुभा दिलात तर पंजाबमधून काँग्रेस समाप्त होईल असे केंद्रात मोरारजी आणि पंजाबात गृहमंत्री असलेले दरबारसिंह यांनी आवर्जून सांगितले असतानाही पंजाबी सुभा देण्यात आला, तेव्हा यशवंतरावच गृहमंत्री होते. पंचवार्षिक नियोजनाला रजा देऊन तीन वर्षे ती योजना बासनात ठेवावी लागण्याइतकी अर्थव्यवस्था खालावली होती तेव्हा यशवंतरावच अर्थमंत्री होते. राष्ट्रीयीकृत बँकांच्या कारभारात वाटेल तसा भ्रष्टाचार माजला आहे याची उदाहरणे संसदेच्या पटलावर येऊ लागली तेव्हाही अर्थमंत्रीपद त्यांच्याच हाती होते आणि, अखेरीस तरीही हा माणूस प्रबळ आहेच या समजुतीने त्यांना 'परराष्ट्र' व्यवहारखाते दिले गेले तेव्हा भारतीय राजकारणातून आपली ही एक प्रकारची उचलबांगडीच आहे याची जाणीव, याची बोच, बोचत असूनही यशवंतरावांना काहीही करता येणार नाही इतकी त्यांची अवस्था करून सोडण्यात आली होती!

यशवंतराव आपली ही राजकीय घसरगुंडी उघड्या डोळ्यांनी पाहत होते. घसरत चाललेच होते. त्यांची ती घसरण काँग्रेसच्या पराभवाने आणि जनता पक्षाच्या विजयाने आता तरी थांबेल असे माझ्यासारख्या निरीक्षकांना वाटत होते; परंतु येथेही पुन्हा कोणतीही आग्रही भूमिका घेण्यास यशवंतराव नुसते असमर्थच नाहीत तर अपात्रही ठरले आहेत! इंदिरा गांधींच्या नेतृत्वाची मीमांसा हा या लेखाचा विषय नाही; परंतु

आणीबाणीनच नव्हे तर काग्रेसफुटीपासून संतत बाईंनी पक्षाचे, पक्षनेतृत्वाचे, लोकांत काम करणाऱ्या नेत्याचे पद्धतशीर अवमूल्न चालविले होते. तरीही यशवतरावांच्या तोडून ब्र निघाला नाही आता इदिरा-नेतृत्व देशाने झिडकारले असतानाही यशवतराव बचकळधातच पडलेले आहेत. त्यांच्या मनाचा गोंधळ, कोडमारा पूर्वी होत होता तसाच चालू आहे. पधरा वर्षांपूर्वी दिल्लीच्या राजकारणात आलेले यशवतराव आज पधरा वर्षांनतरही तसेच सभ्रमात आहेत. तितकेच अनाग्रही आहेत केंद्राच्या पधरा वर्षांच्या राजकारणात दैदीप्यमान असे एकही यश यशवतरावाच्या पदरी नाही ! 'इदिराबाई, तुमच्यामुळे पक्षाची वासलात लागली, आता माफ करा. पक्षाला तुमची गरज नाही!' असं ठासून सागण्यास लागते तेवढे नेतृत्व आजही यशवंतरावांच्या जमेस नाही हे केवढे दुर्दैव आहे !' जवळजवळ सव्वा तप दिल्लीच्या राजकारणात घालविल्यानतरही आज यशवतरावाना अखिल भारतात डोक्यावर घेऊन नाचतील अशी अवस्था कॉंग्रेस पक्षाची नाही इदिरा—नेतृत्व बदनाम झालेले आहे. इंदिराविरहित कॉंग्रेस पक्ष निर्जीव कलेवरासारखा निपचित पडलेला आहे. त्यात प्राणसजीवनी ओतू शकणारा धन्वतरी यशवतराव झाले असते तर किती बरे झाले असते, परंतु आजही दिल्लीत पुन्हा सत्तासघर्ष कॉंग्रेसला पोखरतो आहे. अशा वेळी आग्रही भूमिका घेऊन, इंदिरेचा सपूर्ण प्रभाव तिच्या पराभवाचा फायदा घेऊन उखडून टाकण्याची नामी सधी यशवतरावांना आलेली असताना यशवंतरावाचे पाय पुन्हा लटपटत आहेत !

मला पक्षातून काढून टाकलेत तर त्याचे परिणाम फार वाईट होतील, असे इदिराबाईंनी बजावितांच यशवतरावाना 'पुन्हा बेरजेचे राजकारण आठवले असून 'मी कुणालाही पक्षातून काढण्याच्या मताचा नाही !' असे ते पत्रकारांना सागत आहेत. तीन तीन चौकशीमडळे आपल्याविरुद्ध बसली असताही इदिरा गाधी वर मान करून सार्वजनिक व राजकीय जीवनात मिरवू लागल्या आहेत. हजार कोटी रुपयाची बेकायदा संपत्ती गोतावळ्यानी जमा केल्याचा भयंकर आरोप तलवारीसारखा शिरावर टागलेला असताना 'मला अटक करून पहाच !' असे जाहीरपणे म्हणण्याची हिंमत त्या दाखवीत आहेत. आज पराभूत असतानाही यशवंतराव चव्हाण (आणि ब्रह्मानद रेड्डी) याच्या नेतृत्वाचा अवमान करण्यासाठी प्रत्येक पाऊल त्या उचलीत आहेत. कॉंग्रेसला नेतृत्व मीच देऊ शकते असा समज पसरवीत आहेत त्यासाठी पक्षाध्यक्षावर हात टाकणारी निदर्शने घडवीत आहेत. चंद्रजित यादवाना जाहीर मारहाण होत आहे आणि तरीही त्याच उत्तरप्रदेशाची अॅडहॉक प्रदेश कॉंग्रेस समिती नेमण्याचा अधिकार एकमताने इदिरा गांधीनाच देण्यात येतो आहे. असे सर्व राजकारण चालू असतानाही यशवतराव चुप्प आहेत. त्यांची बेलछीयात्रा इदिरा गाधीनी हिकमतीने रद्द करविली आहे 'इडिया अॅण्ड इदिरा आर सिनॉनिमस. व्हाटेव्हर हॅपन्स टू इंदिरा हॅपन्स टु इडिया!' हे १८ जून १९७५ रोजी ससदेच्या सेंट्रल हॉलमध्ये काग्रेस पक्ष बैठकीत यशवतरावानी मोठ्या निष्ठाप्रदर्शनाने काढलेले उद्गार आता भूत बनून त्यांच्याच राजकीय मानगुटीवर बसले आहेत. कीर्तिशिखरावर असलेल्या इदिरेने एकदा म्हटले होते—'हा सह्याद्रीचा सिंह म्हणे हिमालयाच्या रक्षणाला आला आहे. जरा थोडे थांबा आणि पहा या सह्याद्रीच्या सिंहाचा मी एक साधा उंदीर करून सोडते की नाही ते !' त्या अहंमन्य कपटनायिकेचा दारुण पराभव झालेला असूनही तिची तीच गुर्मी अजूनही कायम आहे. तरीही यशवंतराव आता चालून आलेली पक्षनेतृत्वाची सधी साधण्यास अपात्र ठरत आहेत ! कॉंग्रेस आज अर्धांगवायू झाल्यासारखी लुळी पडली आहे. यशवतनेतृत्वाला हे जबर आव्हान आहे; पण आपल्या ऐन उमेदीच्या काळातही अनेकानेक आव्हाने स्वीकारून आपले नेतृत्वकौशल्य अखिल भारतात प्रस्थापित करण्याच्या अनेकानेक सधी चालून आल्या असतानाही ज्या यशवंतरावांना त्या साधता आल्या नाहीत, ते यशवतराव आता आयुष्याच्या संध्याकाळी काही करून दाखवतील, आक्रमक भूमिका घेतील आणि कॉंग्रेसला या भीषण महासकटातून वाचवू शकतील अशी आशा करणे व्यर्थ होणार आहे.

## यशवंतराव उणे महाराष्ट्र म्हणजे एक शून्य

दहा वर्षे मुख्य मंत्रीपद आणि पंधरा वर्षे केंद्रीय मत्रीपद माणसाला निष्क्रिय, अकर्मण्य आणि दिशाहीन करून टाकतात काय ? या प्रश्नाचं उत्तर शोधले पाहिजे उलट अर्थानं असं म्हणता येईल की पचवीसच काय, काढून टाकलं नाही तर माणूस तहहयात मंत्री राहू शकेल; पण ते त्याच्या कर्तृत्वाचं नव्हे, अकर्मण्य सातत्याचही गमक ठरू शकेल. 'जिवत का आहात ? ' या प्रश्नाच उत्तर 'मेलो नाही म्हणून !' असं देता येत असलं तरी त्यातील कारुण्य आणि कीव ही कर्तृत्वाचा उपहास करणारी ठरतात हे विसरून चालणार नाही; पण यशवंतराव दिल्लीत आले ते महाराष्ट्राचे नेते म्हणून; वागले आणि वागविले गेले ते महाराष्ट्राचे नेते म्हणून; अपेक्षिले वा उपक्षिले गेले तेही महाराष्ट्राचे नेते म्हणूनच !

यशवतराव आणि इदिरा याच्यातील एक सवाद असा : प्रसग उत्तरप्रदेशच्या निवडणुका (१९७४) होण्याच्या सुमाराचा. यशवतराव इंदिराबाईंना म्हणाले—'तुमच राष्ट्रीय राजकारण काहीही असू देत, उत्तरप्रदेश तुमच्या हातातून जाणार नाही याची काळजी घ्या ! उत्तरप्रदेश विधानसभा हातची गेली तर ते महाग पडेल केंद्रात कितीही उच्च स्थान मिळाल तरी नेत्यान आपल्या राज्यातील आपलं मूळ स्थान कस अबाधित राखलंच पाहिजे !' इदिराबाई म्हणाल्या—'केव्हाही ! तुमच्या उदाहरणावरून ते दिसतच आहे की !' आज उत्तरप्रदेश विधानसभा इंदिराबाईंच्या आणि त्याच्या कॉंग्रेसपक्षाच्याही हातून गेला आहे. तरीही इदिरा गाधी झिंदाबाद या घोषणा चव्हाण नेतृत्व करीत असलेल्या भाववाढविरोधी मोर्च्यात निनादतात ! उत्तरप्रदेश हातचा गेला तरी इदिरा गाधीच भारतीय नेतृत्व विस्कटू देण्यास त्या तयार नाहीत. पडित नेहरूंचा उत्तर प्रदेशावर कोणताही पगडा नव्हता. तरीही ते अखिल भारतीय नेते होते ! उद्या महाराष्ट्र विधानसभेत कॉंग्रेसचा पराभव झाला तर यशवतराव चव्हाणानां कसे स्थान लाभेल ? विचार करून पाहण्यासारखा प्रश्न आहे. आजही यशवतरावाना न विचारता—पुसता इदिरा गाधीचा दौरा महाराष्ट्रात ठरला आहे. त्याच्या बरोबरीने यशवतराव अर्थातच राहणार नाहीत. त्याही सभा—सम्मेलनातून पुन्हा 'इदिरा झिंदाबाद' निनादेलच ! ४८ पैकी २८ जागा हरलेल्या महाराष्ट्रात कॉंग्रेससभा इदिरा गाधी घेणार आहेत. यशवंतरावाना हे असे धारिष्ट्य, ही अशी धडाडी, ही अशी धमक कधीच दाखवता आलेली नाही ! पधरा वर्षे केंद्रसत्तेत राहूनही यशवंतरावाचं नेतृत्व आजही महाराष्ट्राच्या वर कधी उचललच गेलेल नाही !

बदनाम इंदिरा नेतृत्व विधि—निषेधाची पर्वा न करता देशभर फिरून आपल पुनर्वसन करीत आहे आणि यशवतरावाचं नेतृत्व मात्र नुसती पडच नव्हे तर कचही खाऊन कोपऱ्यात दुबकून गेलं आहे ! इंदिराबाईचं पुनरागमन हे कॉंग्रेस—नाशाला निमंत्रण ठरणार आहे आणि यशवंतरावाच्या नेतृत्वाचं हे भीषण अवमूलन त्याच्या राजकीय अस्ताचा प्रारंभ ठरणार आहे ! आव्हान जबरदस्त आहे. ते पेलण्याची ताकद असलेलं नेतृत्व यशवतरावात मुळातच नाही ! 'यस्मिन्कुले त्वमुत्पन्नो, गजस्तत्र न हन्यते' असंच एरव्ही 'शूरोऽसि कृतविद्योऽसि कर्मनियोऽसि' वाटणाऱ्या या महाराष्ट्रपुत्रकाबाबत म्हणावं लागणार आहे ! यशवंतराव आक्रमक नव्हते, आक्रमक नाहीत, आक्रमक होऊही शकणार नाहीत आणि हीच त्यांच्या राजकीय जीवनाची शोकांतिका ठरणार आहे ! □

# आजही शांताबाई पाटील म्हणतात—

# He will definitely surpass his colleagues....



**मुलाखत : अनिल किणीकर**

'तसा माणूस जबर जिद्दीचा ! आणि त्यात तो मराठमोळा — म्हणूनच की काय अखिल भारताच्या राजकारणात आजही तो मोठ्या आत्मविश्वासाने उभा आहे, उमेदीने उभा आहे. स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात भारतीय राजकारणात महाराष्ट्राचे जसे नेतृत्व होते, तसे स्वातंत्र्यानंतरच्या ३० वर्षांत केवळ यशवंतरावच उभे आहेत, and I think, he will definitely surpass his colleagues...' हे उद्गार आहेत हुतात्मा पिंगळे यांच्या नातीचे, म्हणजेच पुणे जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष कै. आत्मारामबापू पाटील यांच्या पत्नी शांताबाई पाटील यांचे.

शांताबाई पाटील यांना भेटण्याची अनेक कारणे होती. त्यापैकी मुख्यत: यशवंतरावांची कॉलेज-करिअर ज्यांनी फार जवळून पाहिलेली व अनुभवलेली अशा ज्या व्यक्ती आहेत त्यांपैकी शांताबाई ह्या प्रमुख होत. प्रमुख अशा अर्थाने की यशवंतराव इंटरला असताना पुण्याला आले ते आत्मारामबापू–शांताबाई यांच्याकडेच आणि त्यानंतरची तीन वर्षे ते त्यांच्याकडेच राहिले होते. यशवंतरावांच्या जीवनातील ऐन उमेदीतील वर्षे अगदी जवळून अनुभविण्याचा योग त्यामुळेच शांताबाईंना लाभला.

तशा शांताबाई भाग्यवानच ! हुतात्मा पिंगळे यांच्या नात म्हणून राजकारण, देशप्रेम वगैरे गोष्टी नेहमीपेक्षा लवकरच ज्ञात झाल्या. त्यातून आंतरजातीय विवाह केलेला, त्यामुळे सामाजिक जाणिवेच्या संदर्भातील परिपक्वताही अधिक वेगाने आली. विवाहानंतरच्या काळात आत्मारामबापूंसारखा मुरब्बी माणूस जीवनसाथी, त्यामुळे विविध प्रवृत्तींच्या माणसांचा संपर्क आणि काही प्रमाणात प्रत्यक्ष कार्य, म्हणूनच काँग्रेसच्या राजकारणाचा जवळून परिचय.

यशवंतरावांच्या 'भवितव्याविषयी आपण काही सांगू शकाल का ?' असे मी त्यांना विचारले तेव्हा त्या मिस्किलपणे हसल्या आणि म्हणाल्या, 'मी सुरुवातीलाच तुम्हाला सांगितलंय् की He will surpass his colleagues... अर्थात आता ओघानं आलंय की इंदिरा गांधींना सुद्धा ! राजकीय मतप्रणालीच्या संदर्भात यशवंतराव तसे धोरणीच–अगदी सुरुवातीपासूनच. १९३८ ते १९४१ ही तीन वर्षे ते आमच्याकडेच राहिले होते. माणूस अत्यंत गरिबीतून आलेला, त्यामुळेच शिक्षणाची कळकळ, देशस्वातंत्र्याची निष्ठा आणि आर्थिक परिस्थितीमुळे निर्माण झालेली महत्त्वाकांक्षी वृत्ती ! घरची परिस्थिती इतकी गरीब की, अक्षरश: अठराविश्वे दारिद्र्य ! यशवंतरावांचे वडील त्या वेळी बेलिफ होते आणि आई भांडी घासून पाच मुलांच्या संसाराला हातभार

लावायची. शिक्षणासाठी यशवंतराव पुण्याला आले तेव्हा घरचा अजिबात आधार नाही याची जाणीव ठेवूनच. पुण्यात आले तेव्हा पैसा नाही, कपडे नाहीत– कपडे तर एक विजार, एक शर्ट एवढेच ! तेच धुऊन घालायचे (तुम्हाला फक्त आगरकरांचीच आठवण येते ! ) आणि तेही फाटेपर्यंत वापरायचे. फाटले की ते बोरगावला परत जायचे, आप्तेष्टांपैकी कोणी तरी त्यांना मदत करीत असत आणि पुन्हा पुण्यात परत ! पैसे नसत तेव्हा सर्वत्र पदयात्रा. अशाही परिस्थितीला न डगमगता, त्यांनी शिक्षणक्रम चालू ठेवला तो एकाच ध्येयाने आणि ते म्हणजे आयुष्यांत आपल्याला काही करायचे आहे आणि इतरांसाठी काही करायचे आहे, त्या दृष्टीनेच आपण आपल्या आयुष्याला दिशा दिली पाहिजे, अर्थ आणला पाहिजे; ह्या भूमिकेतूनच त्यांनी कॉलेजजीवनापासूनच राजकारणाची सुरुवात केली. नेतृत्वाचे गुण तसे त्यांच्याकडे होते, म्हणूनच कॉंग्रेसपक्षाच्या संघटनेचे काम त्यांनी विद्यार्थीदशेपासूनच सुरू केले. यशवंतराव अभ्यासात तसे सामान्य विद्यार्थीच होते; परंतु राजकारण आणि प्रत्यक्ष कार्य ह्याकडे अधिक ओढा असल्यामुळे सातारा–कोल्हापूर ह्या भागात त्यांनी त्या काळी कॉंग्रेसची मुळं किती खोलवर रुजविलेली होती हे आजही जाणवल्याशिवाय राहात नाही. कॉलेजला सुट्टी झाली की हुल्लडपणा किंवा मजा करणे ह्या कल्पनांनी त्यांना कधीच मोह घातला नाही. ते तडक गावी जात असत आणि पक्षकार्य करीत असत. त्या वेळेस कूपर–कल्याणी ह्यासारख्या धनिकांच्या – भांडवलदारांच्या विरोधास व प्रलोभनास बळी न पडता स्वीकारलेल्या कार्याचा ते पाठपुरावा करीत राहिले. त्यातच त्यांच्या ध्येय–धोरणाची कसोटी होती व त्यातूनच त्यांचे नेतृत्व उदयास आले. त्यातच भर म्हणजे स्वतंत्र व साकल्याने विचार करण्याची आणि भविष्यात डोकावून पाहण्याची क्षेप. अर्थात् काही वेळा माणसाचे आडाखे चुकतात. राजकारणच असते ते, त्याला नाइलाज असतो. १९४२ च्या सुमारास कॉंग्रेसमध्ये मतभेद चालू होते. देशाचे स्वातंत्र्य कोणत्या विचारप्रणालीच्या आधारे लवकरात लवकर मिळवायचे आणि त्या संदर्भातील पक्षाचे ध्येय–धोरण काय असावे ह्याविषयीचे. साहजिकच मतभेदाचे पर्यवसान कॉंग्रेसमधील एक गट–रॉयवादी विचारसरणीचा एक गट–बाहेर पडला. त्यामध्ये लक्ष्मणशास्त्री जोशी, बॅ. तारकुंडे, गोवर्धन पारीख इ. मातबर मंडळीचा समावेश होता.' 'तर मग डाव्या विचारसरणीचे असूनही यशवंतराव मवाळ का आहेत ? ' माझा मधेच प्रश्न.

'– तर यशवंतरावाचा 'रॉयवादी' गटात समावेश करणे तितकेसे बरोबर नाही. ते रॉयवादी आहेत असा एक समज आहे. त्यामुळेच वरील मंडळीनाही यशवंतराव आपल्याबरोबर बाहेर पडतील असे जे वाटले ते चुकीचे ठरले. आता आणीबाणी, लोकसभा-निवडणुका या संदर्भातील. पहा ना– जनतेलाच काय पण जयप्रकाश, जगजीवनराम यांच्यासारख्या राजकारणी नेत्यांना वाटत होते की यशवंतराव कॉंग्रेस सोडतील, त्यांनी पक्षातून बाहेर पडावे. अर्थातच ही सर्वांचीच अपेक्षा फोल ठरली ! ह्याला कारण 'पक्ष ही समान विचारप्रणालीच्या लोकांची संघटना असावी' हा त्याचा दृष्टिकोन. अर्थात् त्यामुळेच त्यांच्यावर बरी-वाईट टीका सतत होत राहते; तशी ती त्या वेळीही झाली होती. द्वैभाषिक राज्याचा प्रश्न घ्या किंवा १९६९ ची कॉंग्रेस विभाजनाची घटना घ्या, यशवंतरावांनी जनमानसापेक्षा पक्ष–संघटनेच्या विचारसरणीला अधिक महत्त्व दिलेले दिसते.'

'– याला निष्ठावान् म्हणायचे की संधिसाधूपणा म्हणायचा ? ' माझ्या ह्या प्रश्नावर बाई जरा नाराज दिसल्या; परंतु लगेच सावरून त्या सांगू लागल्या, 'तुम्ही शब्द कुठलाही वापरा, परतु विचार केरा की राजकारण हे काही वाटते तेवढे सरळ, सुसंगत असते असे नव्हे. राजकारणात धोरणीपणा' आवश्यक आहे आणि तो यशवंतरावांकडे निश्चितपणे आहे असे मला वाटते. आता त्या वेळच्या 'पत्री' सरकारचे किंवा शे. का. पक्षाचे उदाहरण घ्या. देशामध्ये परकी सत्ता आहे, तेव्हा सरकारचे जेवढे नुकसान करता येईल, सार्वजनिक मालमत्ता लुटता येईल तेवढा प्रयत्न करावा अशा क्षुद्र दृष्टिकोनातून कॉंग्रेसमधील एका गटाने 'पत्री' 'सरकारची कल्पना काढली व त्यानुसार गुंडगिरी चालू केली. तेव्हा यशवंतराव त्यात सामील होतील असे त्या गटाला वाटले; परंतु 'सरकार परकी असले तरी देश आपला आहे, तेव्हा नुकसान पर्यायाने आपलेच आहे' या सुज्ञ दृष्टिकोनातून त्यांनी 'पत्री' सरकारची कल्पना धुडकावून लावली. त्याबाबतचा स्पष्ट विचार त्यांनी सहकार्यांना सांगितला, वास्तविक 'स्वातंत्र्य-कल्पना' आणि 'पत्री सरकार' याचा अन्योन्य संबंध काहीही नाही; परंतु तरीही तशी 'इमेज' मात्र तयार झाली आहे. तारुण्याला आव्हान देणारी, रक्त सळसळून टाकणारी, थ्रिल देणारी 'पत्री' सरकारची कल्पना उष्टी होती; परंतु तरुण वयात असतानाही, यशवंतरावांनी धोरणीपणा दाखवून ती कल्पना फोफावू दिली नाही.

'मी आक्रमक धोरण स्वीकारणार !' असे यशवंतराव आज जरी म्हणत असले तरी तसा त्यांचा स्वभाव, धोरण पूर्वीपासूनच नाही आणि आताही त्यांच्या 'आक्रमक' वृत्तीला तसा विध्वंसक मार्ग अपेक्षित नाही, तर विधायक मार्गाने साधता येईल अशीच ती आक्रमकता असेल–'

'शे. का. पक्षाच्या संदर्भात– ?'

'–त्याबाबतच मी सांगणार आहे. साधारण १९५० च्या सुमारास महाराष्ट्र कॉंग्रेसमध्ये डाव्या विचारसरणीचा गट प्रबळ होऊ लागला आणि मतभेद तीव्रतेने वाढू लागले डाव्या विचारसरणीच्या लोकानी थोडी टोकाची भूमिका घेतली की, हा देश शेतीप्रधान आहे, तेव्हा 'कम्युनिझम'च्या धर्तीवर आपण पक्ष काढावा आणि त्यातून 'शेतकरी–कामकरी पक्ष' जन्मास आला. देशाच्या राज्यकारभारात राबणाऱ्या शेतकऱ्यांना आणि कामकरी मजुरांना देशाच्या राजकारणात आवश्यक ते प्राधान्य आणि महत्त्व मिळत नाही आणि ते मिळणे आवश्यक आहे, तरच ह्या देशातील शेतकरी सुखासमाधानाने राहू शकेल; परंतु ह्या हेतूसाठी कॉंग्रेसमधून बाहेर पडून नव्या पक्षाच्या स्थापनेने कार्यभाग साध्य होईल असे यशवंतरावाना वाटत नव्हते आणि म्हणूनच त्यांनी शे. का. पक्षाच्या कल्पनेलाही विरोध केला; परंतु तरीही जेधे, मोरे यानी पुढाकार घेऊन शे. का. पक्षाची स्थापना केली. त्या वेळेस कृष्णराव धुळप, आत्मारामबापू पाटील, तुळशीदास

जाधव, आनंदराव चव्हाण याच्याबरोबरच यशवंतराव मोहिते, अण्णासाहेब शिंदे, कारखानीस, र. के. खाडिलकर इ. प्रखर बुद्धिवादी मंडळी काँग्रेसला रामराम ठोकून शे. का. पक्षात सामील झाली होती; परंतु यशवंतराव हे काँग्रेसच्या बाजूने खंबीरपणे उभे राहिले. एवढेच नव्हे तर मोहिते, शिंदे, कारखानीस, खाडिलकर इ. ना त्यांनी संधी मिळताच प्रेमाच्या अधिकाराने काँग्रेसमध्ये परत आणले. माणसांची पारख हा यशवंतरावांचा मोठा गुण. परिणामी बाळासाहेब देसाईसारखे गावात वकिली करणारे लोक पक्षात आणले, त्याना कामाची संधी दिली आणि पक्षाची मदार अशा कार्यकर्त्यांवर सोपवून दिली. एखादा कोळी जाळे विणतो त्याप्रमाणे त्यांनी काँग्रेस पक्षाचे जाळे विणले. मतभेद होऊनही आपापसात कटुता निर्माण होऊ दिली नाही की मनात कोणाविषयी आकस ठेवला नाही. लहानपणापासूनच त्यानी अनेक झंझावाती वादळाना खंबीरपणे तोंड दिले आहे, त्यामुळेच की काय माणूस तसा लेचापेचाही झाला नाही आणि आत्यंतिक टोकाचाही होऊ शकला नाही. संधीची वाट पाहणे आणि वेळ येताच महत्त्वाकांक्षा पूर्ण करणे यालाच राजकारण म्हणतात...'

'परंतु अशा राजकारणामुळेच यशवंतरावाचे नेतृत्व महाराष्ट्राबाहेर जाऊ शकले नाही. २५–३० वर्षे सत्तेवर राहूनही राष्ट्रीय-नेते (National leader) होऊ शकले नाहीत असे वाटते. महाराष्ट्रातील सर्व थरातील जनमानसात यशवंतरावाना एक स्थान होते; परंतु आता तर बहुजनसमाजही त्यांच्यापासून दूर, जाऊ लागला आहे असे वाटते. तुमचे मत काय आहे?'

'अहो, पुन्हा मी सुरुवातीचेच वाक्य सांगते—**He will surpass his colleagues.** –आता काय आहे? काँग्रेससारख्या प्रमुख विरोधी पक्षाचे संसदेतील नेतृत्व कोणाकडे आहे? यशवंतरावांकडेच ना? याला तुम्ही अखिल भारतीय पातळीवरील नेतृत्व म्हणणार की नाही? आंध्रमधील लोकसभेच्या सर्व जागा जिंकूनही तेथील उमेदवार विरोधी पक्षप्रमुख का होऊ शकला नाही? वस्तुस्थिती काय आहे की, गेल्या १० वर्षांत पर्यायी नेतृत्वाला वावच मिळालेला नाही. मग तो विरोधी पक्षाला असो किंवा काँग्रेसमधील कोणा व्यक्तीला असो. इंदिरा गांधींनी काँग्रेसला स्वत:च्या ताब्यात एवढे ठेवले होते की, त्यांचा पराभव झाल्यानंतर काँग्रेस उभी राहील की नाही, याची शंका होती; परंतु यशवंतरावांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून काँग्रेसला तर सावरलेच आणि स्वत:लासुद्धा पुन्हा एकदा पक्षातील प्रमुख स्थान संपादन केले आहे. इथे एका द्रष्टेपणाची आवश्यकता असते आणि तसे द्रष्टेपण असल्यामुळेच यशवंतरावाचे राजकीय भवितव्य निश्चितच आशादायक आहे.'

'– म्हणजे यशवंतराव–इंदिरा गांधी आता संघर्ष घडला तरी? ह्या संघर्षातून काँग्रेस पुन्हा फुटण्याची शक्यता आहे आणि तसे झाले तर विकल,गलितगात्र काँग्रेसमध्ये यशवंतरावांचे मुळात भवितव्य ते काय असणार आणि ते कितपत आशादायक असेल?'

'–संघर्षाची शक्यता नाकारता येत नाही आणि तरीही यशवंतरावाच्या प्रभावानुसार ते काँग्रेसमध्येच राहतील...परवाच्या मुंबई अधिवेशनात यशवंतरावाचे उद्‌गार पहा; 'काँग्रेसचा जन्म मुंबईत झाला आणि पुनर्जन्मही मुंबईतच होत आहे.' त्यामुळेच महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर काँग्रेस आणि यशवंतराव पुन्हा उभे राहतील–अर्थातच सत्तेवर तेच राहणार!'

'आणखीही एक शक्यता सध्या बोलून दाखविण्यात येते आहे' आणि ती म्हणजे कदाचित यशवंतरावच जनता पक्षात प्रवेश करतील, त्याबाबत–'

'– छे हो! अजिबात शक्यता नाही. तसे त्यांच्या मनातही नसेल. तशी लहानपणापासूनच त्यांच्या पक्षनिष्ठेची एक प्रकारची Consistancy आहे. आता ह्या पक्षनिष्ठेतूनच त्यांनी संघटनेतील अनेक चुकांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असेल– अगदी आणीबाणीतीलसुद्धा! मानवी स्वभावानुसार काही चुका होतात; त्याचे बरे–वाईट परिणाम स्वीकारण्याससुद्धा एक प्रकारची परिपक्वता असावी लागते. ती maturity यशवंतरावांकडे त्याच्या गरीबीतूनच त्याना मिळालेली आहे. त्यामुळेच हे 'शेतकऱ्याचे पोर' महाराष्ट्राबाहेरही उभे आहे– तसे दुसरे कोण आहे, सांगा ना!'

यशवंतरावांना शांताबाई अजूनही आपुलकीने 'पोर' म्हणत असाव्यात – इतक्या लहानपणापासून त्यांच्याशी नात्याचा संबंध होता त्याचा. 'कष्टाळू, अभ्यासू आणि महत्त्वाकांक्षी वृत्तीच्या यशवंतरावांना देशाच्या राजकारणात अजून एक opportunity मिळणार आहे आणि तीच त्यांना आतापर्यंतच्या करिअरमधील सर्वोच्च स्थान प्राप्त करून देईल!' असे शांताबाई थोड्याशा आवेशानेच म्हणाल्या.

शांताबाई पाटील– वय वर्षे ७० च्या आसपास– सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या अजूनही जागरूक असलेल्या एका सामान्य स्त्रीच्या मुलाखतीतून एक प्रकर्षाने जाणवले: यशवंतराव तसे संपणाऱ्यातले नव्हते (आणि त्यामुळेच की काय ते आणखी एका सर्वोच्च opportunity ची धीराने वाट पाहात असतील!)

□


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या, तपशिलासह लिहा. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्याना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**BHARAT AYURVEDASHRAM (M) P. O. KATRISARAI (GAYA)**

# दिल्ली गेली....

## जगन फडणीस



---

१

---

इंदिरा गांधींच्या 'हम करेसो' प्रवृत्तीविरुद्ध आवाज उठवून कार्यकर्त्यांना काही प्रमाणात आपल्याबरोबर घेण्याचे सामर्थ्य दोन नेत्यांमध्येच होते. यशवंतराव चव्हाण व जगजीवनराम हे ते दोन नेते ! या दोन नेत्यांनी इंदिरा गांधी यांच्या प्रवृत्तीविरुद्ध उभे राहण्याचे ठरविले असते तर देशाचे चित्र वेगळे दिसले असते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाला आणीबाणीच्या लांच्छनास्पद अवस्थेतून जावे लागले नसते; परंतु यशवंतराव व जगजीवनराम आपल्या महत्त्वाकांक्षेशी इतके एकरूप झाले की, त्यामुळे ते एकमेकांचे प्रतिस्पर्धी झाले. यशवंतराव १९६९ मध्ये सिंडिकेटकडे गेले तर ते तिकडे गेले म्हणून जगजीवनराम यांनी इंदिरा गांधींचा तंबू जवळ केला. नंतर यशवंतराव इंडिकेटकडे गेले आणि आपणच इंदिरा गांधींचे अनुयायी आहोत, मी नेहमीच इंदिराजींच्या बरोबर राहिलो आहे, अशी अनन्यनिष्ठेची भूमिका यशवंतराव वठवीत राहिले. जगजीवनरामांविषयी इंदिरा गांधींना संशय वाटत आहे हे पाहून आपणच त्यांचे खरे हितकर्ते आहोत हे दाखविण्याचा यशवंतरावांचा खटाटोप असावयाचा ! दोन मातब्बर नेते आपापसात झुंजत बसले. त्याचा फायदा घेऊन इंदिरा गांधी पक्षावरची पकड अधिकाधिक घट्ट करीत चालल्या होत्या. यशवंतराव चव्हाण व जगजीवनराम एक होऊन काही हालचाल करते तर इंदिरा गांधींना पक्ष ही आपली मिरासदारी करता आली नसती.

# महाराष्ट्र जाण्याच्या मार्गावर....!

## यशवंतराव चव्हाण यांच्या कृष्णा-कोयना ते यमुना आणि यमुना ते कृष्णा-कोयना राजकीय वाटचालीचा एक शोध ..

पंतप्रधान या नात्याने इंदिरा गांधी यांच्याकडे देशाची सारी सूत्रे आलीच होती; परंतु पक्षावर पूर्ण ताबा त्यांना १९६९ च्या आधी मिळविता आला नव्हता. १९६९ साली गांधींनी पक्षावर आपले वर्चस्व निर्माण केले ! ज्या पद्धतीने हे वर्चस्व निर्माण केले त्यावेळी कॉंग्रेसजनांना त्याचे गांभीर्य जाणवले नव्हते. सरकार व पक्ष एकाच व्यक्तीच्या हातात जातो तेव्हा त्या व्यक्तीची हुकूमशाही प्रवृत्तीच्या दिशेने वाटचाल सुरू होते. वेळीच या वाटचालीला पायबंद घातला नाही तर हुकूमशाही प्रवृत्ती जोमाने फोफावू लागतात.

पक्ष व सरकार यांची सर्व सूत्रे गांधींकडे आली ही गोष्ट हुकूमशाही प्रवृत्ती वाढविण्यास कारणीभूत होती. त्याचप्रमाणे इंदिरा गांधी यांची हुकूमशाही प्रवृत्ती वाढण्यास आणखी एक कारण होते. त्याचा फारसा कोणी विचारच केला नाही. गांधींना घराण्याचा अभिमान होता. नेहरू घराण्याचा उल्लेख त्या अनेक वेळा करीत. घराण्याचा अभिमान बाळगणाऱ्या व्यक्तीकडे पक्ष व सरकार यांची सर्वंकष सत्ता असणे हाही लोकशाहीला धोका ठरतो. घराण्याच्या अभिमानापोटीच नेहरू घराण्याकडे सत्ता असावी ही लालसा इंदिरा गांधींना लागली होती. त्यांना नेहरू घराण्याचा केवढा अभिमान वाटत होता याचे उदाहरण त्यांनी भरलेल्या उमेदवारी अर्जात दिसून येते. भारतात विवाहानंतर मुलीला तिच्या पतीचे नाव-आडनाव लागते. त्यानुसार गांधींचे नाव इंदिरा फिरोज गांधी असे राहणे स्वाभाविक होते; पण गांधींनी आपल्या नावाची नोंद इंदिरा नेहरू गांधी अशी केली होती. गांधींना घराण्याचा अभिमान किती वाटत होता याची कल्पना यावरून येईल. त्याचप्रमाणे श्रीमती इंदिरा गांधी यांनी आपल्याजवळ केलेली माणसे कोण होती ? काश्मिरी ब्राह्मण ! टिळक-गाडगीळ घराण्यातील वारस अशासारख्यांना त्यांनी जवळ केले होते. विनोबा व इंदिरा गांधी यांची जवळीकही का निर्माण झाली ? संरक्षणमंत्री जगजीवनराम यांनी त्याचे उत्तर दिले आहे. 'देशाच्या पंतप्रधानपदी ब्राह्मणव्यक्तीच असावी असे विनोबा भावे यांना वाटते !' असे जगजीवनराम यांचे मत आहे. ज्या व्यक्तीची घराण्यांबाबत अशी भक्ती असते त्या व्यक्तीकडे पक्ष व सरकार यांची सर्व सूत्रे एकवटली की त्या व्यक्तीकडून हुकूमशाही मार्गाची वाटचाल होणे स्वाभाविक आहे' ही वाटचाल करताना त्यांनी गरिबांच्या हिताच्या कार्यक्रमाचा जयघोष चालविला आणि गरीब-दलितवर्गाचा पाठिंबा मिळविला. 'या देशात गरिबांचे कल्याण, समाजवाद यांच्या नावाने हुकूमशाही प्रवृत्ती निर्माण होतील !' असे एम. एन. रॉय यांनी १९५० साली कलकत्त्याच्या भाषणात म्हटले होते. त्याचेही प्रत्यंतर पाहावयास मिळते. इंदिरा गांधींनी हा मार्ग आक्रमण्यास सुरुवात केली होती याची अनेक उदाहरणे पाहावयास मिळतील. पक्षातील लोकशाही त्यांनी धाब्यावर बसविली. पक्षांतर्गत विचारविनिमय बंद पडला होता. इंदिरा गांधींच्या इच्छेनुसारच पक्ष चालला होता.

लोकसभा अधिवेशनाच्या तोंडावर वटहुकूम काढले जात होते. इतकेच नव्हे तर शुक्रवारी अधिवेशन संपल्यावर पुढच्या आठवड्याचे कामकाज सोमवारी सुरू होण्यापूर्वी शनिवार-रविवारी वटहुकूम निघाले आहेत.

ही सर्व लक्षणे लोकशाहीच्या निकोप वाढीची बिलकूल नव्हती. तरीही काँग्रेसजनानी त्याविरुद्ध आवाज उठविला नव्हता. पक्ष ताब्यात आल्यावर विरोधकाना दडपण्यासाठी देशामध्ये आणीबाणी लागू करण्यत आली. आणीबाणीचा निर्णय घेतानाही मत्रिमंडळाला विश्वासात घेतले नव्हते. काँग्रेसला महात्मा गांधीचा वारसा आहे. महात्मा गांधीनी देशाला निर्भय बनविले; परंतु गांधीचा वारसा सागणारे नेते इंदिरा गांधीच्या मनमानी कारभाराविरुद्ध अवाक्षरानेही बोलत नव्हते; कार्यकर्त्यांना जागरूक करीत नव्हते. गांधीच्या 'हम करे सो' प्रवृत्तीला वेळीच पायबंद घातला असता तर आणीबाणी लादण्याचे धारिष्ट्य त्यांना झालेच नसते. अन्याय होतो किंवा एखादी अपप्रवृत्ती निर्माण होते तोच क्षण प्रतिकाराचा असतो हा क्षण चुकला की, अन्याय वा अपप्रवृत्ती फोफावतात! हा प्रतिकार यशवंतराव व जगजीवनराम यांनी मिळून केला असता तर लोकशाही मूल्याची जपणूक करण्यासाठी प्रयत्न केल्याचे त्याचे श्रेय इतिहासात नमूद झाले असते.

पक्षांतर्गत लोकशाही नाहीशी करून सर्व सत्ता आपल्या हातात घेणाऱ्या व आपल्यानतर आपल्या घराण्याकडे ही सत्ता जाईल अशी व्यवस्था करणाऱ्या इंदिरा गाधीना साथ दिल्याबद्दल इतिहास या दोघाना आता दोषच देईल! जगजीवनराम याच्याविषयी थोडे वेगळे निकष लावले जातील. मात्र यशवतराव चव्हाण याना तोही लाभ मिळणार नाही! विनोबांच्या सल्ल्यामुळे इदिरा गांधीनी निवडणूक घेण्याचे ठरविले. त्याचप्रमाणे आणीबाणीच्या धाकात आपण विजयी झालो तर लोकाचा आणीबाणीला पाठिबाच आहे असे जगाला सागून पुढच्या काळातही सत्ता आपल्या हाती ठेवण्यासाठीही इदिरा गाधीनी निवडणूक घेण्याचे ठरविले. निवडणुकीच्या निमित्ताने आणीबाणी शिथिल होताच जगजीवनराम यानी संधी साधली व काँग्रेस पक्ष सोडला! यशवतराव चव्हाण यानीही आपल्याबरोबर बाहेर पडावे याकरिता जगजीवनराम यानी प्रयत्न केला; परंतु त्याला यश आले नव्हते. जगजीवनराम यानी पक्ष सोडण्याचा धोका पत्करला होता. यशवतराव चव्हाण याच्या राजकीय जीवनात निश्चित सत्ता-लाभाशिवाय अशा प्रकारचा धोका त्यांनी पत्करला आहे असे दिसून येत नाही. निश्चित सत्ता-लाभ असेल तेव्हा यशवंतराव कशाशीही तडजोड करतील! सयुक्त महाराष्ट्राच्या वेळी यशवतरावानी मोरारजीना जवळ केले. महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे आहेत अशी भूमिका घेऊन मुख्य मत्रीपद मिळविले. भविष्यकाळात पतप्रधानपद देण्याचे आश्वासन मिळताच १९६९ मध्ये यशवतराव चव्हाण सिंडिकेट-काँग्रेसबरोबर गेले. काँग्रेसमधील सत्तास्पर्धेत सिंडिकेटचा पराभव होताच यशवंतरावानी सिंडिकेटला सोडचिठ्ठी दिली आणि हनुमताच्या वशाला शोभेल अशी निष्ठा इदिरा गाधीच्या चरणी वाहिली! मार्च १९७७ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव होईल याचा अदाज यशवंतरावांना आला असता तर ते जगजीवनराम यांच्याप्रमाणेच काँग्रेस सोडून बाहेर पडले असते. १९६९ च्या घटना ओझरत्या जरी नजरेसमोर आणल्या तरी त्याचा काँग्रेसत्याग झाला असता असे मानण्यास जागा राहते! सध्या काँग्रेस पक्षातील भोवऱ्याकडे खेचले जाणारे हे व्यक्तित्व सभ्रमात पडलेले आहे; परंतु या व्यक्तिमत्त्वाला हा सभ्रम काही नवा नाही. सयुक्त महाराष्ट्राच्या झंझावाती काळात यशवतरावाचे नेतृत्व सभ्रमातच होते. किंबहुना त्याच्या राजकीय उदयापासूनच या संभ्रमाला आरभ झालेला दिसतो.

---

## २

---

संयुक्त महाराष्ट्राच्या महाभारतामुळे यशवतराव चव्हाण याचे नेतृत्व उदयास आले. त्यानतर महाराष्ट्राचे नेतृत्व म्हटले की, यशवतराव चव्हाण यांचेच नेतृत्व, असे ठरून गेले. यामुळे सत्तास्पर्धेमागील घटनाचा आढावा घेताना यशवतराव चव्हाण याच्या संपूर्ण राजकीय जीवनाचाही विचार करावा लागेल. यशवतरावाचे नेतृत्व तत्त्वाधिष्ठित बैठकीमुळे पुढे आले की परिस्थितीशी तडजोड करीत मिळालेल्या सधीतून पुढे आले? परिस्थितीला वळण देत त्यांचे नेतृत्व घडले की प्रवाहाबरोबर जाऊन हाताला मिळेल ते पकडीत पकडीत त्याचे नेतृत्व पुढे आले, हेही पाहावे लागेल. मिळालेल्या सधीचा पुरेपूर उपयोग करून त्यानी आपले नेतृत्व वर्धिष्णु केले. भाषावार प्रातरचना करण्याचे ठरले तेव्हाच महाराष्ट्राला न्याय मिळाला असता तर महाराष्ट्राच्या नेतृत्वाची जडणघडण वेगळीच बनली असती

महाराष्ट्रात यशवंतरावानी आपले नेतृत्व खऱ्या अर्थाने पधरा वर्षे टिकवून धरले. १९६९ मध्ये काँग्रेस फुटली त्या सुमारास त्यानी जी भूमिका स्वीकारली त्यामुळे त्याच्या स्थानाला धक्का बसला आणि त्याच्या नेतृत्वाच्या वाढीला आळा घातला गेला!

विशाल द्विभाषिकाचे यशवंतराव मुख्यमत्री झाले. त्यानतर महाराष्ट्राची निर्मिती झाली. सयुक्त महाराष्ट्राचा मगल कलश यशवतरावानी आणला असे वातावरण निर्माण करण्यात आले, पण ती वस्तुस्थिती नाही. त्याची चर्चा पुढे केली आहे. चीनच्या आक्रमणामुळे संरक्षणमत्री म्हणून यशवतरावांची नेमणूक झाली. चिनी आक्रमणामुळे ते अखिल भारतीय पातळीवरील राजकारणात ओढले गेले. अभ्यासू वृत्तीमुळे सरक्षणमत्रीपदाची त्याची कारकीर्द यशस्वी ठरली. सैन्यात ते लोकप्रिय झाले. त्यामुळे लष्करात असलेले तणाव यशवतरावांनी दूर केले असे बी. एन्. मलिक यांनी आपल्या The Chinese Betrayal या पुस्तकात म्हटले आहे. संरक्षणमंत्री म्हणून त्यांचा लौकिक वाढू लागला आणि राजनीतिज्ञ नेहरूनतर कोण या प्रश्नाचे उत्तर शोधू लागले, तेव्हा त्यानी नेहरूनतर यशवंतराव चव्हाण याच्या नावाचा विचार केला नेहरूनंतर पंतप्रधान होण्यास चव्हाण ही योग्य व्यक्ती असल्याचा अभिप्राय 'After Neharu Who?' चे लेखक वेल्स हँगेन यानी दिला होता. फ्रँक मोराइस, एन. जे नानपोरिया यांच्यासारख्या संपादकानी नेहरूनतर पंतप्रधान होण्यास

चव्हाण लायक आहेत व ते चव्हाण यांना शक्यही होईल असे नेहरूंच्या हयातीत म्हटले होते. कॉंग्रेसमध्ये फूट पडण्यापूर्वी वर्ष–दीड वर्ष आधी जयप्रकाश नारायण यानीसुद्धा पंतप्रधानपदी यशवंतराव चव्हाण यांची निवड व्हावी असे आपले मत मुबईतील एका समारंभात व्यक्त केले होते.

नाणावलेल्या अनेक व्यक्ती, विचारवंत पत्रकार नेहरूनंतर यशवंतराव चव्हाण याच्या नावाचीच चर्चा करीत होते, परंतु नेहरूनंतर लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. शास्त्रींनी पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर काही महिन्यांतच शास्त्रींना हृदयविकाराचा दुसरा झटका आला. 'आपण या आजारानंतर दोन-तीन वर्षेच जगलो तर माझ्यानंतर इंदिरा गांधी पंतप्रधान होतील व पाच-सहा वर्षे जगलो तर आपल्यानंतर यशवंतराव चव्हाण पंतप्रधान होतील' असे लालबहादूर शास्त्री यांनी म्हटले होते. ( India After Nehru. – कुलदीप नायर ). नेहरूंच्या हयातीपासून यशवंतरावांचे नाव पंतप्रधानपदासाठी घेतले जाऊ लागले. तेव्हा त्याच सुमारास यशवंतरावावर प्रांतीयतेचा आरोप करण्यात येऊ लागला. 'माझ्या राजकारणाचा पाया महाराष्ट्रात आहे हे मी नाकारू शकत नाही; पण मी महाराष्ट्राचाच विचार करतो असे नाही!' असे उत्तर यशवंतराव या आरोपासंबंधी देत होते. 'स्वातंत्र्याच्या चळवळीत प्रांताचा विचार कोणाच्या मनात येत नव्हता. स्वातंत्र्यनंतर–विशेषतः अखिल भारतीय पातळीवरील नेतृत्व अस्तगत झाल्यानंतर–परिस्थिती बदलत गेली. प्रांताप्रांतातून नेतृत्व पुढे येऊ लागले. त्या नेतृत्वाबरोबर त्याच्या प्रांताचाही विचार केला जाऊ लागला. माझ्यावर प्रांतीयतेच्या शिक्का मारून माझी प्रतिमा कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसे पाहिले तर नेहरू–शास्त्री–इंदिरा गांधी उत्तर प्रदेशाचे! आपल्या राज्याकडे त्याचे लक्ष अधिक नव्हते का?' असेही यशवंतराव त्यांच्यावरील आरोपाबाबत म्हणावयाचे!

निजलिंगप्पा, मोरारजी देसाई, स. का. पाटील आदी यशवंतरावांना प्रांतीय ठरविणारामध्ये आघाडीवर होते. चव्हाणांवर प्रांतीयतेचा शिक्का मारला की पंतप्रधानपदासाठी त्यांच्या नावाचा विचार होणार नाही किंवा त्या कारणामुळे त्यांच्या नावाचा विचार होऊ नये हा या प्रचाराचा हेतू असावा! यशवंतरावांना प्रांतीय म्हटले गेले; पण मराठी जनतेच्या मनात त्यांच्याबाबत काय भावना आहेत? महाराष्ट्राच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर–सीमाप्रश्न, कृष्णा – गोदावरी पाणीतंटा, कोकणरेल्वे यांसारख्या प्रश्नांवर यशवंतराव केंद्रात असूनही महाराष्ट्राला न्याय मिळत नाही, हे प्रश्न सुटत नाहीत, अशीच भावना सामान्य जनतेच्या मनात आहे. आपल्यावर प्रांतीयतेचा आरोप करण्याला संधी मिळू नये म्हणून यशवंतराव अलिप्तपणाची भूमिका घेत असे अनुमान काढले तर ते यशवंतरावांवरही अन्याय करणारे ठरणार नाही.

नेहरूंनी यशवंतराव चव्हाण यांना संरक्षणमंत्री करण्याचे ठरविले तेव्हा कृष्णम्माचारी व बिजू पटनाईक यांनी विरोध केला, तर गृहमंत्रीपद देण्याचा विचार केला त्या वेळी मोरारजी देसाई, स. का. पाटील, कामराज, निजलिंगप्पा यांनी यशवंतराव यांना कसून विरोध केला होता. यशवंतरावांना या नेत्यांचा सातत्याने विरोध होता. असे असतांही झाकीर हुसेन यांच्या निधनानंतर राष्ट्रपतिपदाचा उमेदवार ठरवताना यशवंतराव सिंडिकेटच्या बाजूला गेले. यशवंतराव डाव्या विचारांचे मानले जात असल्याने ते जेव्हा सिंडिकेटच्या बाजूला गेले तेव्हा देशाला आश्चर्य वाटले; परंतु राजकारणाचा अभ्यास करणाऱ्यांना त्यात विसंगती वाटली नाही. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत सिंडिकेट उमेदवार संजीव रेड्डी यांचा पराभव झाला. हा पराभव सिंडिकेटचाही होता आणि यशवंतराव श्रीमती इंदिरा गांधी यांच्याकडे आले. त्यांच्या या गटबदलामुळे यशवंतराव यांच्याविषयी संशय वाढून ते सत्तेला चिकटून राहणारे आहेत असे अनुमान काढले जात होते. जुलै १९६९ मध्ये कॉंग्रेसमध्ये फूट पडली तेव्हा श्रीमती गांधी यांनी यशवंतराव चव्हाण यांना मंत्रिमंडळातून अर्धचंद्र देण्याचे ठरविले होते. ( Chavan And The Trouble Decade – टी. व्ही. कुन्ही कृष्णन). परंतु द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या सल्ल्यामुळे श्रीमती गांधींनी त्यांना काढून टाकले नाही.

कॉंग्रेसमधील फुटीमुळे यशवंतराव म्हणजे महाराष्ट्राचे नेतृत्व ही परिस्थिती बदलू लागली. १९६९ मध्ये यशवंतराव यांनी जो पवित्रा घेतला त्यामुळे त्यांच्यावर श्रीमती गांधींचा राग होताच. साहजिकच महाराष्ट्रातील यशवंतरावांच्या नेतृत्वाला शह देण्याचा प्रयत्न सुरू झाला. फुटीपूर्वी यशवंतरावांच्या शब्दाबाहेर महाराष्ट्रात काहीही घडत नव्हते. फुटीनंतर ती परिस्थिती राहिली नाही. यशवंतराव म्हणतील त्याच्या नेमके उलटे महाराष्ट्रात घडू लागले. यशवंतराव चव्हाण यांनीच तसे म्हटले आहे. वसंतराव नाईक यांना बाजूला करून शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्री करण्याचा प्रश्न आला तेव्हा यशवंतराव मौन पाळून होते. आपण मुख्यमंत्री बदलाला अनुकूलता दाखविली तर हा बदल घडून येणार नाही असे यशवंतराव म्हणत होते, तर आपल्याला यशवंतरावांचा विरोध आहे, म्हणून यशवंतराव मुख्यमंत्री बदलाच्या प्रश्नावर मौन पाळीत आहेत, असा अर्थ शंकरराव चव्हाण काढीत होते. महाराष्ट्रात यशवंतरावांच्या मताप्रमाणे घडू द्यावयाचे नाही, म्हणून त्यांच्या विरोधात खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या व्यक्तींची निवड श्रीमती गांधी करीत होत्या. अशी व्यक्ती निवडण्याकरिता त्या त्यांची कसोटी पाहात होत्या. पंतप्रधान होण्याच्या महत्त्वाकांक्षेतून राष्ट्रपती–उमेदवाराची निवड करण्याच्या वेळी यशवंतराव सिंडिकेटकडे गेले होते हे श्रीमती गांधी विसरणे शक्य नव्हते. पंतप्रधानपदाची इच्छा धरणाऱ्या नेत्याचे आसन त्याच्याच राज्यात डळमळीत करण्याचा घाट श्रीमती गांधींनी घातला आणि आज महाराष्ट्रात यशवंतरावांना पूर्वीप्रमाणे स्थान राहिलेले नाही हे दिसून येत आहे.

आपल्या प्रतिस्पर्ध्याला आपल्या मार्गातून दूर करण्याकरता म्हणून राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्यानंतर यशवंतराव चव्हाण यांना राष्ट्रपती करण्याचा विचारही श्रीमती गांधींनी केला होता. मंत्रिमंडळातून वगळले जाण्यापेक्षा राष्ट्रपतिपदाचा सर्वोच्च मान मिळवून सक्रिय राजकारणातून निवृत्त व्हावे असे यशवंतराव यांना वाटत होते; पण सक्रिय राजकारणातून निवृत्त होऊ नका. असा सल्ला त्या वेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिला आणि यशवंतरावांनी तो मानला असे यशवंतरावांच्या कुटुंबियांपैकी एक असे मानले जात असलेल्या महाराष्ट्रातील एका मंत्र्यानेच मला एप्रिल १९७४ मध्ये सांगितले होते.

वसंतरावांनी असा सल्ला दिला असावा असे मानण्यास जागा आहे. मुख्यमंत्रीपदावरून बाजूला करताना वसंतराव नाईक यांना बिहारचे राज्यपालपद देऊ केले होते. 'आपल्याला सक्रिय राजकारणात राहावयाचे असल्याने आपण राज्यपालपद स्वीकारले नाही. राजकारणातून निवृत्त होण्याजोगे आपले वय झाले नाही.' असे वसंतराव नाईक माझ्याजवळ म्हणाले होते. यशवंतरावांना त्यांनी जो सल्ला दिल्याचे सांगण्यात येते त्याच्याशी सुसंगत अशी- वसंतराव नाईक यांची ही भूमिका आहे. 'तुम्ही यशवंतरावांना राष्ट्रपतिपद स्वीकारू नका असा सल्ला दिला होता काय ?' असेही मी वसंतराव नाईक यांना स्पष्टपणे विचारले. त्यावर वसंतराव नाइकांनी असा सल्ला दिल्याचा इन्कार केला नाही की त्याला दुजोराही दिला नाही; पण आपण यशवंतरावांना उपपंतप्रधान करण्याचा प्रयत्न केला होता असे सांगून वसंतरावांनी विषयाची गाडी त्या वेळी बदलून टाकली !

'१९६७ मध्ये यशवंतरावांना उपपंतप्रधान करावे असे मला वाटले. त्याप्रमाणे मी हा विषय त्यांच्याजवळ काढला आणि त्यांची संमती घेतली. ही गोष्ट दुपारी तीनची ! (तारीख नाईक यांना आठवत नव्हती.) बोलता बोलता श्रीमती गांधींनी मला साडे सहा वाजता बोलाविले आहे असे मी यशवंतरावांना म्हणालो. पंतप्रधानांनी आपल्याला सात वाजता बोलावले आहे अशी माहिती यशवंतरावांनी मला दिली. यशवंतरावांना उपपंतप्रधान करण्याचे ठरवून मी यशवंतरावांच्या घरातून बाहेर पडलो. संध्याकाळपर्यंत आमच्या बोलण्यात काय ठरले ही माहिती पंतप्रधानापर्यंत कशी पोचली कोणास ठाऊक ! मी श्रीमती गांधींना भेटलो तेव्हा त्या म्हणाल्या, 'वसंतराव, तुमच्यावर कामगिरी सोपवायचे मी ठरवले आहे. मोरारजी देसाई यांना उपपंतप्रधान करण्याचे मी ठरविले आहे; परंतु ते मानी आहेत. त्यांना तुमच्यासारख्या चांगल्या व्यक्तीने सांगितले तरच ते ऐकू शकतील !' ' असे वसंतराव नाईक यांनी 'वर्षा' वरील एका भेटीत मला सांगितले होते.

वसंतराव नाईक सत्तेवरून दूर झाल्यानंतर थोड्याच दिवसांनी मी त्यांची 'वर्षा' बंगल्यावर ही भेट घेतली होती. ते जोपर्यंत मुख्यमंत्री होते तोपर्यंत 'वर्षा' हेच मुख्यमंत्र्याचे निवासस्थान होते. 'वर्षा'वर जाण्याचे प्रसंग आमच्यावर अनेक वेळा येत असत; पण त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी मी जात नसे. बाजूलाच बांधलेल्या इमारतीत नाईक मंत्री, अधिकारी व नागरिक यांना भेटत. या वेळी मी त्यांच्या घरी भेटलो होतो. बाहेरच्याच त्यांच्या दालनात वाघ, गवा आदी पेंढा भरलेले प्राणी होते. पाठीमागच्या बागेतून मोराचा केकारव ऐकू येत होता. त्यांच्या बंगल्याचे स्वरूप पाहून नाईक 'वर्षा' सोडण्याऐवजी तो विकत घेण्याचा विचार करतील असे वाटले होते. आमचे बोलणे चालू असतानाच विधानपरिषदेचे उपाध्यक्ष रा. सु. गवई तिथे आले. ते दूर बसले होते.

'पंतप्रधान गांधी यांनी माझ्यावर जी कामगिरी सोपविली त्यामुळे माझ्यावर मोठ्ठीच आपत्ती आली होती. दुपारी आपण यशवंतरावांशी त्यांना उपपंतप्रधान करण्यासंबंधी बोललो आणि काही तासानंतरच मोरारजींनी उपपंतप्रधानपद स्वीकारावे अशी गळ त्यांना घालण्याची वेळ माझ्यावर आली होती. यशवंतरावांना हे न सांगताच मी मोरारजींना भेटून, त्यांनी उपपंतप्रधान व्हावे यासाठी प्रयत्न करीत आहे हे समजले, तर यशवंतरावांना काय वाटेल, हा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला होता. तेवढ्यात यशवंतरावही थोड्याच वेळात येथे येणार आहेत हे आठवले. मी मग ते येईपर्यंत इतर विषयांवर पंतप्रधानांशी चर्चा करू लागलो. यशवंतराव येताच श्रीमती गांधींनीच त्यांना मोरारजींनी उपपंतप्रधानपद स्वीकारावे असे सांगण्याची जबाबदारी आपण वसंतरावांवर टाकली असल्याचे सांगितले. तेव्हा माझ्या डोक्यावरचे ओझे उतरले !' असेही नाईक पुढे म्हणाले.

'श्रीमती गांधींनी आपल्यावर टाकलेल्या जबाबदारीप्रमाणे मी मोरारजींना भेटलो व श्रीमती गांधींचा विचार त्यांना सांगितला. तेव्हा मोरारजी आपल्यावर खवळले आणि 'मी पंतप्रधानपदासाठी उभा राहणार आहे. त्यासाठी तुम्ही मला मदत करण्याऐवजी उपपंतप्रधानपद स्वीकारा असे सांगण्यासाठी आलात ?' असे ते म्हणाले. मोरारजींचे सर्व ऐकून घेतल्यावर 'तुमच्याविषयी मला आदर आहे; पण पंतप्रधानपदासाठी आपण तुम्हाला पाठिंबा देऊ शकत नाही असे मी मोरारजींना स्पष्ट सांगितले' असेही वसंतराव नाईक म्हणतात. वसंतराव नाईकांनी उपपंतप्रधानपदासंबंधी सविस्तर सांगितले; परंतु मोरारजींनी Story of My Life या नावाने आपले आत्मचरित्र लिहिले आहे. त्या पुस्तकात उपपंतप्रधानपदाचा उल्लेख आहे; पण त्यात वसंतराव नाईक यांच्या नावाचा उल्लेख मात्र नाही.

**वसंतराव नाईक यांनी १९६७ मध्ये यशवंतरावांना उपपंतप्रधान करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यापूर्वी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या निधनानंतर यशवंतरावांना पंतप्रधान करण्याचाही वसंतराव नाईक यांनी प्रयत्न केला होता. नेहरूंच्यानंतर श्रीमती गांधींना पंतप्रधान करण्याचा विचार पुढे आला होता; पण त्या वेळी श्रीमती गांधींनी पंतप्रधानपद स्वीकारण्यास नकार दिला. त्यानंतर यशवंतरावांसाठी पाठिंबा मिळविण्याचे प्रयत्न नाईक यांनी सुरू केले; परंतु त्यांच्या नावाला पाठिंबा मिळेना म्हणून नाईकांनी यशवंतरावांकरिता सुरू केलेले प्रयत्न सोडून दिले. नेहरूंनंतरचा पंतप्रधान कसा निवडला व त्यात आपला वाटा कसा आहे हेही वसंतराव नाईक यांनी सांगितले—**

'यशवंतरावांना पाठिंबा मिळत नाही असे स्पष्ट झाल्यानंतर मी द्वारकाप्रसाद मिश्र यांच्याकडे गेलो. तेथे सी. सुब्रह्मण्यम् आले. लालबहादूर शास्त्रींना पंतप्रधान करावे असे पत्र कांग्रेसअध्यक्ष कामराज यांना मुख्यमंत्र्यांनी द्यावे असे सुब्रह्मण्यम यांनी सुचविले, देशाचा पंतप्रधान असा अर्ज करून निवडता कामा नये, अशी भूमिका मी घेतली आणि लालबहादूर शास्त्रींच्या नावाला इतर मुख्यमंत्र्यांचा पाठिंबा मिळविण्यात आपण पुढाकार घेतला होता" असे वसंतराव नाईक म्हणाले. लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाल्यानंतर वृत्तपत्रांतून नाईकांनी शास्त्रींसाठी केलेल्या प्रयत्नांची थोडी माहिती प्रसिद्धही झाली होती. ❖

## वसंतराव नाईक यांनी खूप धडपड केली. पण !

## ३

पतप्रधान–उपपंतप्रधाना रक्षाकरिता यशवंतराव चव्हाण यांच्या-साठी प्रयत्न करण्यात आले. कन्हाडसारख्या लहानशा गावातून आलेल्या व्यक्तीच्या जीवनात एवढ्या मोठ्या घटना घडल्या! स्वातंत्र्यासाठी काँग्रेसने केलेल्या चळवळीमुळे यशवंतराव राजकारणाकडे खेचले गेले तो काळ भंतरलेल्या दिवसांचा! मोतीलाल नेहरू-सारख्यांपासून लहानशा गावातील सामान्य माणसापर्यंत साऱ्यांनाच महात्मा गांधींनी स्वातंत्र्याच्या चळवळीचे पाईक घडविले होते. यशवंतराव प्रारंभापासून काँग्रेसमध्येच आहेत; पण मनाने देशातील सर्व पुरोगामी पक्षात त्यांनी प्रवेश केला असल्याचे दिसून येते. त्यांच्या राजकीय जीवनाचा विचार केला तर स्वातंत्र्यपूर्व काळात एखादा विचार पटला तरी तो बाजूला सारून लोकप्रिय असलेल्या प्रवाहातच ते राहिले आणि स्वातंत्र्योत्तर काळात काही वेळा जोपासलेल्या तत्त्वाला मुरड घालूनही सत्तेच्या प्रवाहातच राहण्याचे त्यांनी पसंत केले आहे, असे आढळून येईल. १९३९ मध्ये कम्युनिस्ट पक्षात जाण्याचे यशवंतरावांनी ठरविले होते. त्यासाठी ते पुण्यात कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयातही गेले होते. हा काळ दुसऱ्या महायुद्धाचा होता, देशात स्वातंत्र्याची चळवळ जोर धरीत होती. ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नाला भारतात साथ मिळत नव्हती. 'जर्मनीबरोबरच्या युद्धामागे असलेले तत्त्वज्ञान आपल्याला मान्य होते' असे यशवंतराव म्हणतात. पुढे जर्मनीने रशियावर चाल केली आणि आदल्या दिवशी साम्राज्यशाहीशी असलेले युद्ध कम्युनिस्टांनी दुसऱ्या दिवशी लोकयुद्ध ठरविले. कम्युनिस्टांनी युद्धप्रयत्नाला मदत करण्याची भूमिका स्वीकारली. कम्युनिस्टांविषयी देशात त्यामुळे संतापाची लाट पसरली होती. यशवंतरावांना युद्धामागे असलेले तत्त्वज्ञान मान्य होते. त्या तत्त्वज्ञानाचा परिपाक युद्धप्रयत्नाना मदत करणे हाच निघतो. आपल्याला जे पटले आहे त्याप्रमाणे करण्याचे यशवंतरावांनी टाळले व ते कम्युनिस्ट पक्षात गेले नाहीत. लोकप्रिय असलेल्या प्रवाहातच ते राहिले. 'मित्रानी कम्युनिस्ट पक्षात जाऊ नये असे सांगितल्यामुळे मी कम्युनिस्ट पक्षात गेलो नाही. त्या वेळी मी जर कम्युनिस्ट पक्षात गेलो असतो तर आपण अलग पडलो असतो,' असे यशवंतराव म्हणतात.

एम एन. रॉय यांना कम्युनिस्ट पक्षातून काढून टाकल्यावर ते भारतात आले आणि काँग्रेसमध्ये दाखल झाले. चीनने स्वीकारलेल्या तत्त्वज्ञानाप्रमाणे मागासलेल्या देशांनीही शेतकऱ्यांची क्रांती घडवून आणली पाहिजे असे प्रतिपादण्यास रॉय यांनी सुरुवात केली. रॉय यांच्या विचारानेही यशवंतराव प्रभावित झाले आणि ते १९३७ मध्ये रॉयवादी बनले. त्या काळी रॉय यांचा पगडा तरुणांच्या मनावर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. रॉयना अनुयायी भराभर मिळत गेले. महायुद्धाच्या वेळी फॅसिझमविरुद्ध लोकशाही असे हे युद्ध असून ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नाला पाठिंबा दिला पाहिजे असे रॉय सांगू लागले. युद्धप्रयत्नाला मदत हवी असेल तर प्रथम भारताला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे अशी भूमिका काँग्रेसने घेतली होती. रॉय यांनी स्वीकारलेल्या भूमिकेमुळे त्यांची लोकप्रियता घटू लागली. या काळात यशवंतरावांनी रॉय यांच्यापासून फारकत घेतली. एखादा विचार पटल्यानंतर त्यातून निष्पन्न होणारे निष्कर्ष मान्य नाहीत हे सुसंगत ठरत नाही. ब्रिटनने भारताला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली तरच युद्धप्रयत्नाला सहकार्य देण्याचा ठराव काँग्रेसने जुलै १९४० मध्ये केला. आणि सत्याग्रह मोहीम सुरू केली. एप्रिल १९४१ मध्ये देशात तेरा हजार सत्याग्रही नोंदविले गेले. यावरून स्वातंत्र्याच्या चळवळीची लोकप्रियता स्पष्ट होईल. कम्युनिस्टांची लोकयुद्धाची व रॉय यांची फॅसिझमविरुद्धचे हे युद्ध असल्याने युद्धप्रयत्नाला मदत करण्याची भूमिका जनतेला मान्य नव्हती. रॉय यांची भूमिका यशवंतरावांना मान्य होती तरीही ते रॉय यांच्यामागे गेले नाहीत. ते काँग्रेसमध्येच राहिले.

काँग्रेसमध्ये असलेल्या तरुणांनी काँग्रेसांतर्गत काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना केली. मार्क्सवादी विचाराचा या तरुणांवर प्रभाव होता तशीच त्यांना स्वातंत्र्याची आच होती. १९३५ नंतर काँग्रेस समाजवादी पक्षाविषयी लोकांना आपुलकी वाटत होती. काँग्रेस-समाजवाद्यांची लोकप्रियताही वाढत होती; परंतु महात्मा गांधींमुळे काँग्रेसची पाळेमुळे खोलवर रुजली. महात्मा गांधींना देश देवाप्रमाणे मानू लागला होता. गांधींच्या प्रभावाने काँग्रेस समाजवादी पक्षाची वाढ मर्यादित राहणार हे स्पष्ट झाले आणि यशवंतरावांनी काँग्रेस समाजवादी पक्षालाही रामराम ठोकला! १९४७–४८ मध्ये ते शेतकरी कामगार पक्षाच्या उंबरठ्यावरही होते. शे. का. पक्षाच्या निर्मितीपूर्वीच्या काही बैठकांना यशवंतराव हजर होते. यशवंतराव काँग्रेसमध्ये आहेत; परंतु मनाने ते इतर पक्षांत कसे गेले याची कल्पना यावरून येण्यास मदत होईल. *

## ४

१९४६ साली आलेल्या निवडणुकीला उभे रहावे की नाही, याबाबतही यशवंतरावांचा निर्णय होत नव्हता. भावाच्या आग्रहामुळे यशवंतरावांनी मार्च १९४६ मधील निवडणूक लढविण्याचे ठरविले. त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा हा निर्णय ठरला. त्या निर्णयाचे वाटेकरीही यशवंतराव नव्हते, तर त्यांचे बंधू होते.

मुंबईराज्याची सूत्रे बाळासाहेब खेरांकडे आली. खेरांनी यशवंतरावांना पार्लमेंटरी सेक्रेटरी केले. त्यावर यशवंतरावांचे समाधान नव्हते. त्यांना मंत्रिपद पाहिजे होते. खेरांची त्याला तयारी नव्हती आणि पार्लमेंटरी सेक्रेटरीपद स्वीकारण्याबाबत यशवंतरावांचा निर्णय

होत नव्हता. खेरांनी मंत्रिमंडळाची रचना करताना महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष केशवराव जेधे यांच्याशी चर्चासुद्धा केली नव्हती. त्यामुळे महाराष्ट्र काँग्रेसमध्ये असंतोष होता. खेर मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. यशवंतरावानी स्वत:सबधी कोणताच निर्णय घेतलेला नव्हता. या कारणामुळे २ एप्रिल रोजी त्याचा शपथविधी झाला नाही. एल्. एम्. पाटील, गणपतराव तपासे, अण्णासाहेब वर्तक याना मत्री केल्यावर महाराष्ट्राचा आणखी एक मत्री होणे कठिण होते. शिवाय ज्येष्ठतेचाही प्रश्न होता. यशवंतरावानी लौकर निर्णय घेतला नाही तर दुसऱ्या व्यक्तीची निवड करण्याची तयारी खेरानी सुरू केली. यशवतरावाची अवस्था 'धरले तर चावते व सोडले तर पळते' अशी झाली होती. त्यांना निर्णय घेण्यास बारा दिवस लागले १४ एप्रिल रोजी यशवतरावानी शपथ घेतली. खेर मत्रिमंडळात मोरारजी देसाई याच्याकडे गृह व महसूल ही महत्त्वाची खाती आली. मोरारजीचे पार्लमेंटरी सेक्रेटरी यशवतराव झाले. या काळांत यशवतरावाची कार्यक्षमता मोरारजीच्या कसोटीस उतरली. याच काळात कूळकायदा केला. कूळकायद्यास कर्नाटकातील आमदारांनी विरोध करण्याचा पवित्रा घेतला. **प्रसंगी कर्नाटक काँग्रेस बरखास्त करूनही कूळकायदा मंजूर करण्याचे मोरारजींनी ठरविले होते.** या कायद्याला महाराष्ट्र काँग्रेसमधील काही जणांचा विरोध होता. कूळकायद्यामुळे ज्यांच्या हिताला धक्का पोचला होता अशानी विरोध करण्याची भूमिका स्वीकारली होती असे मोरारजी देसाई म्हणतात. कूळकायदा होत असताना महाराष्ट्र काँग्रेसमध्ये शहरी व ग्रामीण असा वाद डोके वर काढू लागला होता. हे नेतृत्व शहरी आहे, त्याला ग्रामीण भागाविषयी आत्मीयता नाही, त्यामुळे शहरी नेतृत्वात कूळकायदा केला असे म्हणण्यापर्यंत त्यावेळी मजल गेली होती.

याच सुमारास महाराष्ट्र काँग्रेसमध्ये महत्त्वाची घटना आकार घेऊ लागली. महाराष्ट्र काँग्रेसमधील असंतुष्ट काँग्रेसजनांची ११ सप्टेंबर १९४६ रोजी पुण्यात बैठक भरली होती. महाराष्ट्र काँग्रेसमध्ये बहुजनसमाजाचे नेते असले तरी प्रदेश काँग्रेसचे नेतृत्व प्रामुख्याने ब्राह्मणवर्गातील नेत्याकडेच होते! याच जाणीवेचा प्रभाव ११ सप्टेंबरच्या बैठकीवर पडला होता. या बैठकीत काँग्रेस शेतकरी संघाची स्थापना करण्याचे ठरविले गेले. या बैठकीला यशवंतराव चव्हाण हजर होते. त्यानंतर ११ जानेवारी १९४७ रोजी या गटाची मुबईत भाऊसाहेब राऊत यांच्या घरी बैठक झाली. त्या वेळी केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, काकासाहेब वाघ, तुळशीराम जाधव, पी. के. सावंत, र. के. खाडिलकर व आचार्य अत्रे हेही हजर होते. शेतकरी कामगार पक्षाचे नाव आपण सुचविले होते असे पी. के. सावंतानी मला जून १९७५ मध्ये सांगितले. मात्र स्वतत्र पक्षाची स्थापना करण्याऐवजी काँग्रेस समाजवादी पक्षाप्रमाणे आपण शेतकरी कामगार संघ हे नाव घेऊन काँग्रेसमध्ये राहावे व काँग्रेस समाजवादी पक्षावर काँग्रेस पक्षाने कारवाई करण्याचे ठरविले तर आपण त्यावेळी विचार करून निर्णय घ्यावा असा सल्ला मी त्या वेळी दिला होता असे पी. के. सावंत म्हणतात.

महाराष्ट्रात बहुतेक सत्तास्थाने–पक्षातील व नोकऱ्यांतीलही–ब्राह्मणवर्गाकडे होती. या वर्गाने जोपासलेल्या परंपरा, रूढी यामुळे पिढ्यांनुपिढ्या सर्व प्रकारच्या संधींपासून इतर वर्ग वंचित राहिले होते. साहजिकच या वर्गाविरुद्ध बहुजन समाजाला राग होता. त्यातून ब्राह्मण–ब्राह्मणेतर चळवळीला जोर मिळू लागला. खऱ्या अर्थाने ही चळवळ प्रस्थापिताविरुद्ध होती. तेच स्वरूप या चळवळीला तिच्या नेत्यानी दिले असते तर कोणत्याही प्रस्थापित वर्गाने जनहित-विरोधी धोरण स्वीकारले असते किंवा सर्व सत्तास्थाने आपल्या हाती ठेवण्याचा प्रयत्न केला असता तर त्याविरुद्ध उठण्याची प्रक्रिया सुरू झाली असती. १२ सप्टेंबर १९४७ रोजी शेतकरी कामगार संघाची घटना निश्चित झाली. यशवतराव चव्हाण शे. का. पक्षाच्या प्रारंभिक बैठकीला हजर असले तरी नंतर त्यांनी त्यातून काढता पाय घेतला. आता बहुजनसमाजाला पक्षात व मत्रिमडळात अधिक प्रतिनिधित्व हवे या केशवराव जेधे यांच्या मताला यशवंतरावाचाही पाठिंबा होता.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याच्या भूमिकेवर शे. का. पक्षाची स्थापना झाल्याचे शे. का. पक्षाचे नेते बापूसाहेब लाड म्हणतात. काँग्रेस अंतर्गत गट ठेवण्यास काँग्रेसने प्रतिबंध केल्यावर महाराष्ट्रात १३ जून १९४८ रोजी शेतकरी–कामगार पक्षाची स्थापना केली गेली. शे. का. पक्षाचा झेंडा भगवा हवा असा आग्रह काकासाहेब वाघ यांनी धरला होता. जेधे नव्या शे. का. पक्षात गेल्यावर भाऊसाहेब हिरे महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष बनले. यशवंतराव चव्हाण शे. का. पक्षाविषयी अनुकूल होते; परंतु शे का. पक्षाचे नेतृत्व जेधे–मोरे–राऊत याच्याकडे जाणार हे स्पष्ट झाले आणि अशा वेळी आपण त्या पक्षात गेलो तर दुसऱ्या रांगेत आपल्याला स्थान मिळणार व काँग्रेसमधील मातब्बर नेते पक्षाबाहेर गेले की काँग्रेसमधले आपले स्थान वाढणार, हा हिशेब करून यशवंतराव शे. का. पक्षात गेले नाहीत, असे भाऊसाहेब हिरे यानी १९६१ मध्ये महाबळेश्वर येथे काँग्रेस शिबीर भरले तेव्हा आमच्याजवळ बोलून दाखविले होते. यशवंतराव शे. का. पक्षात का गेले नाहीत यासंबंधी हिरे यांनी केलेल्या मीमांसेप्रमाणे राजारामबापू पाटील यांनीही १९७५ मध्ये मत व्यक्त केले होते.

१९६१ मध्ये प्रदेश काँग्रेसने महाबळेश्वरला शिबीर आयोजित केले. १९६२ च्या निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून हे शिबीर होते. या शिबिराच्या वेळी भाऊसाहेब हिरे व यशवंतराव चव्हाण याच्यात बरीच बोलाचाली झाली. चव्हाणांबरोबरच्या मतभेदाची हिरे यांची ही बोलाचाली अखेरची ठरली! या शिबिरानंतर लगेच हिरे यांचे निधन झाले. निवडणुकीच्या प्रचारासाठी शाहीर, कवी यांचा पैसे देऊन वापर करण्यात आला होता. त्यासाठी काँग्रेसने पाण्यासारखा पैसा खर्च केला. ग. दि. माडगूळकर यानीही अनेक गाणी रचून दिली. त्यापैकीच एका लावणीवर हिरे–चव्हाण यांच्यात वाद झाला. मी, पां. वा. गाडगीळ, वि. कृ. तोरस्कर व माझे एक पत्रकार मित्र व भाऊसाहेब हिरे एकाच खोलीत राहिलो होतो. सकाळी शिबीरात भाषणे सुरू होण्यापूर्वी माडगूळकर याची

'नाव माझं जना
वय वर्षे सोळा
ऐन्यामध्ये उभा राही
माझा मोसंबीचा मळा!'

ही लावणी म्हटली. भाऊसाहेब हिरे लावणी ऐकून संतापाने लाल झाले ! शिबिराचा मंडप सोडून खोलीवर आले ते, ' यशवतरावाला म्हणावं मतं मिळण्यासाठी आता कोल्हाटणी नाचवा ! ' असे जवळजवळ ओरडतच ! ' प्रचारापेक्षा या लावणीत महाराष्ट्रसुदरीचं वर्णन आहे ' असे समर्थन यशवंतरावांनी त्या वेळी केले होते. तसे पाहिले तर हिरे यांच्या निधनानतर महाराष्ट्रात यशवंतरावांच्या तोडीचा नेता कॉंग्रेसमध्ये राहिला नाही हेही यशवतरावाच्या नेतृत्वाचे कारण आहे !

*

---

## ५

---

मोरारजी देसाई यांच्या मत्रिमंडळात असतान्ना भाऊसाहेब हिरे यांचे मोरारजीशी कधी पटले नाही. अदाजपत्रकातील काही करारावरून हिरे याचे मोरारजीशी चांगलेच खटके उडाले होते. अखेर मोरारजीनी वाढविलेले जमीन महसूल उपकर व विक्रीकर मागे घेतला होता. या घटनेपासून मोरारजी व हिरे याच्यातील तणाव दिवसेदिवस वाढतच गेला. तो एवढा वाढत गेला की पुढे पुढे दोघे एकमेकाशी बोलणेही टाळीत ! दोघे परस्परांविरुद्ध उघडपणे बोलत. या वेळी यशवतराव चव्हाण यांची भूमिका दुटप्पी स्वरूपाची होती. प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष या नात्याने यशवंतराव, भाऊसाहेब हिरे याना सांभाळण्याचा प्रयत्न करीत तर मोरारजी मुख्यमंत्री, म्हणून मोरारजीची मर्जी संपादन करण्याची कसरत करीत होते. ' राजकीय क्षेत्रात मी भाऊसाहेब हिरे याचे नेतृत्व मानतो व सरकारात मोरारजी देसाई याचे नेतृत्व मानतो ' असे यशवंतराव चव्हाण यानीच म्हटले होते. मोरारजी व हिरे या दोघानाही यशवतराव दुखवायला तयार नव्हते हेच यामुळे स्पष्ट होते. ' मोरारजींचे राजकीय व आर्थिक अशा प्रश्नासंबंधीचे विचार कायम आहेत त्यात त्यानी बदल केलेला नाही. मोरारजी आजन उजव्या विचारसरणीचे झाले अशी अवस्था मोरारजीच्या बाबतीत नाही. असे असताही यशवंतरावानी दोघांचेही नेतृत्व मानण्याचे यशवंतरावांचे धोरण मोरारजीना मान्य नव्हते. ' यशवंतरावांचे हे धोरण आपल्याला मान्य नव्हते ' म्हणून मी यशवतरावांना बोलावून घेतले आणि एक तर माझे नेतृत्व माना किंवा भाऊसाहेब हिरे याचे माना असे यशवतरावांना स्पष्टपणे सांगितले आणि यशवंतरावांनी माझे नेतृत्व स्वीकारले ' असा उल्लेख मोरारजी देसाई यांनी ' Story of My Life ' या आत्मचरित्रात केला आहे. यशवतरावांनी उजव्या विचाराच्या मोरारजी देसाई याचे नेतृत्व स्वीकारले हे विसरून चालणार नाही ! सार्वजनिक जीवनात मोरारजीची बदनामी झाली तर भाऊसाहेब हिरे अधिक लोकप्रिय ! अशा परिस्थितीत सार्वजनिक जीवनात यशवंतरावाना मोरारजीबरोबर राहणे गैरसोयीचे होते. म्हणून यशवंतरावांनी नेतृत्वाचे दोन भाग केले आणि सार्वजनिक क्षेत्रात आपण हिरेंचे नेतृत्व मानतो असे त्यांनी जाहीर केले. माधवराव बागल यानी यशवंतरावांच्या या दुटप्पी भूमिकेबद्दल जाहीर नापसंती व्यक्त केली होती. ' कोल्हापूरजवळील शिरोळी या गावी केलेल्या भाषणात बागलांनी एक तर मोरारजीचे नेतृत्व माना नाही तर भाऊसाहेब हिरे याचे नेतृत्व स्वीकारा. नेतृत्वाचे दोन भाग करू नका' असे म्हटले होते. पण हिरेंच्याबरोबर सरकारात राहणे फायद्याचे ठरणार नव्हते, ही बेरीजवजाबाकी करून सरकारात आपण मोरारजीचे नेतृत्व मानतो अशी भूमिका यशवंतरावानी घेतली. हिरेंच्या विरोधात महाराष्ट्रातील एकादी व्यक्ती—तीही बहुजन समाजातील—मोरारजीना पाहिजे होती. त्याकरिता त्यांनी यशवतरावाना जवळ केले होते ! यशवतराव नेहमी बेरजेचे राजकारण करतात. त्याचे मूळ स्वातत्र्यपूर्व काळापासूनचे आहे. स्वातत्र्यकाळी पटलेल्या एखाद्या विचारसरणीतून येणारे निष्कर्ष लोकप्रियतेविरुद्ध जाणार असे वाटताच यशवंतराव तो विचार सोडून लोकप्रिय चळवळीच्या प्रवाहात राहिले आणि स्वातत्र्योत्तर काळातही तत्त्वाचा विचार बाजूला सारून सत्तेच्या प्रवाहात कायम राहण्याचा त्याचा प्रयत्न राहिला. मग त्यासाठी ते कधी सिंडिकेट म्हणून ओळखल्या गेलेल्या उजव्या कॉंग्रेसच्या गटात गेले आणि या गटाचा पराभव होताच पंतप्रधान श्रीमती गाधीच्या गटाकडे आलेले दिसतात !

**संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणाऱ्या जमावावर २९ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईत गोळीबार करण्यात आला. महाराष्ट्रात त्यामुळे प्रक्षोभाचा डोंब उसळला. महाराष्ट्रातील ११६ कॉंग्रेस आमदारांनी गोळीबाराचा निषेध करण्यासाठी आमदारकीचा राजीनामा देण्याचे ठरविले व आपले राजीनामे शंकरराव देव व भाऊसाहेब हिरे यांच्याकडे दिलेही. यशवंतरावांनी मात्र राजीनामा देण्यास विरोध तर केलाच, पण राजीनाम्याची ,आपल्याकडे लेखी पत्र देऊन मागणी करावी, म्हणजे मी त्याचा विचार करीन अशी भूमिका घेतली. यशवंतरावांनी राजीनामा देण्यास नकार दिला याबद्दल महाराष्ट्र कॉंग्रेसने नापसंती व्यक्त केल्याची नोंद महाराष्ट्र कॉंग्रेसच्या दप्तरात आढळते. सत्तेचा त्याग करण्यास यशवंतराव तयार नाहीत याचे प्रत्यंतर १९५५ पासून येत आहे.**

' १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत व त्यानतरच्या पोटनिवडणुकीत महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेसचा पराभव झाला महाराष्ट्रातून कॉंग्रेस उखडली जाण्याचा धोका निर्माण झाला. त्यामुळे आपण बेचैन झालो होतो. एका प्रातातून कॉंग्रेस नष्ट होणे हे आपल्याला बरोबर वाटत नव्हते त्यामुळे मी नेहरूना संयुक्त महाराष्ट्र देऊन टाका असे सागितले. त्यानंतर महाराष्ट्रनिर्मितीची चक्रे फिरू लागली, ' असे स. का. पाटील म्हणतात. दिवगत राष्ट्रपती राधाकृष्णन् यानीही स. का. पाटील याच्यामुळे संयुक्त महाराष्ट्र झाला असल्याचे म्हटले होते. त्याची साक्ष प्रभाकर पाध्ये देतील. महाराष्ट्र देण्याचा विचार सुरू झाला तेव्हा महाराष्ट्रात कॉंग्रेसचे बहुमत राहील का, याची चाचपणी झाली. द्वैभाषिकात महाराष्ट्र कॉंग्रेसचे १३६ व सयुक्त महाराष्ट्र समितीचे १३२ असे मताधिक्य होते. पी. के. देशमुख याचा, विदर्भातील २० कॉंग्रेस आमदाराचा गट होता. तो समितीला मिळेल असा सशय घेतला जात असे. महाराष्ट्राची निर्मिती झाली तर कॉंग्रेसचे बहुमत जाणार नाही याची हमी यशवतरावानी नेहरूंना दिली. त्यापूर्वी यशवंतरावांनी विरोधी पक्षातील आमदाराना आश्वासने

देऊन पक्ष फोडण्यासंबंधी प्रयत्न चालविले होतेच. कोल्हापूरचे पी. बी. साळोखे, यशवंतराव मोहिते आदी बऱ्याच आमदारांना यशवंतरावांनी फोडले.

**'तुम्ही काँग्रेसमध्ये आहात तर मंत्रिमंडळातील एक-तृतीयांश जागा तुम्हाला देतो असे आम्हाला यशवंतरावांनी सांगितले होते, अशी माहिती शे. का. पक्षाचे जी. डी. लाड देतात. यशवंतरावांनी असा प्रयत्न केल्याचे उद्धवराव पाटीलही मान्य करतात.**

आमदार फोडण्याचे राजकारण करण्यात यशवंतराव यशस्वी झाले. १९६७ नंतर देशभर पक्षांतर होऊन काँग्रेस सरकारें पडू लागली. तेव्हा गृहमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी पक्षांतराला आळा घालण्याचे विधेयक मांडण्याचे ठरविले होते; परतु पक्षांतराची सुरुवात यशवंतरावांनी १९६० मध्ये केली होती. विरोधी पक्षांचे आमदार यशवंतरावांनी कसे फोडले हे सांगताना जी. डी. लाड म्हणाले, 'यशवंतराव मोहिते यांच्या भावाच्या सहकारी साखर-कारखान्याचा प्रस्ताव तसाच 'पाडून' ठेवला होता. यशवंतराव मोहिते काँग्रेसमध्ये गेल्यानंतर कारखान्याचा प्रस्ताव मंजूर झाला.'

*

## ७

महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे आहेत अशी भूमिका घेऊन यशवंतरावांनी नेहरूंना आपली निष्ठा वाहिली होती. १९६२ मध्ये चीनने आक्रमण केले तेव्हा संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्णमेनन यांच्याविरुद्ध देशभर लाट पसरली. त्यामुळे मेनन यांच्याऐवजी नेहरूंनी आपल्या नेतृत्वाला मानणाऱ्या यशवंतरावांची निवड केली. शिवाय द्वैभाषिकाची व नंतर महाराष्ट्राची धुरा वाहताना त्यांचे प्रशासकीय कौशल्य दिसून आले होते. त्याचप्रमाणे यशवंतराव ना डावे, ना उजवे! उजव्यांची मदत घेत डावीकडे बघत चालणारे असे यशवंतरावांचे वर्णन करता येईल; पण त्यांच्यावर डावा किंवा उजवा असा शिक्का मारता येणार नाही. यशवंतराव याला 'मध्यममार्गी' म्हणतात.

**यशवंतराव कोण आहेत हे नेमके सांगणे अवघड आहे. यशवंतराव मोहिते यांनी एका संपादकाजवळ यशवंतराव चव्हाण यांचे यथार्थ वर्णन केले होते. मोहिते यांनी आपले ते मत खासगीत व्यक्त केले; पण त्या संपादकाने यापूर्वीच ते छापले असल्याने मोहिते यांचे वर्णन पुन्हा उद्धृत केले तर ते मोहिते यांना अन्याय करणारे होणार नाही. 'कष्टकरी गरिबांचा वाली होता. वसंतराव नाईक यांनी शेतकऱ्याला, त्यांच्या प्रश्नांना सचिवालयात स्थान मिळवून दिले,' असे मोहिते म्हणाले त्यावर या संपादकाने यशवंतराव चव्हाण यांच्याविषयी विचारले. 'यशवंतरावांविषयी सांगण्यासारखं काही नाही! नर्मदेचा गोटा कसा सगळीकडनं गुळगुळीत असतो; हाताला काहीच लागत नाही, तसं यशवंतरावांचं आहे! त्यांच्याविषयी सांगता येईल असं हाताला काही लागतच नाही!' असे मोहिते म्हणाले होते**

## ८

यशवंतराव चव्हाण यांच्याविषयी मोहिते जे म्हणाले. त्यात बरेच काही आले आहे. यशवंतरावांचा आणखी एक दोष त्यांच्या जीवनाकडे पाहताना लक्षात येतो. तो म्हणजे, नवी जबाबदारी स्वीकारण्यास ते सहजासहजी तयार होत नाहीत. नेहरूंनी त्यांना संरक्षणमंत्रीपद देऊ केले त्यापासून पुढेही नवे खाते घेण्यास ते तयार झालेले नाहीत असे दिसून येते.

दिल्लीला जाण्याचे ठरविले तर राज्याच्या मुख्यमंत्रीपदाचा प्रश्न होता. त्याचाही विचार करणे आवश्यक होते. शिवाय नवी जबाबदारी पार पाडता येईल की नाही, हीही साशंकता त्या वेळच्या परिस्थितीमुळे असणे स्वाभाविक होते. चीनने भारताचा दारुण पराभव केला होता. अशा परिस्थितीमध्ये संरक्षणमंत्रीपद स्वीकारावे की नाही असा विचार येणे स्वाभाविक असले तरी यशवंतराव नवे खाते स्वीकारण्यास प्रथम तयार होत नाहीत. संरक्षणमंत्रीपदापासून ते परराष्ट्रमंत्रीपदापर्यंत त्यांच्याकडे ज्या ज्या वेळी नवे खाते आले त्या वेळचा त्यांच्या बाबतीत हा अनुभव आहे. संरक्षणखाते देऊ केले तेव्हा त्यांनी आपल्याला संरक्षणातील काही कळत नाही असे कारण सांगितले होते. इंदिरा गांधींनी त्यांना गृहखाते देऊ केले तेव्हाही यशवंतरावांनी संरक्षणखाते सोडण्यास नाखुषी दाखविली होती. काँग्रेस फुटीनंतर त्यांच्याकडील गृहखाते काढून अर्थखाते देऊ केले तेव्हाही अर्थविषयाचा अभ्यास आपल्याला नाही असे सांगण्यास त्यांनी सुरुवात केली; पण अर्थखात्याशिवाय दुसरे कोणतेच खाते देण्यास श्रीमती गांधी तयार नाहीत असे दिसताच यशवंतरावांनी अर्थखात्याचाही स्वीकार केला. परराष्ट्रखाते देऊ केले तेव्हासुद्धा हाच अनुभव आला. अर्थखात्यात आपण काही गोष्टी करू इच्छितो म्हणून आणखी काही दिवस हेच खाते आपल्याकडे राहू द्यावे असे त्यांनी सांगून पाहिले. त्याचा उपयोग होईना तेव्हा परराष्ट्रखाते स्वीकारले. नवे खाते स्वीकारताना यशवंतरावांची अशी अवस्था का होते? नव्या खात्याची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू की नाही याविषयी ते साशंक असतात असे अनुमान काढावयाचे का? ज्याला 'मुरलेला' राजकारणी म्हणतात किंवा पंतप्रधानपदासाठीही ज्याच्या नावाची चर्चा होऊ शकते अशा व्यक्तीने नवे खाते स्वीकारताना साशंक होणे कितपत समर्थनीय ठरावे? काही वेळा यशवंतराव 'आपली सावलीही आपल्याबरोबर नाही' असे म्हणाले आहेत. यशवंतरावांना साशंकता वाटते ती स्वतःच्या क्षमतेविषयी की खातेबदलामागे असलेल्या राजकारणाविषयी? प्रथम नवे खाते स्वीकारण्यास ते तयार नसतात पण शेवटी नवे खाते ते स्वीकारतात. त्यांच्या या वृत्तीविषयी महाराष्ट्र काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांपैकी एकाने 'स्वाभिमान नाही' येथपासून 'यशवंतरावांचे निर्णय व्यक्तिगत हिताचे असतात' येथपर्यंत अनुमान सांगितले. अलीकडेच यशवंतरावांविरुद्ध महाराष्ट्र काँग्रेसमध्ये लोक बोलू लागले आहेत; पण त्यांची मते नावानिशी प्रसिद्ध करण्यास ते तयार नाहीत. यापूर्वी यशवंतरावांविषयी पत्रकारांनी स्वतःचे असे काही विवेचन केले आणि ते यशवंतरावांना अनुकूल नसले तर पत्रकारांचा जाहीर निषेध होत असे. आता ही परिस्थिती बदलली आहे.

*

## ९

राजकारणात यशस्वी व्हावयाचे असले तर सहकारी व कार्यकर्ते याचा विश्वास संपादन केला पाहिजे. आपल्याविषयी सहकाऱ्यांना विश्वास वाटला नाही तर राजकारणातील महत्त्वाची स्थाने गमवावी लागतात हाही प्रत्यय यशवंतरावांना आला आहे. नेहरूंनंतर कोण; या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात येत होते तेव्हा यशवंतराव चव्हाण याच्या नावाचाही गंभीरतेने विचार केला जात होता. अर्थात ते दिल्लीला गेले त्या सुरुवातीच्या काळातील ही घटना आहे. पुढे पुढे त्यांच्याविषयी भरंवसा वाटेनासा झाला. डी. पी. मिश्रांना निवडणुकीला अपात्र ठरविले. त्याची ती मुदत कमी करण्याचे आश्वासन गृहमंत्री या नात्याने यशवतरावांनी दिले; पण ते पाळले नाही. आज सिंडिकेटकडे तर उद्या इंडिकेटकडे अशी भूमिका यशवंतराव घेत गेले. त्यामुळे त्यांच्याविष्यी केंद्रातील नेत्याना खात्री वाटत नाही. शेवटपर्यंत यशवतराव आपल्याबरोबर राहतील की नाही असे वाटणे हे महत्त्वाकांक्षा खच्ची करणारे आहे; यशवतरावाना पतप्रधानपदाची महत्त्वाकाक्षा होती; पण त्यासाठी इतरांनी प्रयत्न करावेत हीच यशवतरावाची नीती राहिली. मोरारजीनी ज्याप्रमाणे आपले राजकीय जीवन महत्त्वाकाक्षेसाठी पणाला लावले तसे पणास लावण्याचा धोका यशवतराव पत्करीत नाहीत. इतराच्यामुळे एखादे पद मिळविण्याची नीती १९५६ मध्ये यशस्वी ठरली असली तरी ती नेहमीच यशस्वी ठरेल असे नाही ! *

## १०

महत्त्वाचे पद मिळविण्यासाठी यशवतराव स्वत: धोका पत्करण्यास तयार होत नाहीत त्याचप्रमाणे आपल्याला आव्हान ठरण्याची क्षमता असलेल्या व्यक्तीलाही ते पुढे येऊ देत नाहीत असाही त्याच्याविरुद्ध आक्षेप घेतला जातो. 'कर्तृत्वान माणूस यशवंतरावांच्या मर्जीत राहणार नाही. अशा माणसाला सत्तेच्या स्थानापासून दूर कसे ठेवता येईल असाच यशवंतरावांचा प्रयत्न असतो.' असे पी. के. सावत म्हणाले होते. '९६ कुळी माणसाला यशवतराव वर येऊ देणार नाहीत!' असे बाळासाहेब देसाई म्हणत. बाळासाहेब देसाई यांना मुख्यमंत्रीपद मिळण्याची आशाच राहिली नाही त्यामुळे ते मधल्या काळात कडवट बोलत ! यशवंतरावांवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे जातीयवादाचा आरोप केला जातो. बहुजनसमाजातून आलेले पुढारीच हा आरोप करीत असतात. मात्र यशवंतरावांची काही विधाने पाहिली की, त्यांना जातीयवाद मान्य नाही असे वाटावे. प्रजासमाजवादी पक्षासबंधी बोलताना यशवंतराव म्हणाले होते, 'आत्यतिक विरोधी (अँटी) असता कामा नये. अँटी कम्युनिस्ट ही त्यांची (प्रजासमाजवाद्याची) भूमिका बरोबर नाही. माणसाने कशाचेही 'अँटी' असता कामा नये. हां ! मात्र 'अँटी कम्युनल' असावे !' जातीयतेशिवाय कशाचेही आत्यतिक विरोधी असू नये अशी यशवतरावाची भूमिका असताना त्यांच्यावर जातीवादाचा आरोप करणारांत मराठा जातीचे काही नेते असावेत ही आश्चर्याची गोष्ट आहे !

**वसंतरावदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री नाशिकराव तरपुडे यांनीही 'यशवतराव मराठ्यांचे राजकारण करतात' असे पत्रकारांजवळ म्हटले.**

## ११

थोडक्यात काय यशवंतरावाविषयी संभ्रमच राहावा ! त्यांची स्पष्टता दिसून येत नाही. विधानांचा अर्थ कार्यकर्ते-पत्रकार यांनी लावीत बसावे ! त्यामुळेच ते जी भूमिका घेतात तिला तात्त्विक सुसंगती लावता येत नाही. अगदी अलीकडचे उदाहरणच द्यावयाचे झाल्यास १९६९ चे देता येईल. यशवंतराव सिंडिकेटकडे गेले पण लगेच इदिरा गाधीच्या कपूतही दाखल झाले ! आपण काही गोष्टीना बांधले आहात असे सांगून ते सिंडिकेटकडे गेले. महाराष्ट्र काँग्रेसला सोडाच, वसंतराव नाईक यानाही त्यानी सिंडिकेटकडे जाण्यामागचे कारण सागितले नव्हते. कामराज, दिनेशसिंग यांच्यामुळे यशवंतरावाच्या सिंडिकेट-इंडिकेट प्रवासावर प्रकाश पडतो तेवढाच !

**'मोरारजी व यशवंतराव यांच्यांत समझोता झाला होता. त्यानुसार १९७२ पर्यंत मोरारजींनी पंतप्रधान व्हावे व १९७२ नंतर यशवंतरावांनी पंतप्रधान व्हावे असे ठरले होते. म्हणून यशवंतरावांनी राष्ट्रपतीपदाच्या उमेदवारीसाठी संजीव रेड्डी यांना मत दिले होते.' असे कामराज सांगत असत !**

इंडिकेटकडे यशवंतराव आले त्याविषयी दिनेशसिंग सागतात ते कारण यशवंतराव मान्य करीत नाहीत; पण गटबदलासंबंधी सुसंगत अर्थ दिनेशसिंग यांच्या कथनाने लावता येतो. दिनेशसिंग याचे कथन विचारात घेतले नाही तर मात्र यशवंतरावांच्या भूमिकेचा अर्थ लावता येत नाही.

**'१९६९ मध्ये कांग्रेस फुटली तेव्हा लोकसभेत काँग्रेसला २१ चेच बहुमत होते. अशा वेळी यशवंतरावांच्या बाजूला असलेल्या ४०-४५ खासदारांचा पाठिंबा गमावणे शहाणपणाचे ठरले नसते. म्हणून यशवंतरावांचा पाठिंबा मिळविणे आवश्यक होते. यशवंतराव ज्या गटाकडे जातील त्या गटाचे बहुमत होणार होते. यशवंतराव व मोरारजी यांच्यात काय समझोता झाला होता याची माहिती इंदिरा गांधींना मिळाली होती. त्यामुळे राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत संजीव रेड्डी यांचा पराभव झाल्यानंतर मोरारजींनी यशवंतरावांना जे आश्वासन दिले तेच आश्वासन यशवंतरावांना श्रीमती गांधींनी दिले. म्हणून यशवंतराव सिंडिकेटमधून इंडिकेटकडे गेले.' असे दिनेशसिंग म्हणतात. सिंडिकेट व इंडिकेट यांच्या ऑफरचा विचार केला की मग यशवंतरावांनी गट का बदलले या प्रश्नाची गाठ सुटते.**

श्रीमती गांधींनी यशवंतरावांना १९७२ नंतरच्या पंतप्रधानपदाचे आश्वासन दिले, त्यामुळे राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत पराभूत झालेल्या सिंडिकेट गटापासून ते दूर झाले. १९७१ मध्ये मध्यावधी

निवडणुकीत इंदिरा गांधींनी जे अपूर्व यश मिळविलं त्याचा परिणाम असा झाला की आश्वासनाचा विषय काढण्याची अवस्थाच राहिली नव्हती. १९७२ नंतर पंतप्रधानपद देण्याची गोष्ट मोरारजी देसाई-बरोबर ठरली होती हे यशवंतराव यांनी मान्य केले असल्याचे ' India After Nehru ' या पुस्तकातही नमूद केले आहे.

' यशवंतराव हे तेव्हा (त्यांच्या मागे ४०-४५ खासदार असल्यामुळे ) निर्णायक घटक होते. ते जर आमच्या बाजूला शेवटपर्यंत राहते तर आमचा विजय झाला असता ' असे कामराजही म्हणत. द्वारकाप्रसाद मिश्रा यांनी इंदिरा गांधींनाही हाच सल्ला दिला. **' यशवंतरावांना आपल्या बाजूला घेतले तर आपला विजय होईल ' असे मिश्रा यांनी म्हटले होते. ' लोकसभेतील बहुमताचा विचार करून गांधींनी चव्हाणांना आपल्या बाजूला घ्यावे व त्या बदल्यात यशवंतरावांना मंत्रीमंडळातून अर्धचंद्र देण्याचा विचार इंदिरा गांधींनी सोडून द्यावा असा सल्ला द्वारकाप्रसाद मिश्रा यांनी दिला होता. यशवंतरावांना मंत्रिमंडळातून वगळण्याचे गांधींनी ठरविलेले होतें; पण मिश्रांच्या सांगण्यावरून इंदिरा गांधींनी विचार बदलला. ' असे यशवंतरावांची भूमिका स्पष्ट करणाऱ्या ' Chavan and The Troubled ' या पुस्तकात म्हटले आहे. चव्हाण मात्र म्हणतात, कोणत्याच बाजूला नव्हतो. मला कॉंग्रेसची एकी टिकवायची होती.'**

राष्ट्रपतीपदाचा उमेदवार ठरविताना सिंडिकेटबरोबर जाण्याची व निवडणुकीत संजीव रेड्डींचा पराभव होताच इंदिरा गांधींच्या बरोबर राहण्याची तारेवरची कसरत यशवंतरावांनी केली. त्यामुळे अंधत्वाने त्यांचे नेतृत्व मान्य करणाऱ्या महाराष्ट्र कॉंग्रेसलाही तीच कसरत करावी लागली. मात्र इंदिरा गांधी यशस्वी झाल्यावर त्यांना मानणारा गट महाराष्ट्र कॉंग्रेसमध्ये निर्माण झाला. याच वेळी महाराष्ट्र कॉंग्रेसने १८ ते २० सप्टेंबर, १९६९ रोजी मुंबईत शिबीर घेतले. शिबिरात यशवंतरावांनी काय भूमिका घ्यावी याचा विचार १६ सप्टेंबर रोजी झाला. डॉ. वसंतराव रणदिवे त्या वेळी महाराष्ट्र कॉंग्रेसचे सरचिटणीस होते. १७ सप्टेंबर रोजी माझ्या एका नातेवाईकाची प्रकृती दाखवण्याकरिता मी डॉ. रणदिवे यांच्याकडे गेलो. तेव्हा त्यांनी १८ सप्टेंबर रोजी यशवंतराव काय बोलणार आहेत हे सांगितले. मी ' समाचार भारती ' मार्फत १७ सप्टेंबरलाच यशवंतराव उद्याच्या शिबिरात काय बोलणार हा वृत्तांत दिला. वक्त्यांची भाषणे झाल्यावर ती प्रसिद्ध होतात. काही वेळा वक्ता काय बोलणार याची कल्पना आलेली असते. त्यामुळे वार्ताहर भाषणाला गेला नसला तरी ठरलेले भाषण झाले समजून प्रत्यक्षात भाषणे न होताही वक्त्यांची भाषणे प्रसिद्ध झाली आहेत. मात्र ' उद्या यशवंतराव पुढे असेही म्हणतील ' असे म्हणून भाषणाचा वृत्तांत देण्याचा व तो छापून येण्याचा असा प्रसंग विरळाच ! डॉ. रणदिवे यांनी सांगितल्याप्रमाणे यशवंतरावांचे भाषण झाले आणि आदल्या दिवशी दिलेल्या भाषणाचा माझा वृत्तान्त खरा ठरला !

राष्ट्रपतिपदाची निवडणूक झाली व व्ही. व्ही गिरी निवडून आले. रेड्डी पराभूत झाले. त्यानंतर दोन्ही गटांनी एकमेकांच्या चुका काढायच्या नाहीत असे ठरवून पक्षऐक्याचा ठराव अ. भा. कॉंग्रेसने केला. ऐक्याचा ठराव यशवंतरावांनी केला असे म्हटले जाते; पण तो इंदिरा गांधी यांच्या कार्यालयात तयार झाला व यशवंतरावांचा ठराव म्हणून तो मांडण्यात आला. ( India After Nehru) महाराष्ट्र कॉंग्रेसच्या शिबिरात चर्चा सुरू झाली तेव्हा या ठरावानंतरचे म्हणजे २५ ऑगस्ट १९६९ नंतरचे बोला अशी भूमिका घेतली गेली. त्यामुळे यशवंतरावांनी संजीव रेड्डी यांच्या उमेदवारीला मत का दिले व त्यांच्या पराभवानंतर श्रीमती इंदिरा गांधी यांच्या गटाकडे यशवंतराव का गेले याची चर्चा करण्यावर आपोआपच बंधन पडले !

*

---

## १२

---

यशवंतरावांच्या राजकारणाची दोन वैशिष्ट्ये आहेत. पहिले त्यांनी सत्तेत राहण्याचे ठरवले आहे. दुसरे असे की, परिस्थितीचा अंदाज ते बरोबर घेत आले आहेत. हा अंदाज येईपर्यंत यशवंतराव कुंपणांवर बसतात आणि नीट अंदाज लागला की ते सोयीच्या ठिकाणी टुणकन् उडी मारतात ! भारतातील सर्व राजकीय विवेचकानी यशवंतराव चव्हाण यांच्या कुंपण-नीतीचा उल्लेख आपल्या लिखाणात केलेला आढळून येतो. जोपर्यंत त्यांचे अंदाज बरोबर ठरले तोपर्यंत त्यांचे राजकारण यशस्वी झाले. जेथे परिस्थितीचा अंदाज घेण्यात त्यांची चूक झाली तेथे त्यांच्या राजकारणाची फटफजिती झाली आहे. १९६९ मधील घटना हे त्या फटफजितीचे फार मोठे बोलके उदाहरण आहे.

**मार्च १९७७ मधील लोकसभा-निवडणुकीचा यशवंतरावांना अंदाज लागला नाही तो त्यांना लागला असता तर ' पांडवांसारखा वनवास सुरू झाला आहे ' असे म्हणण्याचा प्रसंग त्यांनी येऊ दिला नसता !** लोकसभा-निवडणुकीत उत्तर भारतामध्ये कॉंग्रेसची दाणादाण उडाली. एकाच पराभवाने कॉंग्रेसपक्ष विकलांग झाला. तीस वर्षे केंद्र व राज्यात सत्तेवर असलेल्या कॉंग्रेस पक्षाला पराभव पत्करावा लागताच नेते व कार्यकर्ते हादरून गेले व कॉंग्रेस नष्ट होणार काय असा प्रश्न उभा राहिला. दक्षिणेकडे कॉंग्रेस सावरून आहे त्यामुळे कॉंग्रेसचे अस्तित्व टिकून आहे. दक्षिणेकडे कॉंग्रेस सावरल्यामुळे दक्षिणेकडील कॉंग्रेस नेत्यांना पक्षाचे नेतृत्व आपल्याकडे येईल असे वाटू लागले. कॉंग्रेस सावरण्याची जबाबदारी आपल्यावर आहे ही भूमिका दक्षिणेकडील कॉंग्रेस नेते घेऊ लागले. ते ही भूमिका घेत असतानाच इंदिरा गांधी यांनी पुनः राजकारणात प्रवेश करण्याची तयारी केली. याचा परिणाम असा झाला की दक्षिणेकडील भारतीय पातळीवरील नेते एक होऊ लागले. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र या राज्यांत कॉंग्रेसचा पराभव उत्तरेएवढा दारुण झाला नाही. उत्तरेची पुनरावृत्ती आम्ही आमच्या राज्यात होऊ देणार नाही असा निर्धार महाराष्ट्र, आंध्र करू लागले आहेत. यशवंतरावांनी कॉंग्रेस वाचवण्यासाठी आक्रमक पवित्रा घेण्याची भाषा केली आहे.

> **यशवंतरावांची आक्रमकता वर्षाप्रमाणे टिकते ! भाषा आक्रमक, पण कृतीचे काय ? आक्रमक भाषेला कृतीची जोड दिली नाही तर ती राजा भोमदेवी वल्गना ठरते ! संयुक्त महाराष्ट्राच्या काळी काय यशवंतरावांनी आक्रमक पवित्रा**

**घेतला नव्हता? संयुक्त महाराष्ट्रासाठी मी लाल लंगोट कसला आहे अशी घोषणा मुंबईच्या शिवाजी पार्कवर यशवंतरावांनी केली होती; पण नंतर ते कुस्तीच्या आखाड्याच्या बाजूला फिरकलेसुद्धा नाहीत. महाराष्ट्राचा मुंबईवरील हक्क नाकारणे हा स्वदेशी वसाहतवाद आहे अशी गर्जना यशवंतरावांनी पुण्याला काँग्रेस कमिटीपुढे केली नव्हती काय? ही गर्जना किती काळ टिकली? मोरारजी व पंडित नेहरू यांनी डोळे वटारताच यशवंतराव चव्हाण यांनी मोरारजीभाई देसाई यांच्याकडे सपशेल माफी मागणारे पत्र पाठविले होते. यशवंतरावांच्या आक्रमकतेचा हा असा इतिहास आहे. म्हणूनच महाराष्ट्र काँग्रेसमधील प्रमुख मंडळी त्यांच्या आक्रमक भावेची खाजगी बोलण्यात टिंगल करीत असतात!**

आक्रमकतेची भाषा केली तरी ते त्यासाठी पुढाकार घेत नाहीत. यशवंतरावानी महाराष्ट्रातील पुरोगामी विचार करणारांचा तेजोभगसुद्धा केला आहे. त्यामागे त्यांची मनोवृत्तीच कारणीभूत आहे!

एप्रिल १९६९ मध्ये फरिदाबादला काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्याच्या आधी चार-पाच महिने महाराष्ट्र काँग्रेसमधील 'पुरोगामी विचारांच्या तरुणाच्या मनात महाराष्ट्र काँग्रेसने देशाला पुरोगामी नेतृत्व द्यावे असा विचार आला होता. शरद पवार, विठ्ठल गाडगीळ, शिवाजी पाटील व तुषार पवार त्या वेळी महाराष्ट्र काँग्रेसचे सरचिटणीस होते. या सर्वांनी पुरोगामी नेतृत्वाचा विचार केला होता. त्यासाठी त्यांनी एक योजनाही आखली. ती प्रत्यक्षात कशी उतरावयाची हाच प्रश्न होता. काँग्रेसपक्ष समाजवादाची भाषा बोलतो; पण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत पक्ष आग्रही राहात नाही. पक्षाच्या ठरावांची अंमलबजावणी सरकार करत नाही. ही कोंडी फोडली पाहिजे. त्यातून पक्षाला व देशाला बाहेर काढले पाहिजे असे या चौघाना वाटत होते. त्यांच्याबरोबर असलेल्या इतरही काही कार्यकर्त्यांना हे विचार पटले होते. काँग्रेसच्या राजकारणामुळे देशाचे राजकारण कुंठित (स्टॅग्नंट) झाले होते. त्यातून बाहेर पडण्याच्या मार्गाचा विचार करण्यासाठी प्रदेश काँग्रेसचे सर्व सरचिटणीस वसंतरावदादा पाटील यांच्या गनबो स्ट्रीटवरील घरी जमले. दादा महाराष्ट्र काँग्रेसचे त्या वेळी अध्यक्ष होते. या बैठकीत एका योजनेने जन्म घेतला आणि तिचे कलेवर मात्र दिल्लीत झाले!

कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या प्रश्नावर महाराष्ट्र काँग्रेसने अशी भूमिका घ्यावी किंवा अशी कारवाई करावी की त्यामुळे काँग्रेसश्रेष्ठींना महाराष्ट्रावर शिस्तभंगाची कारवाई करणे भाग पडले पाहिजे. त्यातून प्रदेश काँग्रेस बरखास्त करावी लागेल असे पाऊल उचलावे. ते झाले की मग महाराष्ट्रातील काँग्रेस, शेतकरी, कामगार, समाजवादी व रिपब्लिकन पक्ष या पुरोगामी पक्षांना एकत्र घेऊन देशाला पुरोगामी पक्षाचे नेतृत्व द्यावे अशी ही योजना होती. ही योजना आखण्यात आली तेव्हा विठ्ठल गाडगीळ यानी यशवंतराव चव्हाण यांचे नाव घेतले नाही; पण आपल्या विधानाचा रोख त्यांच्यावर ठेवून गाडगीळ म्हणाले, 'आपण हे करीत असताना काहीजणांना आपली भाग्यरेषा आपल्या हाताने पुसण्याची तयारी ठेवावी! लागेल-' तुषार पवार त्यापुढे गेले. 'पुरोगामी पक्षाची देशाला आवश्यकता आहे. महाराष्ट्र काँग्रेस स्वत:ला पुरोगामी म्हणणून घेत असेल, तर तिने या कामी पुढाकार घेतला पाहिजे. असा पुढाकार घेतल्यानंतर देशाला पुरोगामी नेतृत्व देण्यासाठी काँग्रेसमधील एक व्यक्ती त्याला पात्र आहे. इंदिरा गांधीशिवाय असे नेतृत्व कोणी देणार नाही!' असे विचार तुषार पवार यानी मांडले होते.

प्रदेश काँग्रेस अध्यक्ष वसंतदादा पाटील याच्या घरी हा विचार झाला. यशवंतराव चव्हाण यांना ही योजना सांगण्याचे ठरले. त्याप्रमाणे चारही सरचिटणीस दिल्लीला गेले. यशवंतरावांनी योजना ऐकून घेतली व 'काँग्रेसमध्ये फूट ही कल्पनाच आपल्याला सहन होणारी नाही.' असे यशवंतराव चव्हाण यानी सांगून टाकले! *

---

# १३

---

एखादा निकराचा प्रसंग आला की, यशवंतराव त्याच्याकडे पूर्णपणे पाठ फिरवितात किंवा परिस्थिती पूर्ण आकाराला येईपर्यंत वाट पाहात बसतात. त्यामुळेच सध्याच्या राजकारणात जरी यशवंतराव आक्रमक बनण्याचा पवित्रा घेऊन काँग्रेस पुन: बांधण्याची भाषा करीत असले तरी ते ही झेप घेऊ शकतील का असा प्रश्न पडतो. अजूनही ते इंदिरा गांधी याची धास्ती घेऊन वागतात व बोलतात! आणीबाणी आणण्यात आमची चूक झाली असे स्पष्टपणे ते म्हणत नाहीत. त्यासंबंधी यशवंतराव अत्यंत गुळमुळीत बोलतात. न जाणो इंदिरा गांधी पुन: पक्षाच्या नेत्या झाल्या व भविष्यकाळात परत पंतप्रधान बनल्या तर? ही भीती त्यांना वाटते म्हणूनच यशवंतराव आणीबाणी ही चूक झाली असे न म्हणता काही निर्णय घेतले नसते तर बरे झाले असते असे गुळगुळीत, निसरडे विधान करीत असतात!

महाराष्ट्र किंवा अगदी दक्षिणेकडची सर्व राज्ये काँग्रेसने टिकवून धरली तरी यशवंतरावांना अखिल भारतीय काँग्रेसचे नेतृत्व करता येणार नाही., महाराष्ट्र वगळता यशवंतरावाच्या मागे कोणत्या भागातील कार्यकर्ते आहेत? उत्तर प्रदेश काँग्रेस समिती अजूनही इंदिरा गांधी यांनी नेतृत्व करावे असे ठराव करीत आहे. बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, पश्चिम बगाल यशवंतराव चव्हाण यांना जवळ करीत नाही. उत्तर भारतातील एकही प्रदेश काँग्रेस समिती यशवंतरावांच्या बरोबर नाही. अशा परिस्थितीमध्ये ते अखिल भारतीय नेतृत्व कसे काय देणार? दक्षिणेत जनता पक्षाचा अश्व रोखला तरी आजही इंदिरा गांधीचा प्रभाव काँग्रेसवर आहे. पैशाच्या जोरावर त्यांनी आपला प्रभाव कायम ठेवला की आणखी कशाच्या जोरावर, हा मुद्दा अप्रस्तुत आहे. इंदिरा गांधीच काँग्रेस पक्षाला नेतृत्व देऊ शकतील असे जनता पक्षाचे नेतेही मानतात. त्यामुळेच इंदिरा गांधी यांच्या राजकारणप्रवेशाला ते विरोध करतात. इंदिरा गांधीशिवाय काँग्रेसपासून आपल्याला धोका नाही याची त्यांना खात्री असल्यामुळेच इंदिरा गांधी पुन: राजकारणात येऊ नयेत अशी जनता पक्षाची खटपट आहे.

केंद्रात इतकी वर्षे मंत्री राहूनही यशवंतरावांना अन्य राज्यांतील कार्यकर्ते, प्रमुख नेते यांना बरोबर घेता आले नाही. राज्या-राज्यांतील प्रमुख कॉंग्रेस नेत्याना यशवंतरावाविषयी भरवसा वाटत नाही. तो विश्वास त्यांनी निर्माण केलेला नाही. इतक्या वर्षांत राजधानीतील पत्रकारानाही ते विश्वासात घेऊ शकले नाहीत. यशवतरावांचे झंझावाती दौरे महाराष्ट्रात होत आहेत. भारताच्या इतर भागात विशेषत: उत्तर भारतात यशवंतरावाच्या जाहीर सभा झालेल्या नाहीत. ते त्या भागाचा दौरा करू शकलेले नाहीत. अशा परिस्थितीमध्ये यशवंतराव संपूर्ण कॉंग्रेसला नेतृत्व कसे देणार ? भाषणात 'आम्ही आक्रमक पवित्रा घेणार ' अशी घोषणा करून ही आक्रमकता येत नाही. यशवंतरावानी आक्रमक पवित्र्याची भाषा करताच ना. ग. गोरे म्हणाले, 'यशवंतरावांनी आक्रमक होण्याचे ठरविले ही समाधानाची गोष्ट आहे. आता त्यानी त्याप्रमाणे वागावे !' *

## १४

यशवंतराव चव्हाण यांच्यामागे देशातील कॉंग्रेस सोडाच; पण आजच्या घटकेला महाराष्ट्रातील कॉंग्रेस तरी एकमुखाने आहे काय ? यशवंतराव अप्रत्यक्षपणे इंदिरा गांधीविरुद्ध भूमिका घेत आहेत. त्याउलट यशवंतराव मोहिते 'मी इंदिरा गांधींचा एकनिष्ठ अनुयायी आहे !' असे सांगत आहेत. मुख्य मंत्री वसंतराव पाटील 'इंदिरा गांधी आमच्या नेत्या आहेत !' असे म्हणतात. 'यशवंतराव चव्हाण आमचे नेते आहेत' असे महाराष्ट्र कॉंग्रेसमधील वरिष्ठ नेत्यांपैकी वा मंत्र्यांपैकी कोणी जाहीर केलेले नाही. इंदिरा गांधींनी महाराष्ट्राचा दौरा करावा असे निमंत्रण त्यांना प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष नरेंद्र तिडके देऊन येतात व महाराष्ट्रात गांधी आल्या तर त्यांचे स्वागत करू असे वसंतराव पाटील म्हणतात. इतकेच कशाला? मुंबईत १० व ११ सप्टेंबर १९७७ रोजी भरलेल्या कार्यकर्त्यांच्या शिबिरात यशवंतरावांचे भाषण संपताच इंदिरा गांधी झिंदाबादच्या प्रचंड घोषणा दिल्या गेल्या व यशवंतराव चव्हाण. झिंदाबादची घोषणा झाली; पण त्या एका आवाजाला कोणाचा प्रतिसादही मिळाला नव्हता, हेही लक्षणीयच आहे.

यशवंतरावांनी ते मुख्यमंत्री असताना कृषि-उद्योगाला चालना दिली व महाराष्ट्रात साखर कारखाने उभारले गेले. ते यशस्वीपणे चालविले गेले. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बदलली. जिल्हा मध्यवर्ती बँका, जिल्हा परिषद यामुळे महाराष्ट्रात कॉंग्रेसने चांगलेच मूळ धरले. आता साखर कारखाने, जिल्हा बँका व जिल्हा परिषदा या सत्तेचे अड्डे बनले आहेत यशवतरावांनी या अड्ड्यांवर आपली माणसे बसविली होती. आता ही माणसे समर्थ बनली असून त्यांचे हितसंबंध निर्माण झाले आहेत. या हितसंबंधांचे रक्षण यशवंतरावांपेक्षा वसतराव पाटील यांच्याकडून होईल याची जाणीव त्याना झाली असल्याने त्यांच्या आशा वसतराव पाटील यांच्यावर केंद्रित झाल्या आहेत. यशवतराव व वसतराव पाटील यांचे संबंध जाहीर रीत्या सलोख्याचे दिसत असले तरी वस्तुस्थिती त्याच्याविरुद्ध आहे. शिवाय आज सत्तेत वसंतराव पाटील आहेत. यशवंतरावांकडे सत्ता नाही. आपल्या हितसंबंधाचे रक्षण सत्ताधाऱ्याकडून होणार आहे, याची जाणीव सत्तेच्या अड्ड्यांवर असलेल्या मातब्बरांना आहे. त्यामुळे ते यशवतरावांच्या मागे उभे राहण्णाऐवजी वसतराव पाटील यांच्या मागे आपली शक्ती उभी करणार हे साहजिकच आहे. आपले नेतृत्व कायम करण्यासाठी वसंतराव पाटील आगामी विधानसभा निवडणुकीत आपल्याला योग्य वाटतील असे उमेदवार निवडतील. त्याचप्रमाणे आपला प्रभाव कायम राहावा याकरिता यशवतराव चव्हाण यांचाही प्रयत्न राहील. आपल्याला मुख्यमंत्रीपद मिळावे याकरिता यशवंतराव मोहितेही प्रयत्नशील राहतील. त्यामुळे महाराष्ट्रातील कॉंग्रेसमध्ये नेतृत्व आपल्याकडे टिकविण्यासाठी अंतस्थ सुंदोपसुंदी चालू आहे. **महाराष्ट्रही आपल्या हातात राहतो की नाही ही यशवंतरावांची चिंता आहे.** स्वतःच्या राज्यात अशी अवस्था असताना देशातील कॉंग्रेस यशवंतरावाचे नेतृत्व कशी स्वीकारील ? शिवाय कॉंग्रेसजनांना सत्तेशिवाय राहता येत नाही. त्यामुळे पाण्याबाहेर काढलेल्या मासळीसारखी त्यांची अवस्था होते. विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला बहुमत मिळाले व वसतराव पाटील किंवा यशवंतराव मोहिते मुख्यमंत्री झाले तर महाराष्ट्रातील कॉंग्रेसजन त्याच्यावरोबर राहतील. यशवंतराव चव्हाण यांच्याकडे सत्ता नसल्याने कॉंग्रेसजन त्यांचे नेतृत्व मानण्याच्या अवस्थेत राहणार नाहीत. महाराष्ट्रात आपला प्रभाव कायम ठेवण्यासाठी यशवंतराव महाराष्ट्रातच अधिक प्रयत्न करतील. याचा परिणाम असा होईल की त्याना देशाच्या नेतृत्वाकडे लक्ष देता येणार नाही. **स्पष्ट भूमिका घेण्याचा अभाव, परिस्थितीचा अदाज घेण्यासाठी कुंपणावर बसण्याची प्रवृत्ती, इतर राज्यांतील कार्यकर्त्यांबरोबर संपर्क नाही, कोणताही धोका पत्करण्याची तयारी नसणे व सत्तेच्या राजकारणात राहण्याची खबरदारी या व अशा अनेक कारणांमुळे यशवंतरावांनी आक्रमक भूमिका घेण्याचे ठरविले तरी त्यांना ती घेता येणार नाही व त्यांच्याकडून नेतृत्वही दिले जाणार नाही!**

यशवंतरावांच्या पुढे देशाला नेतृत्व देण्याच्या प्रश्नापेक्षा महाराष्ट्रातील नेतृत्व कायम ठेवण्याचाच प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र हा त्यांचा राजकारणाचा पाया आहे. तिथेच त्याचे नेतृत्व धोक्यात येते की काय अशी परिस्थिति निर्माण होऊ लागली आहे. □

**['ग्रंथाली' वाचक-चळवळीमार्फत महाराष्ट्रातील राजकीय सत्तास्पर्धेचा विस्तृत आढावा घेणारे पत्रकार श्री. जगन फडणीस यांचे पुस्तक लवकरच प्रसिद्ध होत आहे. वरील लेख आगामी पुस्तकावर मुख्यतः आधारित आहे.]**

# चव्हाणांची शोकांतिका ही आहे.... ते मोघमपणाला मुत्सद्देगिरी लाचारीला तडजोड नुसत्या गोडगोड बोलण्याला धोरण आणि निष्क्रियतेला समन्वय मानू लागले....

चंद्रशेखर

मार्च ७७ मधील लोकसभा निवडणुकीने अनेक आश्चर्ये घडविली त्यापैकी व्यक्तिशः सर्वांत मोठे आश्चर्य मला वाटते ते हे की यशवंतराव चव्हाण सत्तारूढ पक्षातून विरोधी पक्षात गेले ! कधीही घडणार नाही असे हे घडले ! १९४७ सालापासून सात तीस वर्षे चव्हाण कोणत्या ना कोणत्या सत्तास्थानी होते. सत्ता-केंद्रापासून ते कधी दूर फेकले जातील अशी कल्पनाही कोणी करू शकत नव्हते. सर्वसामान्य जनाना प्राणवायूचे जे महत्त्व तेच महत्त्व सत्तेला चव्हाणांच्या लेखी राहिले आहे सत्तेपासून दूर जावे लागेल अशी कोणतीही कृती चव्हाणानी कधीही केली नाही. त्यानी अनेक कोलाटया उड्या मारल्या, अनेक तत्त्वांचा द्रोह केला, अनेकवार आपल्या नेहरू-इंदिरानिष्ठेची अशोभनीय ग्वाही दिली हा साराच अट्टाहास मंत्रीपद या एका गोष्टीसाठी होता. हवेत कोलांटया मारून, परत दोरीवर मलगद, अचूक पाय रोवून उभे राहणाऱ्या एखाद्या कसबी डोंबाऱ्याप्रमाणे चव्हाण सत्तेच्या खुर्चीवर स्थिर राहिले.

याही वेळी विरोधी पक्षात जाणे हा निर्णय त्यांनी जाणीवपूर्वक घेतला नव्हता सत्तेवर टिकून राहण्यासाठीच त्याची सारी धडपड होती. कधी कधी असे घडते की एखादा राजकीय नेता, काही तत्त्वासाठी सत्तेला रामराम ठोकून विरोधी शक्ती म्हणून उभा राहतो. मोहन धारियांचे उदाहरण या प्रकारचे आहे; पण चव्हाण विरोधी नेते बनले याचे कारण त्यांचा पक्षच सत्तेवरून दूर हटला हे होय. एरवी चव्हाण आणीबाणीचे, शिस्तीचे, इंदिरा-प्रशस्तीचे गोडवे गात गात मंत्रीपदाला चिकटून राहिलेच असते ! यापेक्षा त्यांनी काही वेगळे केले असते असे वाटत नाही

महाराष्ट्रात चव्हाण यांना राष्ट्रनेता मानतात. 'चव्हाण म्हणजे महाराष्ट्र' हे समीकरण गेली २० वर्षे तरी रुढ आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाची सूत्रे एकमात्र स्वतच्या हातात ठेवण्यात चव्हाण यशस्वी होत आले आहेत. एक यशस्वी राजकारणी म्हणून त्याचा लौकिक आहे.

'After Nehru Who ?' या आपल्या ग्रंथात व्हेलेस हेंगन यानी नेहरूंचे वारसदार म्हणून ज्या सात-आठ लोकाचा समावेश केला होता त्यात चव्हाणाचे नाव होते हे पुस्तक सुमारे १५ वर्षांपूर्वी लिहिले गेले. नेहरूचे एक वारसदार म्हणून ज्या चव्हाणाचा १५ वर्षांपूर्वी उल्लेख झाला त्या चव्हाणाची राजकीय वाटचाल नंतरच्या काळात कशी झाली ? परवाची निवडणूक कॉंग्रेस हरली नसती तरी, चव्हाण याचे राजकीय भवितव्य काय राहिले असते ?

हे प्रश्न जरा चमत्कारिक आहेत; पण आवश्यक आहेत. यशस्वी राजकारणी नेत्याचा एक नमुना (प्रोटोटाइप) म्हणून चव्हाण यांच्याकडे पाहाता येते. म्हणूनच राजकारणातील यश, सत्ता-संपादन याचा व देशाचे प्रश्न, जनतेचे हित याचा कितपत व कसा संबंध आहे हे जाणून घेण्यासाठी चव्हाणाची राजकीय कारकीर्द उपयुक्त ठरते.

चव्हाणांनी केंद्र सरकारमध्ये, संरक्षण, गृह, अर्थ व परराष्ट्र ही खाती सांभाळली. पैकी अर्थखात्यात असताना ते खूप अस्वस्थ, नाराज होते व राजीनामा देण्याचा विचार कधी कधी त्यांच्या मनात येई असे त्यांचे अधिकृत चरित्रकार टी. व्ही. कुन्हीकृष्णन् नमूद करतात. (यावर विश्वास बसणे पण कठीणच आहे; पण चव्हाण अर्थमंत्री म्हणून अस्वस्थ होते हे खरे आहे.)

## सुरळीत कारकीर्द

यापैकी कोणत्याही खात्यात चव्हाण यांनी काही भरीव कामगिरी केल्याचा पुरावा नाही. प्रथम सरक्षणमंत्री झाल्यावर ' हिमालयाच्या सहाय्याला सह्याद्री ' वगैरे गवगवा झाला; पण तो तितकाच. गृह-खात्यात असताना चव्हाण याच्याकडे 'सेन्सिटिव्ह' विभाग नव्हते. ते खुद्द इंदिरा गांधीकडेच होते. अर्थमंत्री असताना त्यांच्या कारकीर्दीत किंमती दुपटीने वाढल्या, सर्व आर्थिक प्रश्नांचे स्वरूप जास्त तीव्र झाले व देशमुख वा कृष्णम्माचारी याच्याप्रमाणे चव्हाण नवे आर्थिक उपक्रम करू शकले नाहीत. अर्थखात्यातील सचिवगण व अमेरिकन ट्रेझरी सेक्रेटरी यांच्या मते चव्हाण यांचे अर्थशास्त्राचे ज्ञान बालसदृश अजाण-पणात (child-like innocence) जमा होते. परराष्ट्रखाते हे असे खाते आहे की ज्यामध्ये नेहरूनी घालून दिलेले धोरण पुढे चालू ठेवणे एवढेच काम असते. डॉ. किसिंजर किंवा ग्रोमिको याच्याप्रमाणे चव्हाण यांनी आंतरराष्ट्रीय सबंधात काही चमत्कार घडवून आणला नाही किंवा आफ्रो-आशियाई गटाचे राजकारण खास पुढे रेटले नाही.

त्यांच्या १५ वर्षांच्या केंद्रीय मंत्रिपदाच्या कारकीर्दीत कोणत्याही खात्याच्या क्षेत्रात गंभीर पेचप्रसग उद्भवले नाहीत; त्या त्या खात्याचे शासकीय काम चव्हाणांनी सुरळीतपणे केले एवढे म्हणता येईल. सत्तेचा वा मंत्रिपदाचा वापर करून चव्हाण यानी लोकाचे व्यापक प्रश्न सोडविण्याचा काही प्रयत्न केला नाही. राज-कीय नेते म्हणून ते महत्त्वाचे असल्यानेच त्याना ही मंत्रिपदे द्यावी लागली --यापेक्षा काही खास तात्त्विक वा तत्त्वज्ञानात्मक पात्रता ( व्ही. के आर. व्ही. राव वा सिद्धार्थशकर रे याच्याप्रमाणे ) चव्हाण यांच्यापाशी नव्हती. त्यामुळे चव्हाण याच्या राजकीय कारकीर्दीचा विचार करताना त्यांचे मंत्रीपद विसरूनच विचार करावा लागतो.

जे चव्हाण मंत्रिपदासाठी सातत्याने राजकारण करतात, त्यांच्या बाबतीत, ते मंत्रिपदच बिनमहत्त्वाचे ठरवायचे ही गोष्ट थोडी चम-त्कारिक वाटेल; पण ही वस्तुस्थिती आहे.

राजकीय नेते म्हणून चव्हाण यांचा प्रभाव या १५ वर्षांत कमी झाला की वाढला ? देशाच्या राजकारणात त्यांनी या काळात कोणता रोल बजावला ?

१५ वर्षे सतत केंद्रीय नेतृत्वात राहूनसुद्धा चव्हाण याना राष्ट्रीय पातळीवरील नेता ही प्रतिमा प्राप्त झालेली नाही ही गोष्ट वारंवार स्पष्ट होते. निवडणुकीच्या काळात चव्हाण याची रवानगी महारा-ष्ट्राची आघाडी लढविण्याकरिता होते., इतर राज्यांत स्वतःच्या हिंमतीपर निवडणुकीचे वातावरण बदलण्याची चव्हाण याची शक्ती नाही. आजसुद्धा कॉंग्रेस पक्षाचा खरा प्रश्न असा आहे की इंदिरा गांधी सोडून त्या पक्षाजवळ राष्ट्रीय पातळीवरील नेते नाहीत !

' कॉंग्रेसचा नेता कोण ? ' असा प्रश्न नुकताच विचारला गेला असता चव्हाण म्हणाले 'कॉंग्रेस अध्यक्ष हा आमचा नेता !' आजवरचे कॉंग्रेस अध्यक्ष सजीवय्या, ढेबर, शंकरदयाळ शर्मा, निजलिंगप्पा, देवकांत बारुआ हे राष्ट्रीय पातळीवरचे नेते होते असे चव्हाण सुचवीत असतील तर ते स्वत.चीच फसवणूक करीत आहेत.

इंदिरा गांधी पंतप्रधान असताना ' कॉंग्रेस अध्यक्ष आमचा नेता ! ' हे म्हणण्याचे चव्हाणांना कधी सूचले नाही. त्यांची तशी हिंमत कदापि झाली नसती !

चव्हाणांच्या वरील उत्तरातच ते स्वतः ' राष्ट्रीय नेता ' म्हणून आपला अधिकार सांगू शकत नाहीत हे उघड आहे.

गेल्या १५ वर्षांतील राजकारणात चव्हाणानी कोणता रोल बजावला हे पाहता महाराष्ट्राचे ५० खासदार हाताशी बाळगून, जेथे विजयाची आशा दिसेल तिकडे वळायचे असे चव्हाणाचे धोरण होते. चव्हाणाची ही ५० खासदाराची तैनाती फौज होती व तिच्या आधारे चव्हाण केंद्रातील आपले आसन टिकवून धरीत.

चव्हाण याना ५० मराठी खासदार वगळता इतरत्र स्वत.चा असा काही गट तयार करता आला नाही. अन्य प्रातातील घडा-मोडीवर चव्हाणांचा प्रभाव फारसा नाहीच.

१९६४, १९६६ व १९६७ या तीन पक्षांतर्गत लढतीत चव्हा-णांनी आपली तैनाती फौज नेहरूंच्या निकटवर्तीयांमागे उभी केली, प्रथम शास्त्री व नंतर इंदिरा गाधी याना पाठिंबा दिला. याचे कारण चव्हाणाची नेहरूनिष्ठा हे जसे आहे तसेच जिंकण्याची शक्यता असलेल्या बाजूस आपण उभे रहावयाचे ही त्याची वृत्ती हेही आहे. या तीनही वेळी मोरारजी देसाई हे नेतृत्वाच्या स्पर्धेत होते. देसाई हे वास्तविक चव्हाणाचे राजकीय गॉडफादर ! १९४७ पासून १९५६ पर्यंत चव्हाण त्याच्याच आशीर्वादाने सत्तेवर राहिले !

पण देसाई याना विशेष पाठिंबा नाही याची कल्पना येताच चव्हाण यानी त्याच्या विरोधात आपले वजन टाकले.

### परिस्थितीला वळण लावावे, काही तरी स्वतः घडवावे, आपले बळ इरेला घालावे हे चव्हाण यांच्या राजकारणात नाहीच !

१९६९ सालच्या सिंडिकेट-इंडिकेट सघर्षात चव्हाण पुन्हा आपल्या वृत्तीप्रमाणेच वागले. पक्षाच्या नेतृत्वास आव्हान देऊन इंदिरा गांधी या यशस्वी होतील असे चव्हाणाना वाटले नाही, म्हणून त्यानी राष्ट्र-पति निवडणुकीत सिंडिकेटला पाठिंबा दिला. सुरक्षित राजकारणाची कास त्यानी याही वेळी सोडली नाही !

पण जेव्हा पारडे फिरणार असे दिसले, इंदिरा गाधीचा नवा अवतार प्रकट झाला, तेव्हा चव्हाणानी बाजू बदलली ! याच सुमारास त्यांनी केव्हा तरी असाही निर्णय मनाशी केला की आपली राजकीय महत्त्वाकांक्षा इतपतच मर्यादित ठेवून यापुढील काळ इंदिरानिष्ठ म्हणून काढावयाचा. काही काळानंतर तुम्हास पतप्रधान करू असे निश्चित आश्वासन कामराजानी चव्हाणाना दिले होते; पण पुढच्या आश्वासनावर विसंबून काही धोका पत्करणेच चव्हाणाना मानवणे शक्य नव्हते !

१९६९ ते १९७६ या काळात चव्हाणानी काय केले हा एक विचार करण्यासारखा मुद्दा आहे. इंदिरा गाधी याचे एकमुखी राज-कीय नेतृत्व प्रस्थापित होत आहे याची त्याना नक्की कल्पना असणार! ज्याना ज्यांना काही राजकीय बेस आहे त्याना उखडून काढण्याचे राजकीय सूडसत्र इंदिरा गाधी चालवीत आहेत हे त्यांना दिसत होते, त्याच्या स्वत.च्या स्थानासही धक्का बसावा या हेतूने महाराष्ट्राच्या राजकारणात घालमेल चालली होती हे ते जाणून होते. तरी देखील पक्षात, मंत्रिमंडळात, संसदेत कोठेही चव्हाण यानी या सर्व प्रकारास आळा घालण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत नाही. राजकीय दृष्ट्या

चव्हाण यांनी 'कमीत कमी प्रतिकार' हे धोरण स्वीकारले. याहीपुढे जाऊन जेव्हा इंदिरा गांधींनी आणीबाणीच पुकारून स्वतःची हुकूमशाही प्रस्थापित केली तेव्हाही चव्हाण गप्प बसले.

त्यांनी आणीबाणीचे समर्थन केले. इंदिरानिष्ठेचा गजर चालू ठेवला आणि राजकीय नेता म्हणून आपली जबाबदारी पूर्णपणे झटकून टाकली. त्यांच्या हिशेबात ते अद्यापही सत्तेच्या योग्य बाजूसच होते, जिंकणाऱ्या पक्षातच होते. राजकारणात त्यांना काहीहि स्थान उरले नव्हते, सर्व निर्णय-प्रक्रियातून त्यांना वगळण्यात येत होते. तरी देखील आपण सत्तेच्या जवळ आहोत हा आभास टिकविण्याचा त्यांचा हा जवळजवळ केविलवाणा प्रयत्न होता; पण जनतेने या वेळी त्यांचा हिशेब उधळून लावला !

त्यांच्या सर्व राजकीय हुषारीचा, हिशेबाचा काही उपयोग झाला नाही व एका फटक्यात ते प्राणाहून प्रिय अशा सत्तास्थानापासून हाकलले जाऊन विरोधी पक्षाचे पुढारी बनले !

१९७१ पासूनच्या काळातील चव्हाणांच्या वागण्याचा अर्थ लावणे सोपे नाही. चव्हाण यांची राजकीय शैली व इंदिरा गांधी याचे राजकारण यात कसलेही साम्य नाही. चव्हाण माणसे जोडणे, त्यांना अंकित करून ठेवणे, कोठलीही बाब विकोपाला न जाऊ देणे, अतिरेकी भूमिका टाळणे या साऱ्याचा वापर राजकारणात करतात; तर इंदिरा गांधींचे याच्या सारे उलट. त्या माणसांना वापरीत व नंतर फेकून देत ! आव्हाने देणे, पेचप्रसंग उभे करणे, विरोधकांना निष्ठुरपणे ठेचून काढणे, फटाफट निर्णय घेणे, सर्व स्वतंत्र प्रभावांना निष्प्रभ करणे हे इंदिरा गांधींचे राजकारण होते. त्यांच्याजवळ तडजोड, समन्वय, चुचकारणे, वैचारिक देवाण-घेवाण करणे या चव्हाणांना प्रिय असणाऱ्या गोष्टी नव्हत्याच

. इंदिरा गांधींच्या हट्टवादी, कठोर, व्यवहारी, स्वयकेन्द्रित राजकारणाशी जुळवून घेताना चव्हाण यांना खरे म्हणजे खूप जड गेले असणार. घुसमटल्यासारखे झाले असणार; पण त्यांनी हे केले. आपली राजकीय प्रकृती, श्रद्धा, भूमिका या साऱ्यांच्या व्यापातून सुटण्यासाठी त्यानी एक मार्ग काढला तो असा की सारे प्रश्न, जबाबदाऱ्या, निर्णय, बुद्धी इंदिरा गांधींकडे सोपवून ते मोकळे झाले ! इंदिरानिष्ठा या महामंत्राचा त्यानी अंगीकार केला.

असेच त्यांनी मागेही एकदा केले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाच्या वेळी नेहरूंवर निष्ठा जाहीर करून त्यानी सर्व जबाबदारीतून, परिस्थितीचे आकलन करण्याच्या जबाबदारीतून सुटका करून घेतली होती.

स्वतःच्या निर्णयशक्तीचे स्वेच्छेने दान करून टाकणे हा चव्हाणांचा विशेष आहे हे दोन्ही प्रसंगी दिसून आले. हे करण्यामागे एक विचार असा असावा की, काँग्रेसला नेहरूनंतर इंदिरा गांधी याच्याशिवाय पर्याय नाही, म्हणून त्यांच्यावरील निष्ठा हा घटक प्रमुख मानून आपली सर्व भूमिका ठरवायची.

नेहरूंच्या बाबतीत हे ठीक होते; पण इंदिरा गांधींच्या बाबतीत सुरुवातीचा काही काळ सोडला तर, पर्यायी नेतृत्व निर्माण करण्याचा काही प्रयत्न चव्हाण यांनी का केला नाही ? एखादी व्यक्ती सर्वोच्च महत्त्वाची मानायची व त्यानुसार आपले राजकारण करायचे असे चव्हाण का करीत राहिले ? इंदिरा गांधींनी स्वतः नेमलेली काही माणसे (उदा गोखले, रजनी पटेल) हा मार्ग अनुसरत होती हे समजण्यासारखे आहे. कारण त्यांना राजकीय बेस काही नव्हता. इंदिरा गांधींची मर्जी ह्यावरच त्यांचे राजकीय भवितव्य अवलंबून होते; पण चव्हाणांचे तसे नव्हते. त्यांना स्वतःचा असा राजकीय पाठिंबा होता. खूप मोठ्या अशा प्रयत्नानी त्यानी तो मिळवला होता. तो टिकवण्यासाठी चव्हाण सतत जागरूक असत.

असा हा पाठिंबा चव्हाणानी इंदिरा गांधींच्या पायी वाहिला—तोही एका मंत्रिपदाच्या मोबदल्यात, की ज्या मंत्रिपदावरून चव्हाण विशेष काही करू शकले नाहीत. चव्हाणांचा राजकीय प्रवास असा हा काहीसा निरर्थक आहे. खूप धडपड; पण त्याचे फलित अगदीच नगण्य अशी त्याची अवस्था गेली १५ वर्षे होती.

## उजवा कालखंड

त्या मानाने १९५७ ते १९६२ हा काळ चव्हाणांच्या कर्तृत्वाच्या दृष्टीने खूपच उजवा वाटतो. प्रखर विरोधाला तोड देत त्यानी राज्याची सूत्रे हाती घेतली; काँग्रेसच्या पडत्या काळात त्यानी पक्षाची यंत्रणा राज्यभर मजबूत केली; राज्यातील चारही विभागाशी चांगला संपर्क प्रस्थापित केला. १९६० साली महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यावर त्यानी शिक्षण, ग्रामीण विकास, मराठी भाषा, सहकार या विषयात काही चांगले उपक्रम सुरू केले. काँग्रेसचा प्रभाव वाढवीत असतानाच विरोधकांनाही त्यांनी सौजन्य, सुसंस्कृतपणा, वैचारिक देवाण-घेवाण यांच्या द्वारे आपलेसे केले. जनतेचे नैराश्य दूर करण्याचे, भावी विकासासाठी सन्मुख करण्याचे राजकीय नेत्याचे काम चव्हाण यांनी या काळात चांगले केले. नेहरूंबद्दल सर्व देशात जी भावना होती, तीच या काळात चव्हाणांबद्दल महाराष्ट्रात दिसून येई.

नेहरूंचा जो उल्लेख वर आला तो केवळ योगायोग नाही. आपल्या राजकीय उमेदवारीच्या काळात, म्हणजे १९४७ ते १९५७ दरम्यान, चव्हाणानी नेहरूंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून स्वतःची राजकीय वागणूक घडविली होती. त्यांच्या भाषणात अद्यापही नेहरूंच्या भाषणाचा भास होतो. एक सुसंस्कृत, मोकळेढाकळे, विशाल स्वप्न पाहणारे, जनतेला विश्वासात घेणारे, बेसिकली आकर्षक असे वाटणारे व्यक्तिमत्त्व म्हणून स्वतःला प्रोजेक्ट करण्यात चव्हाण खूप यशस्वी झाले.

या साऱ्या आकर्षकपणामागे आणखी एक गोष्ट होती. १९५७ पर्यंत मराठी मुलखाची सारी सूत्रे उच्चवर्णीय व गुजराथी नेते याच्या हातात होती. त्याची सुसंस्कृतता, विद्वत्ता, प्रचंड व्यक्तिमत्त्व यांच्या तुलनेने त्या वेळी ग्रामीण भागातूनच येणारे नेतृत्व फार ओबडधोबड, रांगडे वाटे. या ग्रामीण नेतृत्वाच्या पार्श्वभूमीवर चव्हाण यांनी प्रयत्नपूर्वक कमावलेले व्यक्तिमत्त्व फार उठून दिसले. सर्व थरातील मराठी जनतेने चव्हाण याना नेता म्हणून स्वीकृत केले.

चव्हाणाना हे यश मिळाले, त्याच्या आधारे राज्याचे सर्वोच्च राजकीय स्थान मिळाले, केंद्रात जाण्याची वाट खुली झाली, पण या साऱ्या खटाटोपात चव्हाणाच्या मनोवृत्तीवर एक विपरीत परिणाम झाला.

स्वत चा वर्ग सोडून देण्याची ही जी प्रक्रिया त्यांनी यशस्वीपणे केली, (declassing) तीमुळे चव्हाण असे नकळत मानू लागले की स्वीकृत होणे– सर्वांकडून स्वीकारले जाण्याची क्षमता ( अॅक्सेप्टिबिलिटी ) ही राजकीय यशासाठी सर्वात आवश्क गोष्ट आहे.

## ट्रेडमार्क !

म्हणून 'acceptibility' हा त्यांच्या सर्व राजकारणाचा केंद्रबिंदू ठरला. सर्वांच्या प्रतिक्रिया जोखून मग आपले मत देणे, आपण कोठे उभे आहोत हे कधीच कळू न देणे, कोठल्याही बाबतीत सर्व गोष्टीना बगल देऊन तडजोडीचे प्रयत्न करणे, कोणाही विरुद्ध, कशाही विरुद्ध ठामपणे उभे न राहणे या गोष्टी चव्हाणांच्या राजकारणाच्या ट्रेडमार्क ठरल्या.

त्यानी केव्हा केव्हा तुरळकपणे केलेल्या वीरगर्जना नाटकी वाटू लागल्या.

स्वीकृतिक्षमता (acceptibility) ही गोष्ट सर्वोच्च मानण्याची वृत्ती आणखी एका तितक्याच प्रभावी वृत्तीला जन्म देते ही वृत्ती म्हणजे कोणत्या तरी निकषावर आपली वागणूक सतत ताडून पाहणे. हे निकष अनेक असू शकतात. स्वत.ची सदसद्विवेकबुद्धी, जनमत, प्रस्थापित संकेत इत्यादी. आपण कसे वागावे याचे दिग्दर्शन या गोष्टीकडून घेतले जाते (role-perception) चव्हाण यांच्या बाबतीत या वृत्तीने, एक जवळचा रस्ता म्हणून, नेहरू व इंदिरा गाधी यांना वापरायला सुरुवात केली. त्याच्या मान्यतेची, स्वीकृतीची गरज अपरिहार्य होऊन बसली. एरवी १९६९ साली ज्या त्वरेने चव्हाण यानी बाजू बदलली तिचा खुलासा करणे अवघड जाईल. चव्हाण यांच्या नेहरूनिष्ठेचा, इदिरानिष्ठेचा अन्वय हा असा आहे ती एक राजकीय भूमिका नसून चव्हाण याच्यासाठी अत्यावश्यक अशी मानसिक गरज ठरली.

चव्हाण एक राजकीय नेता म्हणून राष्ट्रीय पातळीवर का प्रभावी होऊ शकले नाहीत, पतप्रधानपदाच्या दिशेने का सरकू शकले नाहीत याचे उत्तरही वरील विवेचनात आहे. पतप्रधानपद ही अशी जागा आहे की जेथे तुम्हाला तुमचे बरोबर की चूक हे सागणारे उपलब्ध नाही. तुमचा निर्णय चूक की बरोबर हे परिस्थितीच ठरविते व या निर्णयाच्या जोडीने येणारे राजकीय परिणाम तुम्हालाच स्वीकारावे लागतात. इंदिरा गांधीनी हे परिणाम भोगले, अनेकदा त्यांनी अंधारात उडी घातली, कधी त्या यशस्वी ठरल्या तर कधी विफल झाल्या–अखेरीस अशाच एका अंधारातील उडीने त्यांचा राजकीय अस्त उदयाला आणला,

चव्हाण याना त्यांचे निर्णय चूक की बरोबर एवढेच कोणी तरी सांगण्याची गरज भासते; पण या निर्णयाची परिणती स्वीकारण्याची त्यांची तयारी नाही. म्हणून चव्हाण हे मानसिकदृष्टया पंतप्रधानपदासाठी सुयोग्य बनू शकत नाहीत.

ज्या राजकीय शैलीने चव्हाण यांना येथपर्यंत आणून सोडले, त्याच शैलीच्या प्रभावामुळे ते पंतप्रधानपदासाठी बाद ठरले असे म्हणण्यास हरकत नाही.

चव्हाण यांच्या राजकारणाची आणखी एक ध्यानवाची मेख आहे. तिचे वर्णन जॉन एह्रलिच्मन (अध्यक्ष निक्सन याचा अंतर्गत बाबीचा सल्लागार–जो सध्या वॉटरगेटप्रकरणी २५ वर्षांची शिक्षा भोगीत आहे.) याच्या एका आवडत्या शब्दप्रयोगाने करता येईल. तो म्हणत असे, 'प्रत्येक यशस्वी कारभाऱ्याजवळ एक गोष्ट असणे अत्यावश्यक आहे. ती म्हणजे कानावर हात ठेवण्याची हातोटी.' (deniability).

चव्हाणांजवळ ही हातोटी उत्तम प्रकारे आहे यात शंका नाही. कोणताही निर्णय चुकीचा ठरला वा जनतेस नापसत ठरला तर चव्हाण त्या निर्णयाशी आपला काही सबंध नाही असे भासवितात. मराठी वृत्तपत्रांवरील त्यांची पकड या कामी त्यांना सहाय्यभूत ठरते.

संयुक्त महाराष्ट्र न देण्याचा निर्णय कांग्रेसश्रेष्ठीचा होता. चव्हाणाचा त्यात काहीही भाग नव्हता. (पण जेव्हा सयुक्त महाराष्ट्र झाला तेव्हा मात्र मंगल वगैरे कलशाचे मानकरी चव्हाण ठरले.) रुपयाच्या अवमूल्यनाचा निर्णय अशोक मेहता व सुब्रह्मण्यम् यांचा होता, चव्हाणांचा नव्हता. त्याचप्रमाणे आणीबाणीचा निर्णय चव्हाणांचा नव्हता तर इंदिरा गांधीचा होता. ही केवळ उदाहरणे झाली. या सर्व फसलेल्या निर्णयात कांग्रेस पक्षाचे प्रमुख नेते म्हणून चव्हाण याचा काही वाटा निश्चितच असणार; पण चव्हाण याना कोणत्याही निर्णयाचे दायित्व स्वीकारण्याची आवश्यकता नाही. १९६९ साली कांग्रेसचे अधिकृत उमेदवार संजीव रेड्डी पडले तेव्हा त्या निर्णयाचे परिणाम स्वीकारण्याऐवजी चव्हाण रेड्डीच्या पराभवास जबाबदार असलेल्या बाजूस जाऊन मिळाले.

## 'शिपाईपणा'चा अर्थ

निर्णयाची जबाबदारी घेण्याची ताकद चव्हाणापाशी नाही. 'मी कांग्रेसचा एक शिपाई आहे !' या त्यांच्या आवडत्या वाक्याचा खरा अर्थ असा आहे की, 'निर्णयाच्या बऱ्यावाईट परिणामांची जबाबदारी घेण्यास मी बांधलेला नाही. मी केवळ सत्तास्थानी रहाणार; पण निर्णय चुकले तर मला जबाबदार धरू नका !'

गेले सहा महिने चव्हाण 'Deniability' या गुणविशेषाचा उपयोग करण्याची पराकाष्ठा करीत आहेत. इंदिरा गाधीपासून फटकून वागत आहेत, आणीबाणीशी आपला तसा काही सबध नव्हता असेही वारंवार बजावीत आहेत. अर्थात या वेळी लोक त्याच्यावर विश्वास ठेवण्यास तयार नाहीत. महाराष्ट्रातील त्यांचे अध पाठीराखे सोडले तर, इतरत्र सर्वत्र चव्हाणांचे खरे स्वरूप लोक ओळखून आहेत. १९६९ ते '७६ या सहा-सात वर्षांतील त्यांची इदिरानिष्ठा सहा महिन्याच्या संपादणीने सहजासहजी पुसली जाणार नाही.

Acceptibility व Diniability या दोन गोष्टीबद्दल चव्हाणाची जी धडपड चालू असते तीमुळेच, अतिम निर्णय घ्यावे लागतील अशा सर्वोच्च राजकीय स्थानासाठी ते अनुकूल उमेदवार ठरू शकत नाहीत.

चव्हाणाचे यापुढील भवितव्य काय असेल ते असो; पण आजवर तरी त्यांच्याबाबतीत 'पीटर प्रिन्सिपल' लागू पडते असे म्हणता येते, ज्या पदाला तुम्ही नालायक असता, त्या पदापर्यंत तुमची बढती होते असे हे तत्त्व सांगते. (You get promoted to your level of incompetence.) राज्यात चव्हाण यशस्वी ठरले म्हणून त्यांना केंद्रात नेले. तेथे ते निष्प्रभ ठरले; पण तेथेच ते राहणे क्रमप्राप्त होते.

त्यांना स्वत.लाही हीच अवस्था पसंत पडली. कारण सतत सत्तेवर राहिल्याने ते 'सॉफ्ट' झाले आहेत. शिवाय स्वतःला सुरक्षित ठेवून सारे राजकारण करायची त्याची जी वृत्ती, तिला वरीष्ठ पण निष्प्रभ नेता हे स्थान चपखल ठरले.

विरोधी पक्षाचे पुढारी म्हणून काम करण्याची क्षमता चव्हाण यांचे अंगी उरलेली नाही. कारण प्रदीर्घ काळ सत्तेच्या चौकटीत राहून त्याच्या प्रतिक्रिया कोबट बनल्या आहेत. एखाद्या प्रश्नावर सरकारशी Confrontation घ्यावयाचे, त्यासाठी त्रास सहन करायचा हे सारे त्याच्या आवाक्याबाहेरचे आहे.

पक्षाचा सदर्भ सोडून, जनतेच्या अडीअडचणी समजून घेणे व चळवळीत उडी ठोकणे या गोष्टी तर चव्हाणाना अपरिचितच आहेत. विरोधी नेते म्हणून वावरताना, गेले सहा महिने चव्हाण कॉंग्रेस पक्षाच्या भवितव्यावद्दलच सतत बोलत असतात हे पाहण्यासारखे आहे. कॉंग्रेस परत बलवान होईल, सत्तेवर येईल, लोक कॉंग्रेसवर रागावले आहेत तो राग जाईल असा 'पेप–टॉक' ते करतात. लोकांच्या अनेक प्रश्नावर ते बोलत नाहीत, त्यासाठी संघर्ष करण्याचा विचारही त्याना शिवत नाही.

याच्या तुलनेने जॉर्ज फर्नांडिस, मधू लिमये, वाजपेयी, कामत यांचा विरोधी नेते म्हणून झालेला कालखड आठवावा. त्यांच्या राजकारणात पक्ष, त्याची ताकद इत्यादीविषयीचे व्यवधान फार कमी होते, असंतोष कोठे आहे ते पाहायचे आणि चळवळीचे, विरोधाचे रान उठवायचे असा त्यांचा तडाखा असे. विरोधी नेत्याला पक्षाचा संदर्भ सोडून खूपदा विरोधी चळवळ पुढे रेटावी लागते तेव्हा त्याचे लढाऊपण सिद्ध होते. विरोधाला धार चढते.

चव्हाणाचा परफॉर्मन्स या प्रकारचा नाही. एखादा कर्मचारी सस्पेंड झालेला असावा व गैरसमज दूर झाले की हे प्रकरण मिटेल या आशेवर त्याने दिवस काढावेत तसे चव्हाणाचे वर्तन आहे. सत्तेची छत्र-चामरे असतानादेखील चव्हाण विशेष काही करू शकले नाहीत. आता ते सर्व वैभव गेल्यावर, लोकांचा राग प्रखर असताना, मागील चुकांचा बोजा डोक्यावर असताना चव्हाण एकदम बदलू शकतील व विरोधी राजकारण करतील, हे असंभाव्य आहे. ते वाटाघाटीचे, बुद्धिभेदाचे राजकारण करून जनता पक्षात थोडीबहुत फूट पाडण्याचा प्रयत्न करतील अशी शक्यता आहे. ते कसब त्यांच्यापाशी आहे.

चव्हाणानी एकदा केव्हा तरी जे गुण–दोष आत्मसात केले, ते आता सहजपणे त्याना टाकून देता येत नाहीत. याचे एक मनोरंजक उदाहरण त्यांच्याच उद्गारावरून सापडते. नुकतेच ते एका ठिकाणी म्हणाले, 'गरिबी हटणार आहे असा विश्वास आपण गरिबांच्या मनात पैदा केला पाहिजे!'

या विधानाचा अर्थ काय ते चव्हाणच जाणोत. गरिबीचे निर्मूलन ही एक आर्थिक प्रक्रिया आहे? काही टप्प्यांनी, काही धोरणांनी, काही सिद्धान्तांनी सिद्ध होऊ शकणारी ही गोष्ट आहे. गरीब वा अन्य कोणाच्या मनात कसला विश्वास आहे किंवा नाही यावर ही गोष्ट अवलंबून नाही.

पण या उद्गारांनी चव्हाणांचे मूळ व्यक्तिमत्त्व फार उत्तम तऱ्हेने स्पष्ट होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या कालखंडापासून चव्हाणानी हा विश्वासाचा वगैरे पवित्रा घेतला. 'विश्वास निर्माण केला पाहिजे, गैरसमज रेशमाच्या हाताने दूर केले पाहिजेत, मायेच्या ममतेने मने जिंकली पाहिजेत!' हे चव्हाण यांचे तेव्हापासून ब्रीदवाक्य ठरले. हे त्यानी इतके आत्मसात केले की वाटेल त्या सदर्भात, वाटेल त्या ठिकाणी ते हेच सारखे बोलू लागले. एखादा मंत्र निरर्थकपणे सतत घोकीत रहावे तसे हे होऊ लागले. मागील निवडणूक प्रचारातही चव्हाणानी आपले हेच 'रेशीमपणाचे' जोरात आळविले. त्या परिस्थितीत ते किती विसंगत, किती पोकळ वाटत होते याची त्यांना अजिबात कल्पनाच आली नाही! कॉंग्रेसने इतके अत्याचार केले, इतके जुलूम केले, इतकी दहशत निर्माण केली की लोकांची कॉंग्रेसबद्दलची भावना हा गैरसमज नसून रास्त समज होता; पण चव्हाण आपले जुनेच विटके गाणे गात राहिले!

हे एवढेच असते तर विशेष बिघडले नसते. पण चव्हाण यानी सर्व कारकीर्दीत 'चांगले सबंध', 'परस्पर विश्वास' वगैरेलाच धोरण, अंमलबजावणी, परिणाम याचे पर्याय समजण्यास सुरुवात केली म्हणून त्याचे राजकारण कठोर वास्तवाला कधी सामोरे जाऊच शकले नाही.

चव्हाणांची शोकांतिका ही आहे. मूळ महत्त्वाचे काय आणि आनुषंगिक काय, भरीव काय आणि निव्वळ सजावटीसारखे काय याचा त्यांचा विवेक पार सुटून गेला! ते मोघमपणाला मुत्सद्देगिरी समजू लागले, लाचारीला तडजोड मानू लागले, नुसत्या गोड गोड बोलण्याला धोरण मानू लागले, निष्क्रियतेला समन्वय मानू लागले. परिस्थितीचा कल पाहून वागण्याला नेतृत्व समजू लागले!

नेत्याने परिस्थितीला वळण लावायचे असते, सतत नवे पर्याय उभे करायचे असतात, त्यातला कोणता योग्य हे ठरवून त्या दिशेने पावले टाकायची असतात. 'इंदिरा गाधीशिवाय देशाला पर्याय नाही!' असे म्हणणारा या देशाचे नेतृत्व करू शकत नाही एवढे जरी चव्हाणाना कळले तरी त्याच्या विरोधी पक्षात जाण्याचे सार्थक होईल. □


इंदिरा गांधी याच्या हस्तकांनी आणीबाणीत घातलेला सावळा गोंधळ

**स्फोटक आणि प्रक्षोभक सत्यकथा**

बन्सीलाल, विद्याचरण शुक्ला, देवकांत बारुआ, यशपाल, धवन, धीरेन्द्र ब्रह्मचारी, रुखसाना - या प्रत्येकाच्या कृष्णकृत्याचा प्रथमच प्रसिद्ध होत असलेला समग्र इतिहास

**All "The Prime Ministers Men"**

**जनार्दन ठाकूर**

या पुस्तकाचा मराठीत स्वैर अनुवाद

**वि. स. वाळिंबे**

# इंदिरा गांधींचे साथीदार

मूळ किंमत २० रुपये

*** सवलतीत रु. १०–००**

सर्व प्रमुख बुकसेलर्सकडे प्रकाशनपूर्व सवलतीत नावे नोंदवा!

**उत्कर्ष प्रकाशन, डे. जिमखाना, पुणे ४.**

### आक्रमक यशवंतराव ?

यशवतरावांचे भावी आक्रमक धोरण कसे असेल, त्यामुळे यशवंतरावांमध्ये, काँग्रेसमध्ये आणि एकूण देशाच्या राजकारणात काय फरक पडेल, या प्रश्नांची उत्तरे म्हणजे आमच्या मते या यशवतराव-अध्यायाचा गाभा आहे; पण बहुसंख्य मंडळींना याबाबत कुठलाच अंदाज बांधता येत नाही. फक्त हसून, भुवया उडवून हा प्रश्न टाळला जातो. श्री. मगर यांचे या बाबतीतले एक मत पाहाण्यासारखे आहे. यशवंतरावाचे आक्रमक धोरण ही एक फक्त घोषणाच आहे– हवा निर्माण करणारी आणि या घोषणेमुळे कुठलाच फरक पडणार नाही हे त्यांचे मत. इथली ग्रामीण जनता, विशेषत: बाया-बापड्या, यशवतरावजींना कौतुकाने 'गुळमट लुच्चा' म्हणते. याचा अर्थ असा की ते गोड बोलून आपला कार्यभाग साधतील. तेव्हा ही घोषणा म्हणजे यशवंतरावाच्या गोडबोल्या लबाडीचाच एक आविष्कार आहे. खरं तर यशवंतराव अजूनही निराशच आहेत; पण हे ते दिसू देणार नाहीत. कारण त्यांच्या कुस्तीचा न्यायच निराळा आहे. ते स्वत: खाली पडून वरच्याचा जीव घेतात ! तेव्हा हे आक्रमक धोरण वगैरे फक्त 'बकवास' आहे. अशा घोषणा देत राहाणे हा निराशेवर पांघरूण घालण्याचा एक बहाणा आहे, ही काहींची प्रतिक्रिया.

याउलट एक यशवंतराव-प्रेमी पण अभ्यासू पत्रकार भेटले. यशवतरावावरील हरएक राजकीय आरोपाचे समर्थन करणे हा त्यांचा हातखंडा ! तेव्हा त्यांची मतेही पाहण्यासारखी आहेत. त्यांच्या मते यशवंतरावानी आजवर राजकीय संधिसाधूपणाच केला. त्यासाठी त्यांनी सतत बचावात्मक धोरणच अनुसरले; पण हा काही त्यांचा एकट्याचा दोष नव्हे. राजकारणामध्ये भारतात सर्वच मंडळींनी संधिसाधूपणा केला आहे. यासाठी त्यांनी जनसंघाची काही उदाहरणे दिली. जगजीवनरामांचा दाखला दिला. तेव्हा 'संधिसाधू संधिसाधू' म्हणून यशवंतरावांनाच चिडविण्याचे कारण नाही. संधिसाधूपणा हेच राजकारणाचे गमक आहे असे त्यांचे मत. पत्रकारांचा हा खुलासा बिनतोड दिसतो खरा; पण आज सगळेच राजकारणी संधिसाधू आहेत ही गोष्टही एक वेळ खरी मानली तरी त्यामुळे संधिसाधूपणा हे एक 'नैतिक मूल्य' काही ठरू शकत नाही. आज संधिसाधूपणा व सत्तालालसा हे आपल्या राजकीय विश्वाला लागलेले ग्रहण आहे आणि यशवंतरावही त्यात काळवंडले आहेत ही वस्तुस्थिती आहे. शिवाय, थोडाफार संधिसाधूपणा ही राजकारणाची गरज आहे हा युक्तिवाद मान्य केला, तरी ते काही राजकारणाचे एकमेव आणि आद्य तत्त्व नव्हे. संधिसाधूपणालाही काही मर्यादा असतात. अगदी काही थोर मानलेल्या तत्त्वांना, जीवननिष्ठांना धगल देऊन जर संधिसाधूपणा करण्यात आला तर तो क्षम्य मानावा काय ? यशवतरावांबद्दल हे सगळे प्रश्न विचारण्यासारखे आहेत. मग भले त्यांची उत्तरे मात्र न देण्यासारखी असोत.

तर राजकारणात यशवंतरावानी संधिसाधू बचाव केला. ही गोष्ट हे काँग्रेसप्रेमी पत्रकार मान्य करतात; पण सध्याचा त्यांचा आक्रमकपणा त्यांना खूपच महत्त्वाचा वाटतो. हा यशवंतरावाच्या जीवनातला 'Turning Point' आहे आणि आज महाराष्ट्रात पराभव झाला तर उद्या केंद्रातील यशवतराव संपतील या भीतीवर ही आक्रमकता आधारली आहे. या आक्रमक भूमिकेचा अर्थ एवढाच की पक्षहिताच्या (आणि स्वहिताच्या) दृष्टीने यानंतर यशवंतराव सर्वच आघाड्यांवर बंड उभारतील; पण मुळातच यशवंतराव calculating politician आहेत. तेव्हा हे आक्रमण असेच 'मर्यादित यशासाठी घेतलेले आणि तितपतच मर्यादित' असे असणार. राजकीय झेप घेण्याची ही यशवंतरावाच्या आयुष्यातली पहिलीच वेळ; पण तीदेखील खुर्चीला दोरा बांधून ! तितकीच स्वैर व दूर जाईल असा याचा अर्थ. त्या दृष्टीने 'विरोधकाचे पानपत करू !' यासारख्या त्यांच्या घोषणा निरर्थक वाटतात.

प्रश्न : आगामी निवडणुकातील यशापयशाचे काय ?

उत्तर : या बाबतीत आमच्या वरच्या पत्रकार-मित्रांना काँग्रेसच्या यशाची बालंबाल खात्री वाटते. कारण लोकसभेच्या वेळचे मत लोकशाहीला मत होते. त्यामुळे इथे काँग्रेस तेव्हा पडली. आता ती परिस्थिती नाही; पण म्हणून काँग्रेसलाच ते मत का पडावे याचा खुलासा ते करीत नाहीत. तरीही बहुसंख्य पत्रकारांना काँग्रेसबद्दल आशा वाटते. अर्थात ही आशा झटकणारी विरोधक मंडळी आहेतच. इथे काँग्रेसला एकही सीट मिळणार नाही हा त्यांचा दावा; पण चर्चा करण्यात अर्थ नाही. आगामी निवडणुकीत याचा निकाल लागेलच; पण विशेष महत्त्वाची गोष्ट अशी की शकररावांच्या समाजवादी काँग्रेसचे कुणालाच काही विशेष कौतुक किंवा भीती वाटत नाही. हा पक्ष सगळ्यांच्याच मते अगदी निरुपद्रवी आणि मूठभर लोकांच्या वैफल्याचे कडवट फळ आहे. प्रश्न आहे तो काँग्रेस जनता आणि शे. का. प. यांच्या परस्पर संबंधाचा आणि त्यांच्या तांकदीचा.

### श्री. माणिकराव पालोदकर

आतापर्यंत मराठवाड्यातील काही पत्रकारमंडळींची यशवंतरावांसंबंधी आणि त्यांच्या राजकारणासंबंधीची मतें पाहिली. यानंतर अर्थातच काँग्रेसमधील काही नेतेमंडळींची मुलाखत घेऊन त्यांची मते अजमाविणे अपरिहार्य होते. पुढे त्या कामगिरीवर निघालो.

श्री. माणिकराव पालोदकर ही या भागातली एक महत्त्वाची व्यक्ती. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे माजी उपाध्यक्ष आणि काँग्रेसचे माजी खासदार. नुकतेच गेल्या लोकसभा-निवडणुकीत ते जालना मतदारसंघातून पराभूत झाले. माणिकराव हे यशवंतरावजी चव्हाण यांच्या खास मर्जीतले आणि साहेबांना (साहेब हे यशवंतरावजीसाठी इथून पुढे त्यांनी वापरलेले आदरार्थी संबोधन) मनापासून मानणारे काँग्रेसनेते म्हणून औरंगाबादमध्ये आम्ही त्यांचे नाव ऐकले; पण प्रत्यक्ष मुलाखतीत मात्र त्यांनी या लोकसमजाचा इन्कार केला. यशवंतरावांशी आपली कुठलीच जवळीक नाही असे म्हणाले. त्यांच्या मते साहेबांजवळ जाणाऱ्या प्रत्येक माणसालाच साहेबांविषयी असे वाटते हाच साहेबांचा मोठा गुणविशेष आहे ! साहेबांच्या

या गुणविशेषामुळेच लोकांचा माणिकरावांविषयीही असा गैरसमज झालेला दिसतो.

माणिकरावांकडे गेलो तेव्हा ते स्वत: घरी नव्हते;- पण तरीही 'दरबार' मात्र भरलेला होता. दरबारातलं वातावरण तसं बरंच मोकळं मोकळं होतं. वकील होते, सरकारी डॉक्टर होते, शेतकरी मंडळी होती. जोरजोरानं गप्पा चालल्या होत्या. थोडा वेळ आम्ही बावरून बसलो तोच माणिकराव आले. दरबार एकदम शांत झाला. त्यांच्या खास आसनावर ते स्थानापन्न झाले. जवळचीच बेल दाबून त्यांनी नोकराला बोलावले. सगळ्यासाठी चहा सांगितला गेला. आता वातावरण पुरेसे गंभीर झाले होतेच. उपस्थित दरबारी मंडळींची माणिकरावांनी आस्थेन विचारपूस केली. त्यांना आश्वासनं, दिलासा दिला. चहा झाल्यावर मंडळी एकेक करून उठू लागली आम्हाला मुलाखतीला एकांत मिळाला. मुलाखत खूपच मनमोकळी आणि सविस्तर झाली- तिचा साधारण गोषवारा असा—

**प्रश्न :** साहेबांचे आतापर्यंतचे राजकारण बचावाचे राजकारण होते असे म्हणतात. तेव्हा त्यांचा नवा आक्रमक पवित्रा कशा प्रकारचा असेल ?

**उत्तर :** साहेबांचे राजकारण पूर्वी कधी आक्रमक नव्हते असे म्हणणेच चूक आहे. हा विरोधकांचा खोटा दावा आहे आजवर साहेबांनी केले ते बेरजेचे राजकारण. लोकसंचयाचे राजकारण. साहेबांनी अमाप लोकसंचय केला आणि खरं तर हा फार मोठा गुण आहे; पण नेमका तोच विरोधकांना खटकतो. त्याला त्याचा काय इलाज ?

आक्रमक पवित्र्याचा साहेबांच्या मनातील अर्थ सरळ आहे. तो म्हणजे सामाजिक, आर्थिक आणि सरकारी पक्षासंबंधीच्या भानगडी चव्हाटयावर आणणे. 'सत्तारूढ पक्षाच्या अशा चुका दाखवूनच तर विरोधी पक्ष उभा राहात असतो. आक्रमक पवित्र्याचे साहेबांचे हे आव्हान सगळ्या कॉंग्रेसमधील मंडळींना स्फूर्तिदायक वाटावे असे आहे. पक्षातील शैथिल्य, मरगळ दूर करणे हे महत्त्वाचे कामही या आक्रमक धोरणातूनच साधणार आहे. साहेबांचे आक्रमण हे सरकारवर, त्याच्या चुकीच्या धोरणावर केलेले आक्रमण आहे. या आव्हानातून कॉंग्रेसमधील मंडळी आपले मतभेद विसरतील, एकजूट वाढेल आणि कार्यकर्त्यांमध्ये निवडणुका जिंकण्याची ईर्षा निर्माण होईल !

**प्रश्न :** यशवंतरावांची भारतातील इतर ठिकाणची प्रतिमा 'महाराष्ट्राचे नेते' एवढीच आहे. ते काही राष्ट्रीय नेते नाहीत असे काहीजण म्हणतात ते खरे आहे का ?

**उत्तर :** हे साफ चूक आहे. कारण असे जर असते तर देशातील विरोधी पक्षाचे नेते म्हणून संसदीय नेतृत्वासाठी त्यांची निवड झालीच नसती ! केंद्रीय मंत्रिमंडळातही साहेब नेहमीच दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकावर राहिले आहेत. व्यक्ती म्हणून साहेबांची लोकप्रियता तर महाराष्ट्रात अमाप आहेच. उत्तरप्रदेश, हरियाणा, पंजाब येथेही ते जनतेचे तितकेच लाडके आहेत हे अर्थात माझ्या माहितीप्रमाणे. लोकांच्या आशा—आकांक्षांचा साहेब फार सहानुभूतीने विचार करतात. त्यातूनच घराघरांतून साहेबांबद्दल ही आपुलकीची भावना पसरली आहे.

**प्रश्न :** यशवंतरावांनी मराठवाड्यातले नेतृत्व दाबले, हे खरे का ?

**उत्तर :** साफ चूक ! उलट शंकररावांना साहेबांनीच राजकारणात पुढे आणले. शंकरराव आज जे काही आहेत ते साहेबांमुळेच ! साहेबांनी कुणालाच दाबले नाही. जो तो आपापल्या कर्तृत्वाने चमकतो. नेतृत्व वाढू नये असे प्रयत्न शंकररावांनी स्वत: मात्र खूपच केले, ते साहेबांनी ऐकले फक्त !

**प्रश्न :** आणि मराठवाड्याच्या विकासाचे काय ? तोही यशवंतरावांनीच रोखला हे खरे काय ?

**उत्तर :** मुख्य गोष्ट म्हणजे मराठवाडा विकासाच्या योजना आजवर पुरेशा राबविल्या गेल्या आहेत. त्याबद्दल तक्रार करण्याचे कारण नाही आणि काही त्रुटी असतीलच तर शंकररावांनाच जबाबदार धरा ! शंकरराव नेहमीच सुपरकॅबिनेटमध्ये होते.

**प्रश्न :** यशवंतरावांची मराठेशाही हे काय प्रकरण आहे ?

**उत्तर :** हाही साहेबांवरचा निराधार आरोप आहे. आज महाराष्ट्रात मराठावर्ग बहुसंख्य आहे. तेव्हा सर्वत्रच त्यांचे प्रमाण अधिक दिसणार. जो निवडून येईल त्यालाच तिकिट देणे महत्त्वाचे. नाही तर संघटना रसातळाला जाईल ! कुठल्याही मागास कार्यकर्त्याला साहेबांनी मागे खेचल्याचे उदाहरण नाही. अल्पसंख्य कुणी निवडून येऊ शकत नाही हे दु:ख आहे. अगदी विरोधी पक्षाने तरी किती हरिजनांना पुढे आणले ?

**प्रश्न :** येत्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसचे भवितव्य काय ?

**उत्तर :** कॉंग्रेसला महाराष्ट्रात नक्कीच वाव मिळेल लोकसभेतला पराजय हा शंकररावांच्या संकुचित धोरणामुळे झालेला पराजय होता. नांदेड-मराठवाड्यातच हा पराजय अधिक होण्याचे कारण एवढेच की, शंकररावांनी याच आपल्या भागाबाबत सर्वाधिक सूडभावना बाळगली. व्यक्तिगत हेवेदावे पूर्वपरिचयामुळे साधून घेतले आणि परभणीमधून तर त्यांनीच शे. का. पक्षाला खतपाणी घातले. एक विरोधी पक्षही आपल्याविषयी चांगले बोलतो हे दाखविण्यासाठी ! आता मात्र स्वत: शंकररावदेखील निवडून येतील की नाही. शंकाच आहे !

**प्रश्न :** इंदिराजी परत कॉंग्रेसमध्ये आल्यास संघर्ष होईल काय ?

**उत्तर :** याबाबत आताच काही सांगणे कठीण आहे; पण सध्या तरी पक्षात संघर्ष होण्याचे काहीच कारण नाही. कारण संघर्ष करायला पक्षाजवळ सत्ताच आहे कुठे ? सध्या फक्त संघटित होणे महत्त्वाचे.

हा झाला आमच्या मुलाखतीचा गोषवारा.

या मुलाखतीतून काही महत्त्वाचे निष्कर्ष निघतात. एक म्हणजे माणिकराव स्वत: सत्तेच्या अभावी थोडे निराश झाल्यासारखे वाटतात. सत्ता नाही म्हणजे संघर्ष नाही. सत्तेसाठी संघर्ष, तत्त्वासाठी नव्हे, हे त्यांचे तत्त्वज्ञान थोडे विचित्र वाटते दुसरी एक विशेष गोष्ट अशी की, यशवंतरावांवरील प्रत्येक आरोपाला ते विरोधकांमधील अनुरूप चूक दाखवून उत्तर देण्याचा प्रयत्न करतात. निवडणुकीच्या प्रचारात हे ठीक आहे; पण हे नैतिक नव्हे. समोरचा कुणी चोरी करतो म्हणून आपणही करणे योग्य नव्हे बचावाचा हा पवित्राच मुळी चूक आहे आणि तिसरी गोष्ट म्हणजे माणिकरावांचा शंकररावांवर फारच आकस आहे यशवंतरावांवरील प्रत्येक आरोप ते शंकररावांवर सिद्ध करून दाखवितात. पुराव्याअभावी जो जे म्हणेल ते खरे, अशी परिस्थिती आहे.

पुन्हा एकदा चहा आला आणि अतिशय सौजन्यपूर्ण वातावरणातील ही मुलाखत संपली.

## आमदार बाळासाहेब पवार

पालोदकरांच्या भेटीनंतर आमदार पवारांच्या घरी गेलो. एका मध्यस्थामार्फत मुलाखत मिळाली. मध्यस्थाने करून दिलेला त्यांचा परिचय खूप सूचक होता वाचकांच्या माहितीसाठी सांगतो—

बाळासाहेब म्हणजे औरंगाबादेतला एकदम पॉप्युलर माणूस ! गेली अकरा वर्षे जिल्हा सहकारी बँकेचे डायरेक्टर. केवळ नियमामुळे त्यांना हे पद सोडावे लागले. तरी नवीन डायरेक्टर त्यांच्या मर्जी-

तलाच निवडून आला. तो बाळासाहेबांना इतका मानतो की त्यांच्या आज्ञेशिवाय कुठल्याही कागदावर सही करीत नाही. ते म्हणाले कर सही की मग करतो कुठेही सही !

बाळासाहेबांच्या लोकप्रियतेचा आम्हालाही अनुभव आलाच. नुसते त्यांचे नाव सांगताच आमच्या रिक्षावाल्याने आम्हाला त्यांच्या दाराशी नेऊन सोडले.

बाळासाहेबांच्या घरीही मागच्यासारखा दरबार होताच. बाळासाहेब सगळ्यांना सल्लाही देत होते. चहापाणी होऊन मुलाखत सुरू झाली. मुलाखत भर दरबारातच चालू होती. तेव्हा या मुलाखतीचे वैशिष्ट्य इतकेच की बाळासाहेबांना विचारलेल्या कित्येक प्रश्नांची उत्तरे आसपासची त्यांची इतर मंडळीच देऊन टाकत होती आणि त्यांना पेचात पाडीत होती.

**प्रश्न :** यशवंतरावांच्या आक्रमक पवित्र्याविषयी आपले मत काय ?

**उत्तर :** हा आक्रमक पवित्रा फक्त महाराष्ट्रापुरताच आहे. पक्षांतर्गत नव्हे आणि जेव्हा जेव्हा कांग्रेस संकटात आली तेव्हा तेव्हा साहेबांनी हा पवित्रा घेतला आहे. उदाहरणार्थ, संयुक्त महाराष्ट्र-चळवळीत. मध्यंतरी पंजाबच्या अधिवेशनात स. का. पाटलांनी जनसंघ व कांग्रेस एक करण्याची सूचना केली होती. तिला देखील एवढ्या साहेबांनीच कडाडून विरोध केला. ही आक्रमकताच नाही का?

**प्रश्न :** यशवंतराव फक्त महाराष्ट्राचेच नेते आहेत हे खरे का ?

**उत्तर :** कुणी काय म्हणायचं हे कोण ठरविणार ?

लो. टिळकांनाही तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी म्हणत असत; पण एक सांगतो. गेल्या विधानसभा निवडणुकीत कांग्रेसच्या नेत्यांपैकी सबंध भारतात हिंडले ते फक्त एकटे यशवंतरावच !

**प्रश्न :** यशवंतरावांना मराठवाड्याबद्दल आकस आहे असे शंकरराव म्हणतात, हे खरे का ? मराठवाडा विकासाचे काय ?

**उत्तर :** आकसाची ही भाषा शंकररावांना कांग्रेसमधून बाहेर पडल्यावरच बरी सुचली ! आणि शंकरराव तरी कुठे मराठवाड्याशी धड वागले ? मराठवाडा-आंदोलनाशी शंकररावांचा काडीमात्र संबंध नाही ! हे सगळे आंदोलन मी स्वत: चालविले. क्रेडिट फक्त शंकररावांनी लाटले !

शंकरराव मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना मधून मधून भेटण्याचा जुना पायंडादेखील मोडला. मराठवाड्याच्या विकासाशी सुद्धा त्यांचा काही संबंध नाही. ६० सालापासून आमचे तेच नेते आहेत; पण मराठवाड्याचा विकास झाला नाही, याला सर्वस्वी तेच जबाबदार आहेत ! यशवंतरावांना दोष देण्यात काय अर्थ आहे ?

**प्रश्न :** यशवंतरावांची मराठेशाही आहे असे लोक म्हणतात ते खरे का ?

**उत्तर :** हा आरोप खोटा आहे. ५६ सालीच यशवंतरावांना हा प्रश्न विचारला होता. हे राज्य मराठा होणार की मराठी ? साहेब म्हणाले, मराठी ! आणि तेच खरे आहे. सध्याच्या परिस्थितीत खरे तर जातीयवाद टिकणेच शक्य नाही !

जनता पक्ष मात्र आता जातीयवाद आणू पाहात आहे. परवाच औरंगाबादेत त्यांचा महिला मोर्चा झाला. त्यात घोषणा दिल्या—

'सोम्या गोम्या मंत्री झाला
आमच्या पिशव्या रिकाम्या झाल्या !'

याचा अर्थ काय आम्हाला समजत नाही !

**प्रश्न :** मराठवाड्याचे नेतृत्व यशवंतरावांनी दाबले का ?

**उत्तर :** मराठवाड्याला नेतृत्व मिळायला उशीर झाला हे मानले तरी उशीराने आलेले नेतृत्व तरी काय लायकीचे होते ? आणि उशीर झाला त्यालाही काही कारणे आहेत. शंकरराव मुख्य मंत्री झाले ते त्यांच्या गुणामुळे नव्हे, तर फक्त मराठवाड्यात तेव्हा दुसरे कुणीच नव्हते म्हणून आम्ही त्यांना पाठिंबा दिला. एकट्या साहेबांनीच आमचे नेतृत्व दाबले असे म्हणणे चूक आहे. टाळी कधी दोन हातांनी वाजत नसते (म्हणजे काय ?) **आता स्वत: साहेबही आपण मराठवाड्यावर अन्याय केल्याचे उघड कबूल करतात !**

**प्रश्न : शंकररावांनी मराठवाड्यावरील अन्यायाविरुद्ध आवाज उठविला नाही असे जर आहे तर इथल्या कार्यकर्त्यांनी त्यांना मुख्यमंत्रीपदासाठी पाठिंबा का दिला ?**

**उत्तर :** इतर कुणात दम कुठाय ? दुसरं आहेच कोण ? ( इथे फार मोठा हशा. )

**प्रश्न : मराठवाड्याची ब्रॉडगेज-योजना केंद्रात बारगळली. तिला यशवंतरावांनी उचलून धरले, नाही. असे का ?**

**उत्तर :** त्या योजनेचा साहेबांशी काय संबंध ? शंकरराव इंदिराजींच्या कृपेने मुख्य मंत्री झाले ना ? मग मिळवा की म्हणावं त्यांच्याच कृपेनं रेल्वेदेखील ! साहेबांना कशाला मधे ओढता ?

**प्रश्न : आगामी विधानसभा-निवडणुकांमध्ये कांग्रेसचे भवितव्य ?**

**उत्तर :** मराठवाडा आता यशवंतरावांच्या पाठीशी आहे. लोकसभेतली आमची हार शंकररावांमुळे आणि आमच्या बेदिलीमुळे झाली. त्यातून यशवंतराव संरक्षणमंत्री झाल्यापासून त्यांचे महाराष्ट्रावरील लक्ष कमी झाले होते. आता मात्र ते संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी देत असत तितके लक्ष देऊ लागले आहेत. आता विजय नक्कीच !

**प्रश्न : आता एक शेवटचा प्रश्न. मराठवाड्यातील नेतृत्व यशवंतरावांमुळे दाबले गेले नाही असे आपण म्हणता; पण सध्याच्या चाळीस जणांच्या मंत्रिमंडळात हक्क आणि योग्यता असूनही आपला समावेश नाही हा आपल्यावर अन्याय नाही का ?**

**उत्तर : ...... ?**

बाळासाहेबांचा चेहरा या प्रश्नावर कसनुसा होतो. उत्तर नाहीच ! दुसऱ्या चहाची नवी ऑर्डर सुटते आणि पाठोपाठ आम्हाला उठण्याची सूचनाही !

बाहेर पडताना मग बाळासाहेब दरबारी मोकळेपणाने बोलू लागतात — नाही तर हा बाळासाहेबांवर अन्यायच आहे. मराठवाड्यातून शंकररावांना बाळासाहेबांनी जितकी मदत केली तेवढी परतफेड शंकररावांनी त्यांना दिली नाही आणि आता शंकररावांना विरोध करून बाळासाहेबांनी यशवंतरावांना जी मदत केली त्याचीही परतफेड झाली नाही. नशीब एकेकाचे ! भांडून काय उपयोग ?...इ. इ.

हा झाला यशवंतरावांच्या मराठवाडा-अध्यायाचा एक भाग. यातून एकच गोष्ट दिसते की, यशवंतरावांबद्दल उघड विरोध खूपच कमी आहे. कांग्रेस कार्यकर्ते तो उघड करू इच्छितही नसावेत आणि मराठवाड्याच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांची आणि त्यांच्यावरील अन्यायाची जबाबदारी सरळ सरळ शंकररावांवर ढकलून यशवंतरावांचा बचाव करण्याची नीति त्यांनी सुरू केली आहे. नाही तरी असा चिखल फासायला कुणी तरी हवेच! शंकररावच त्यांना सापडले हा योगायोग ! ☐

# मुक्ताफळे

## □ मधाच्या वाटीतील माशी !

एकदा एक साधी माशी व गांधील माशी या दोघीत स्वसामर्थ्याबद्दल वाद झाला. साधी माशी म्हणजे आपल्या घरात आपण दूध अथवा चहा पीत असताना त्यात पटकन पडते ती किंवा दुपारी उकडत असताना उघडचा अगाने अंमळ पडावे, तो नाका-तोंडावर बसून आपल्याला सारखी जागी करते ती माशी. साधी माशी म्हणाली– 'मनुष्य सर्व प्राण्यात श्रेष्ठ; पण त्यालाही मी सतावून सोडते !' यावर गांधील माशी डौलाने म्हणाली– 'अं ! त्यात काय आहे ? हे काम सामान्य चिलटेही करतात ! माझे सामर्थ्य तुमच्यासारख्यांना कळणेही दुरापास्त. मी एकदा दंश केला तर माणूस तासभर बोबलत राहतो !' यावर साध्या माशीने तोऱ्यात सांगितले– 'तू जिवंतपणी काय करीत असशील ते असशील; पण मी मेल्यावरही आपला प्रभाव गाजविते ! मी नेमकी माणसांच्या अन्नात नाही तर पेयात पडते आणि मरते. काय बिशाद माणूस ते खाईल !' ज्ञानेश्वरमाउली ही गोष्ट न सांगता लिहितात–

'मासी आपण पेयाते गिळवी ।
परि पुढिला वाती शिणवी ॥

म्हणजे तात्पर्य काय, तर रागीट माणसे हातात सत्ता असताना काय दु.ख देतील ते देतील; पण कुत्सित माणसे फार कठीण ! सत्ता गेल्यावरही ती इतरांना 'वाती' आणल्याशिवाय राहत नाहीत. समजा, साध्या माशीचा नंतरचा गुण आणि गांधील माशीचा दंश करण्याचा नेहमीचा गुण एकाच स्त्रीच्या ठिकाणी असला, तर ती बाई किती बरे सामर्थ्यवान होईल ?

इंदिराजींनी एकोणीस महिने दंश केलेली लाखो माणसे देशभर आपल्या जखमा दाखवीत काँग्रेसविरुद्ध रागाचा आणि संतापाचा डोंब उसळवीत सुटली आणि त्यात गांधील माशीचे 'पोवळे'च फस्त झाले! त्यातून गळणारा 'मध' गोळा करून यशवंतराव चव्हाण, ब्रह्मानंद रेड्डी, चंद्रजित यादव या बोबलणाऱ्या जनतेला 'मधाचे बोट' लावीत देशभर हिंडू लागले होते. १३–५–७७ ला मुंबई येथे यशवंतराव म्हणाले–

'आणीबाणी जाहीर करून आमचा पक्ष लोकशाहीपासून दूर गेला आणि यासाठी जनतेने आम्हाला शिक्षा केली. माफ करा आम्हाला. पुन्हा मात्र अशी चूक आम्ही करणार नाही !'

आपण किती अगतिक होतो, दीन होतो, निष्पाप होतो हे सांगताना ७ जून ७७ ला पाटणा येथे चव्हाण म्हणाले–

'अहो, आणीबाणी आणावी की आणू नये यासंबंधी पंतप्रधानांनी मला विचारलेसुद्धा नव्हते ! दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रातून जेव्हा ती जाहीर झाली तेव्हाच काय ते मला समजले ! आणीबाणी लावली गेली होती. आता त्याविरुद्ध कारवाई करण्यात काय बरे अर्थ होता ?'

यशवंतरावाच्या मधाच्या वाटीत परवा माशी पडली ! श्रीनगरच्या थंड हवेत बसून इंदिराजी म्हणाल्या–

'आणीबाणी लावली यात पश्चात्ताप कसला ? ती अत्यंत आवश्यक होती. निदान जनतापक्षाने तरी आणीबाणीबद्दल कृतज्ञ असले पाहिजे. आणीबाणी नसती तर जनतापक्ष सत्तेवरच येऊ शकला नसता !'

म्हणजे इंदिराजींची चूक झाली असे यशवंतरावांना जे वाटले ते काही खरे दिसत नाही ! आणीबाणीबद्दल कृतज्ञता !! बाईंचे म्हणणे अगदी खरे आहे.

द्रौपदीची अब्रू घेणाऱ्या दुर्योधनाचे पांडवांनी ऋणी असले पाहिजे. नाही तर झाले असते का महाभारत ? मग कुठला कृष्ण आणि कुठली गीता ? औरंगजेबाने शिवपुत्र संभाजीचे डोळे काढून त्याचा शिरच्छेद केला नसता तर इतिहासात अजरामर होण्याची संधी या संभाजीला मिळाली असती का ? शिवाजीमहाराज, तानाजी, बाजीप्रभु यांनी समस्त मोगलांचे आणि संभाजीराजांनी औरंगजेबाचे ऋणी असले पाहिजे. ब्रिटिशांनी भारताचे स्वातंत्र्य अपहरण केले म्हणून चाफेकरबंधू, भगतसिंग, सावरकर या क्षुद्र माणसांना क्रांतिकारक होण्याची संधी मिळाली. सर्व क्रांतिकारकांनी ब्रिटिश राजवटीचे ऋणी असले पाहिजे. टिळकांना मंडालेला धाडणाऱ्या, गांधीजींना तुरुंगात टाकणाऱ्या, नेहरूंना अहमदनगरच्या किल्ल्यात बंदिस्त करणाऱ्या इंग्रजी सत्ताधाऱ्यांचे, टिळक, गांधीजी आणि नेहरू यांनी ऋणी असायला हवे ! नाही तर बाळ गंगाधर जास्तीत जास्त गणिताचा प्रोफेसर झाला असता आणि मोहनलाल करमचंद यांनी मुंगभाटात एखादे दुकान काढले असते! दुसऱ्या महायुद्धात जे असंख्य ज्यू स्त्री–पुरुष आणि अर्भके नाझी राजवटीने मारली, त्यांनी हिटलरचे ऋणी असले पाहिजे, कारण म्हणून इस्राइल देश जन्माला आला ! इंदिराजी म्हणतात ते अगदी बरोबर आहे. विना चौकशी तुरुंगात डांबलेली जी शेकडो माणसे इंदिराजींच्या तुरुंगात मरण पावली त्यांनी इंदिराजींचे आणि आणीबाणीचे ऋणी असले पाहिजे. कारण जनतेने नंतर त्यांना हुतात्म्य बहाल केले. आत्मदहन केलेला तो गांधीवादी प्रभाकर शर्मा, तुरुंगातील क्लेशाने निधन पावलेली नटी स्नेहलता रेड्डी, पोलिसांकडून बलात्काराच्या धमक्या मिळत असताना तुरुंगात दिवस काढलेली सौ. देवनाथन, वृद्धावस्थेत तुरुंगाचा अनुभव मिळालेल्या दुर्गा भागवत या सर्वांनी आणीबाणीचे ऋणी असले पाहिजे ! वृत्तपत्रातून फोटो छापून येण्याची संधी या फडतूस मंडळींना नाही तर लाभली असती का ?

हातातल्या वाटीत माशी पडलेली पाहून स्तिमित झालेले यशवंतराव चव्हाणदेखील आता बाईंचे ऋणी राहतील. कारण 'आणीबाणी लादण्यात चूक झाली. आम्हाला क्षमा करा !' हा मध जनतेला चाटविण्याचे काम आता त्यांना करण्याची गरज नाही !

कारण 'पुढीला'ते शिणविणारा हा मध कुणी चाखलाच तर त्यांना वांती झाल्याशिवाय राहणार नाही. ती पाहा त्यांनी मधाची वाटी फेकून दिली ! आता ते लोकांना सांगत आहेत–

'इंदिराजी देशाच्या आणि आमच्या महान नेत्या आहेत. आणीबाणी अत्यंत आवश्यक होती. या काळात जे सज्जन विना चौकशी तुरुंगात मेले त्यांनी आमचे ऋणी असले पाहिजे !'

–ग्यानबा

जागेअभावी चालू एकाच अंकात सर्व
मजकूर जाऊ न शकल्याने
यापुढील अंक

# कृष्णा-कोयना विशेषांक (२)

प्रसिद्धी : ८ ऑक्टोबर
किंमत : नेहमीचीच पंचाहत्तर पैसे

या अंकी —

# गांधीवादाचे खरे मारेकरी कोण ? गोडसे की यशवंतराव ?

लेखक
पन्नालाल सुराणा

# शिवाय

- श्री. शंकरराव चव्हाण, मराठवाडा दैनिकाचे संपादक श्री. अनंतराव भालेराव यांच्या खास मुलाखती.
- मोरेश्वर तपस्वी, 'एक अभ्यासक', दीर्घस्मृती विश्वनाथ यांचे स्फुट लेख.